म. ग्रं. सं. ठाणे

विषय पौराणि

लेखक विठ्ठल काशिनाथ नाकरकर

संग्रहालय क्रमांक ९० २०५ १०५

पुस्तकाचें नांव पंढरी तत्वविवेक

९०

सं.क्र. १०५

पंढरी तत्वविवेक.

(पौराणिक)

श्री रुक्मिणीपांडुरंगौजयतस्तराम्.

# पंढरीतत्त्वविवेक.

पूर्वार्ध,

हें

पुस्तक,

विठ्ठल काशीनाथ ऊर्फ दाजी शास्त्री धारूरकर

यांनीं

कित्येक संस्कृत ग्रंथ व जुनी माहिती

मिळवून

लोकहितार्थ

रचिलें;

तें

मुंबईमध्यें

निर्णयसागर छापखान्यांत छापिलें.

शके १८०४.

( सर्व प्रकारचे हक्क कर्त्यानें स्वाधीन राखिले आहेत ).

*क्रमांक ५१.१२ १८*

# अयं ग्रंथो,

भक्तजनशेखरस्य पुण्डरीकस्य प्रार्थनया पापिजनकदम्बं
दुस्तरवृजिनसागरात्समुद्धर्तुं नानाजनपदागतधनिकया-
त्रिकजनजयशब्दसाधुनिवहसंकीर्तनसम्मिश्रीभवद्भू-
ह्मवृंदाशीर्वचननादितहर्म्यगणसुरतरंगिणीसखी-
श्रीचंद्रभागासरिद्विचित्रसुषमामालिपौंड-
रीकक्षेत्रनिवासिनो, महेन्द्राद्यमरवर-
किरीटानर्घ्यमणिगभस्तिमालिचरण
युगुलस्य, निगमागमसंगीतय-
शसश्चराचरगुरोः सच्चिदा-
नंदघनस्य,गोब्राह्मणरक्षि-
णजागरूकस्य,भक्त-
कामकल्पद्रुमस्य
स्मेरास्यसंसूचित
स्वजनप्रसादस्य
करुणासिंधो-
र्भगवतः

**श्री पांडुरंगस्य,**

नखेंदु-
द्युतिनिरस्त-
योगींद्रहृदयतमसो
धर्मार्थादिचतुर्विधपुरुषार्थो-
त्पत्तिकारणयोरासेचनकाकृत्योः श्रीम-
च्चरणारविन्दयोः सविनयं श्रीविठ्ठलपदकमलपराग-
किंकरेण धारूरकरकुलोत्पन्नेन काशीनाथसूनुना विठ्ठलेन समर्पितः ।

सं. पौ. १०८०

श्रीपांडुरंग प्रसन्न.

# पंढरीतत्त्वविवेक.

## पूर्वार्ध.

## प्रस्तावना.

या ग्रंथाचे पूर्वार्ध व उत्तरार्धरूपानें दोन विभाग केले आहेत पैकीं हा पूर्वार्ध आहे. याचे चार भाग केले आहेत. प्रथम भागामध्यें पांडुरंगवर्णनपर वेदऋचा व व्यासकृत पुराणांतील कांहीं श्लोक, आणि प्राचीन ग्रंथांतील मंगलाचरणें लिहिलीं आहेत. तसेंच प्राकृत ग्रंथांचींही थोडींशीं प्रमाणें लिहून प्रथम भाग समाप्त केला आहे. हा भाग लिहिण्यास असें कारण आहे कीं, कित्येक लोक विचार न करितां या देवाविषयीं मुळींच प्रमाण नाहीं असें बोलतात, तर हें त्यांचें ह्मणणें खोटें आहे, असें सर्वांस दर्शित करण्याकरितां प्रथम भाग लिहिला आहे.

**भाग दुसरा.**— या भागामध्यें क्षेत्रसंबंधाचे प्रसिद्ध देव व तीर्थें यांचें माहात्म्य लिहिलें आहे. हा भाग लिहिण्याचें कारण, येथें हजारों कोसांवरून हजारों रुपये खर्चून लोक येतात, परंतु त्यांस येथील माहिती नसल्याकारणानें श्रीरुक्मिणीपांडुरंगावांचून अन्य देवांचें माहात्म्य कळत नाहीं, किंबहुना दर्शन होत नाहीं, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तसेंच चंद्रभागेवांचून येथील अन्य तीर्थांचीं स्नानेंही घडत नाहींत.

याजकरितां येथील सर्व देव व तीर्थें यांचें माहात्म्य यात्रेस आलेल्या लोकांस विदित व्हावें, व त्यांची यात्रा सांग व्हावी, ह्मणून हा भाग लिहिला आहे.

**भाग तिसरा.**— या भागामध्यें प्रसिद्ध प्रसिद्ध जे पांडुरंगाचे भक्त त्यांचा इतिहास लिहिला आहे. हा भाग लिहिण्याचें कारण, पांडुरंगाची आपल्या भक्तजनांविषयींची किती वत्सलता आहे ती सर्वांस दर्शित करावी, व भक्तमंडळीचा सर्व इतिहास समजावा (भक्तविजयादि ग्रंथामध्यें हा सर्व इतिहास जरी आहे तथापि तो ओंवीबद्ध असल्यानें आबालवृद्धांस उत्तम रीतीनें कळत नाहीं) ह्मणून हा भाग लिहिला आहे.

**भाग चवथा.**— या भागामध्यें तुलसीमालाधारणाविषयींचा विचार, व कलीमध्यें कर्तव्य जें, त्याचा विचार, व नाममाहात्म्य अन्योन्यनमन व भक्तिप्राधान्य वर्णन केलें आहे. हा भाग लिहिण्याचें कारण, कित्येक लोक तुलसीमालाधारणास, अन्योन्यनमनास व नामोच्चारणास निंदितात, व यास प्रमाण नाहीं असें ह्मणतात; परंतु ह्यास प्रमाणें पुष्कळ आहेत, असें दर्शित करण्याकरितां हा भाग लिहिला आहे. तसेंच ह्या सर्व ग्रंथाचें तात्पर्य लिहून ग्रंथसमाप्ति केली असे.

या ग्रंथामध्यें शुद्धाशुद्ध बरेंच राहिलें आहे, त्याजकडे लक्ष न देतां क्षमा करून विद्वान् लोकांनीं, हंसक्षीरन्यायानें, सारांशमात्र घ्यावा, अशी प्रार्थना आहे. या ग्रंथामध्यें कमजास्त करण्याविषयीं अथ

वा कोणत्याही प्रकारानें लिहून कळविल्यास आ-
ह्मी त्याप्रमाणें दुसरे आवृत्तींत योग्य वाटल्यास अव-
श्यमेव फेरफार करूं; व सुचविणाराचे मोठे आभारी
होऊं. या पुस्तकाचा उत्तरार्ध प्रसिद्ध करण्यास कोणीं
आश्रय दिल्यास लौकरच प्रसिद्ध करूं. तो आह्मीं
लिहून बहुतेक तयार केला आहे.

श्रीक्षेत्र पंढरपुर,
आषाढशुद्ध ११
शके १८०४.

या पुस्तकाचे कर्ते
विठ्ठल काशीनाथ ऊर्फ
दाजी शास्त्री धारूरकर.


वि.
रु.मा.

११

# पंढरीतत्त्वविवेक

NARAYAN COVIND MADGAMKER

## पूर्वार्ध.

॥ श्रीपांडुरंगाय नमः ॥

श्रीक्षेत्र पंढरपुर हें स्थान फारच रम्य आणि पुण्यकारक आहे. येथील हवा व पाणी सुरेख आहे. येथें लोकसंख्या सांप्रत १६२७५ आहे. या क्षेत्रास दक्षिणवाहिनी भीमा नदी आहे, व पश्चिमेकडे नवीन सुमारें सव्वादोन लक्ष रुपये खर्चून कमेटीनें तलाव केला आहे, आणि या तलावाचें पाणी सर्व क्षेत्रामध्यें आणलें आहे. हें क्षेत्र उत्तम भरभराटीस आलेल्या शहरांपेक्षांही सुंदर आहे. या क्षेत्राचे रस्ते स्वच्छ आहेत; व दर एक कोंपऱ्यास एक एक कंदील आहे; आणखी दुरस्तीकरितां म्युन्सीपालिटीचे लोक नेहमीं फिरत असतात. येथें इंग्रजी सिटिस्कूल आहे; या स्कुलामध्यें पांच इयत्तेंपर्यंत शिकवितात. आणखी सरकारी मराठी तीन शाळा आहेत; व मुलींची एक शाळा आहे. येथें कमेटीकडून एक नवीन उद्यमशाळा व एक संस्कृतशाळा जाहली आहे. पैकीं, उद्यमशाळेस कमेटीकडून सालीना ३००० रुपयांची नेमणूक आहे. व संस्कृतशाळेस दरमहा कमेटीकडून कांहीं रुपयांची नेमणूक आहे. येथें लायब्ररी आहे. हींत पुस्तकें व वर्तमानपत्रें बरींच येतात. याप्रमाणेंच एक बालरक्षक गृह व आर्फनेज (अनाथसंगोपनगृह) आहे; येथें दारिद्र्यग्रस्त पोरकीं जीं मुलें येतील त्यांस ठेवून

त्यांची खाण्यापिण्याची सोय करून विद्याभ्यास त्यांस शिकवितात. याप्रमाणें येथें उत्तम गोष्टी पुष्कळ आहेत; परंतु ग्रंथविस्तारभयानें आह्मी त्या येथें लिहीत नाहीं. या क्षेत्राची ग्रामदेवता जगत्प्रसिद्ध श्रीपांडुरंग आहे. याच्या दर्शनास आषाढ शुद्ध एकादशीस एक लक्षापासून दोन लक्षपर्यंत यात्रा जमत असते; याचप्रमाणें कार्तिक शुद्ध एकादशीसही पाऊण लक्षापासून एक लक्षपर्यंत यात्रा जमते. त्या दोहींवेळीं येथें एकादशीस रथोत्साह होतो. या उत्साहाचा खर्च येथील श्रीमंत राजश्री खासगीवाले करतात. नंतर तीन दिवसपर्यंत जिकडे तिकडे भजनें वगैरे होतात, व पौर्णिमेचे दिवशीं गोपाळपुरीं काला होऊन, प्रतिपदेस देवळांत काला होतो. पुढें सर्व लोक आपआपल्या गांवांस जातात. याशिवाय येथें चैत्रशुद्ध एकादशीस पन्नास हजारपासून पाऊण लक्षपर्यंत यात्रा जमते, व त्याप्रमाणेंच दरएक महिन्यास येथें यात्रा बरीच येते.

या देवाचे संबंधाचे वृत्तिमंत अधिकारी लोक पुष्कळ आहेत. पैकीं मुख्य अधिकारी, १ बडवे:- हे कण्वशाखेचे ब्राह्मण आहेत. यांचीं घरें सुमारें १०० आहेत. श्रीपंढरीनाथाच्या देवालयाची किल्ली यांजपाशीं असते. देऊळ उघडणें, व बंद करणें हें यांच्या मालकीचें काम आहे. देवाचे पुढें येणारें उत्पन्न व देवास अर्पण केलेले अलंकार व वस्त्रें वगैरे सर्व पदार्थ यांचे आहेत, व देवाचा नैवेद्य, पूजेचें द्रव्य, घेण्याचा अधिकार यांचा आहे. देवाचे दागिने व वस्त्रें यांच्या

ताब्यांत असतात. हे देवाच्या प्रत्येक पूजेस चार आणे सेवाधारी यांस मागें देत असत. २ पुजारीः– पांडुरंगाची पूजा यांच्यावांचून होत नाहीं. देवाचीं वस्त्रें वगैरे काढण्याचा, नेसविण्याचा व पूजा करण्याचा अधिकार यांचा. देवास ओंवाळून दिलेला पैसा पुजारी लोकांचा आहे. हेही कण्वशाखेचेच ब्राह्मण आहेत. यांचीं घरें सुमारें ५-६ आहेत. ३ परिचारकः–हे ऋग्वेदी ब्राह्मण; देवाच्या पूजेस व नैवेद्यास जें पाणी लागेल तें आणणें, धूप दीपवगैरे पुजाऱ्यांच्या हातांत देणें व त्यांजपासून घेणें, हा यांचा अधिकार आहे. यांस उत्पन्न चार आणे पैकीं सहावा हिस्सा आहे. ४ दिवटेः–हे कण्व आहेत. पांडुरंगापाशीं दिवटी धरणें, हा यांचा अधिकार आहे. ५ डिंगरेः–हेही जातीचे कण्व ब्राह्मण आहेत. यांचा अधिकार, पांडुरंगाच्या पूजेच्या वेळेस जवळ रहाणें, आरसा दाखविणें, देवाचा बिछाना नीट करणें, व पायघडी टाकणें, हा आहे. ६ बेणारेः–हे पांडुरंगाचे उपाध्याय. श्रीच्या स्नानाच्या वेळेस व अभिषेकाच्या वगैरे वेळेस मंत्र ह्मणण्याचा अधिकार यांचा आहे. ७ डांगेः–हे देवाचे चोपदार. सर्व सेवाधारी लोकांस बोलावून आणण्याचा व हातामध्यें सोन्याची काठी घेऊन द्वारामध्यें उभें राहण्याचा, अधिकार यांचा आहे. ८ हरिदासः–पांडुरंगापाशीं कीर्तन करण्याचा अधिकार यांचा आहे. सेवाधारी यांस बडवे यांनीं दर एक पूजेस चार आणे द्यावे अशी वहिवाट आहे. हे चार आणे सर्व सेवाधारी लोकांस मुख्य उत्पन्न असे. यां सर्वांपैकीं डांगे व दिवटे यांत, डांगे

मूळचे दिवल्यांचे आश्रित; यांस हिस्सा दिवल्यांचे पोटांतून मिळतो; हेही सेवाधाऱ्यांत हल्लीं गणले जातात. या दोघांचा मिळून एक हिस्सा, व बाकी प्रत्येकांचा एक एक हिस्सा आहे. श्रीपांडुरंगाकडील उत्पन्नदार लोक इतकेच. आतां श्रीरुक्मिणीचे पुजारी उत्पात आहेत. यांचीं घरें सुमारें ७५ आहेत. श्रीदेवीकडे यांजवांचून दुसरे कोणी अधिकारी नाहींत. वरें असो. हे लोक फारच धन्य आहेत; कारण ज्या देवाचें दर्शन देवादिकांस सुद्धां दुर्लभ, त्या देवापाशीं हे सदोदित वास करितात. पांडुरंग ह्मणजे वैकुंठवासी परमेश्वरच होय; हा सर्व पापीलोकांच्या उद्धारार्थ पुंडरीकास दिलेल्या वरामुळें येथें राहिला आहे; असा वेदशास्त्रादिकांचा सिद्धांत आहे. तथापि कांहीं लोक अतिपरिचयानें व गतानुगतिक क्रमानें मनास वाटेल तसें बोलतात; परंतु, त्यांच्या ह्या भाषणांमुळें केवळ त्यांस दूपण देतां येत नाहीं. कारण, पूर्वीं रामकृष्णादि अवतारांविषयीं ही मनास वाटेल तसें बोलणारे लोक होतेच. आतां तर हें कलियुगच आहे. अस्तु. ह्या देवास वेदप्रमाण मुळींच नाहीं, आणि वारकरी लोकांनीं कांहींतरी हें नवें बंड माजविलें आहे, असें कित्येक ह्मणतात. परंतु हें यांचें ह्मणणें अविचाराचें आहे. कारण या देवाविषयीं वेदादिकांत पुष्कळ प्रमाणें आहेत; पैकीं मी येथें ग्रंथविस्तारभयामुळें थोडींच लिहितों.

अनादिसिद्ध परब्रह्मरूप जी पांडुरंगमूर्ति तिंजविषयीं कांहींएक लोक, पुराणादिकांत मुळींच प्रमाण नाहीं, असें

बोलून व्यर्थ कलह करितात; तर आतांतरी हीं वेदादिकांतलीं प्रमाणें पाहून त्यांच्या बुद्धीस फेर पडावा हेंच पांडुरंगापाशीं करद्वय जोडून मागणें मागतों.

वेदप्रमाणः— ऋग्वेद संहिता, प्रथम अष्टक, सप्तमाध्याय, प्रथम ऋचा :—

> द्वे विरूपे चरतः स्वर्थे अन्यान्या वत्समुपधापयेते ॥ हरिरन्यस्यां भवति स्वधावां ञ्छुक्रो अन्यस्यां ददृशे सुवर्चाः ॥ १ ॥

## पदानि

द्वे । विरूपे । चरतः । स्वर्थे । [illegible]याअन्या । वत्सं । उपधापयेते । हरिः । अन्यस्यां । भवति । स्वधावान् । शुक्रः । अन्यस्यां । ददृशे । सुवर्चाः ॥ १ ॥

## ऋगर्थः

विरूपे ( विशिष्टं रूपं=सौंदर्यं ययोस्ते ), स्वर्थे ( शोभनः अर्थः पुरुषार्थः मोक्षाख्यो भक्तप्रदेयत्वेन विद्यते ययोस्ते, यद्वा शोभनः मोक्षः अर्थः प्रयोजनं ययोस्ते ), द्वे ( भगवन्मूर्ती ), चरतः ( श्रीपुंडरीकाश्रमे संचरतः आगते वा ), अन्याअन्या ( अन्योन्यं संमुखीभूय ), वत्सं ( भक्तं पुंडरीकं ), उपधापयेते ( पिबतः=सादरं अवलोकयतः ).

ननु— पानार्थस्य धातोरवलोकनार्थः कथं, तर्हि पपौ निमेषालसपक्ष्मपंक्तिरित्यादिवत् ॥ मूर्तियुगुलस्य व्यवस्थां दर्शयति उत्तरार्धेन, हरिः (बंधहरणशीलः प्रभुः), अन्यस्यां ( तयोर्मध्ये एकस्यां तीर्थमूर्तौ ), स्वधावान्

( स्वधाशब्दस्य वैदिकनिघंटौ उदकनामसु पाठः उदकांतर्हितो भवति, नित्ययोगे मतुप् ), अन्यस्यां ( अपरस्यां प्राङ्मुखायां मूर्तौ ), शुक्रः ( श्वेतवर्णः=पांडुरंग इत्यर्थः ), सुवर्चाः (शोभनं, वर्चः=चित्प्रकाशो यस्य सः), एवंविधः, ददृशे ( दृश्यते जनैरिति शेषः; दृशेः कर्मणि लिट्, स च छंदसिलुङ्, लङ्, लिट्, इति वर्तमानार्थकः), अत्र श्रुतौ पुंडरीकाभिलाषपूरण्या हर्याख्यतीर्थमूर्तेर्विठ्ठलाख्यमूर्तिमूर्तेश्च क्रमेण वर्णनात्सर्वत्र "पुंडरीकवरद हरिविठ्ठल" इत्युद्घोष एतच्छ्रुतिमूलको बोध्यः ॥

## प्राकृतार्थ

सुस्वरूप अशा दोन भगवंताच्या मूर्ति आपल्या भक्तांस मोक्ष देण्याकरितां, पुंडरीकाचे आश्रमाचे ठायीं संचार करितात; आणि परस्पर सन्मुख होऊन आपला वत्स ( जो पुंडरीक ) त्यास सादर पाहतात. आतां दोन मूर्तींपैकीं हरि ही भक्तजनाच्या भवबंधनाला नाश करणारी अशी तीर्थरूपानें आहे. ( ह्या अभिप्रायास अनुसरून तुकाराम एका अभंगांत ह्मणतात "तुका ह्मणे चंद्रभागा ॥ स्वरूप तुझें पांडुरंगा" ॥ ) व दुसरी शुक्रः (पांडुरंग)रूपानें राहिलेली आहे, जीस सर्व लोक पाहतात.

वरील श्रुत्यर्थास अनुसरून स्कंदपुराणाच्या उत्तर संहितेंत श्लोक आहेत त्यांतून कांहीं:—

ततो हरिर्द्विरूपेण स्थितवांस्तत्र नारद ॥
मायूरस्रग्धरो नित्यं कटिन्यस्तकरद्वयः ॥ १ ॥
द्विधारूपेण तत्रास्ते क्षेत्रे तीर्थेऽसुरांतकः ॥
पश्चिमाभिमुखस्तीर्थे क्षेत्रे पूर्वमुखो विभुः ॥ २ ॥

## अर्थ

नंतर हे नारदा, तेथें हरी दोन रूपानीं रहाता झाला. मूळ ऋचेंत हरि=तीर्थरूप ईश्वर असा सामान्यत्वें व्यक्त करून दुसरा जो सर्वांस गोचर तो मोराच्या पिसांचा किरीट व माळा धारण करणारा, आणि दोन्हा हात कंबरेवर ठेवणारा, असा विशेष स्पष्टतेनें सांगितला. तेथें तीर्थीं व क्षेत्रीं दोन रूपांनीं ईश्वर आहे :— तीर्थांतील पश्चिमाभिमुख व क्षेत्रांतील पूर्वाभिमुख असा आहे.

## श्रीपांडुरंग

त्रीणि जाना परि भूषंत्यस्य समुद्र एकं दिव्ये-
कमप्सु ॥ पूर्वामनु प्रदिशं पार्थिवानामृतून्
प्रशासद्विदधावनुष्ठु ॥ २ ॥

## पदानि

त्रीणि । जाना । परि । भूषंति । अस्य । समुद्रे । एकं । दिवि । एकं । अप्सु । पूर्वां । अनु । प्रदिशं । पार्थिवानां । ऋतून् । प्रशासत् । विदधौ । अनुष्ठु ॥ २ ॥

## ऋगर्थः

इदानीं वैकुंठवासिविग्रहक्षीरसागरस्थशेषशायिविग्रहसमानोऽयं पूर्णावतारः । नतु अवतारांतरवदंशावतार इति श्रुतिः प्रतिपादयतीयं ॥ अस्य ( परमात्मनः ), त्रीणि ( त्रिसंख्याकानि ), जाना ( जननानि । प्रादुर्भवनानि), परि (सर्वतः), भूषंति (अलंकुर्वंति भक्तानिति-

शेषः). समुद्रे (क्षीरसागरे), एकं (शेषशायिरूपेण जन्म); दिवि (द्योतनात्मके वैकुंठे), एकं (जन्म); अप्सु (उक्त-तीर्थे=तत्तीरे च), तीर्थमूर्त्या (श्रीविठ्ठलमूर्त्या च), एकं (जन्म); नरनारायणवत् मूर्तिद्वयात्मकोऽयमवतारः ॥ अप्सु इत्यस्य लक्षणया तीर्थतीरग्रहणं काकेभ्यो दधि र-क्ष्यतामित्यादिवत् ॥ शेषशायीवैकुंठवासिवदयं पूर्णा-वतारः ॥ ननु दशावतारेषु कृष्णावतार एव पूर्णावतारः, नान्यः इत्याशंकायां । अयं कृष्णावतार एव ॥ अत्र-प्रमाणं ॥ "वृंदारण्ये महापुण्ये देवकीसूनुरेकदा ॥ हत्वा धेनुकदैतेयं गोवर्धनगतो विभुः ॥ चारयन् गोगणं प्रागात् पौंडरीकं सुरेश्वरः" ॥ १ ॥ इत्यादिवचनैरयं कृष्णावतार इति प्रतिपाद्यते ॥ उत्तरार्धेन कालप्रकाशकत्वपूर्वादिदि-ङ्निर्मातृत्वाभ्यां सुरेश्वरत्वमाह ॥ स परमात्मा ऋतून् (षड्व-संतादीन्), प्रशासत् (प्रकर्षेण नियमयन्), पार्थिवानां (पृथ्वीसंबंधिप्राणिनां), प्रदिशं (प्रकृष्टां दिशं), विदधौ (उत्पादितवान्). तथा पूर्वामनु (पश्चाद्दक्षिणादिकां), दिशं अनुष्ठु (सम्यक्), विदधौ (कृतवान्), इत्यर्थः ॥

## प्राकृतार्थ

श्रीपांडुरंगावतार हा पूर्णावतार आहे, अशा अर्था-ची प्रतिपादन करणारी श्रुति ॥

## श्रुतीचा अर्थ

प्रभु तीन ठिकाणीं प्रगट होऊन सर्व लोकांस सुशो-भित करितात. एक क्षीरसागर, व दुसरें वैकुंठ, आणि तिसरें पंढरपुर. येथें पांडुरंगरूपानें वास करून सर्व

लोकांस भूषित करितात. जो परमेश्वर वसंतादि ऋतूंला नियमित करित होत्साता पृथ्वीवर रहाणारे जे सर्व प्राणी त्यांस अखंड दिशेला उत्पन्न करिता झाला. त्याचप्रमाणें पूर्व दिशेस अनुसरून दक्षिणादिक जो दिशा उत्पन्न करिता झाला. तो कालादिकांस कारण, सर्वप्रकाशक, असा परमेश्वर तीन ठिकाणींच पूर्ण रूपानें आहे.

## वेदऋचा—

उभे भद्रे जोषयेते न मेने गावो न वाश्रा उपतस्थुरेवैः ॥
स दक्षाणां दक्षपतिर्बभूवांजंति यं दक्षिणतो हविर्भिः ॥ ३ ॥

## पदानि

उभे । भद्रे । जोषयेते । न । मेने । गावः । न । वाश्राः । उपतस्थुः । एवैः । सः । दक्षाणां । दक्षपतिः । बभूव । अंजंति । यं । दक्षिणतः । हविर्भिः ॥ ३ ॥

## ऋगर्थः

इदानीं रुक्मिण्यादिसेव्यतामाह ॥ उभे ( श्रीरुक्मिणीराधिकारूपे द्वे ), भद्रे ( कल्याणरूपे ), मेने ( स्त्रियौ ), जोषयेते ( सेवेते इव ), उच्चावचेष्वर्थेषु निपतंति इति निपाताः अनया व्युत्पत्त्या न शब्दस्य इवार्थः ॥ अथ महिषीणां भगवति प्रेमातिशयं वृंदावनादिवासकालिकधेनुदृष्टान्तेनाह ॥ वाश्राः ( हंबारवं कुर्वत्यः), गावो न गाव इव एवैः ( स्वकीयैः चारितैः), ईदृशार्थविषयकं वेदभाष्यमस्ति ॥ श्रीकृष्णमूर्तिं विलोकयंत्यः उपतस्थुः समीपस्थिता बभूवुः तथा सेवेते इति उपमालंकारः ॥ बलदेवं विनैवात्रागमनमाह ॥

वैदिकनिघंटौ दक्षशब्दः बलवाची ॥ दक्षाणां ( बलानां ), यद्बलं तस्य पतिः ( बलदेव इत्यर्थः ), ॥ बभूव ( बलरामरूपः स्वयमेवासीत् ), दक्षिणतः ( रुक्मिणीदक्षिणभागे स्थितं विठ्ठलं ), हविर्भिः ( पत्रपुष्पफलाद्युपायनैः ), अंजंति ( तर्पयंति ), स इति पूर्वेणान्वयः ॥

## प्राकृतार्थ

प्रभूच्या डाव्या भागाकडे रुक्मिणी व उजव्या भागाकडे राधिका, ह्या दोन स्त्रिया सेवन करितात. ज्याप्रमाणें पूर्वी स्नेहानें ज्यांजला पान्हा आला आहे, अशा गायी प्रेमभराच्या योगानें श्रीकृष्णालाच जशा पहात राहिल्या, त्याचप्रमाणें ह्या स्त्रिया तटस्थवृत्तीनें सेवन करीत आहेत. जो प्रभु बलरामरहित रुक्मिणीच्या दक्षिणेस बसला आहे, व सर्व भक्त ज्याची पूजा करतात, तो हा पांडुरंग भक्तांचे मनोरथ पूर्ण करित राहिला आहे. या श्रुतीला अनुसरून एक पांडुरंगाची आरती आहे:—ती. "एकेकडे राही, एकेकडे रखुमाई, भावें ओंवाळितां हरि हो झाले दोंठायीं."

उद्यंयमीति सवितेव बाहू उभे सिचौ यतते भीम ऋञ्जन् ॥ उच्छुक्रमत्कमजते सिमस्मान्नवा मातृभ्यो वसना जहाति ॥ ४ ॥

## पदानि.

उत् । यंयमीति । सविता । इव । बाहू । उभे । सिचौ । यतते । भीमः । ऋंजन् ॥ उत् । शुक्रं । अत्कं ।

अजते । सिमस्मात् । नवाः । मातृभ्यः । वसनाः । जहाति ॥ ४ ॥

## ऋगर्थः

कटिकरत्वादिस्वरूपं वर्णयति ॥ सवितेव ( सूर्य इव ), सर्वप्रकाशको विठ्ठलः ॥ उभे बाहू ( भुजे ), द्वौ परौ द्वयोः भुजबाहू इत्यमरोक्तेर्बाहुशब्दस्य स्त्रीत्वात्तद्विशेषणस्योभे तस्य स्त्रीत्वं ॥ उत् उन्नतकूर्परत्वं यथा तथा, यंयमीति (भृशमुपरतव्यापारौ कटिस्थितौ करोति), यम उपरमे इत्यस्मात् यङ्लुक् ॥ तथा उभौ सिचौ (स्वजनितजान्हव्यादितीर्थैर्लोकत्रयं सिंचयंतौ), पादौ (चरणौ), उद्यंयमीति ( संयुक्तौ करोतीत्यर्थः ); किंच भीमः ( भीमातीर्थभूतः ), ऋंजन् ( भक्तकर्माणि भर्जयन् यद्वालंकुर्वन् स्वभक्तानिति शेषः), यतते ( जनोद्धाररूपे स्वव्यापारे प्रयतते); किंच सिमस्मात् (सर्वस्मात् वर्णमात्रात् ), शुक्रं ( उदकं ), अत्कं ( हैयंगवादिकं किंचिदप्युपायनं ), अजते (आदत्ते), पत्रं पुष्पं फलं तोयं इत्यादिवचनात् ॥ यः मातृभ्यः ( प्रमिति विषयं कुर्वद्भ्यः—पश्यद्भ्यः), नवाः वसनाः ( वैकुंठादि वसतीः), जहाति (ददाति). ओहाक्त्यागे ॥ त्यागो विहापितं दानमित्यमरः॥

## प्राकृतार्थ

सूर्याप्रमाणें सर्वांला प्रकाशित करणारा, असा श्रीविठ्ठल, कंबरेवर आपले दोन भुज, वर कोंपर करून ठेवून, गंगादिक तीर्थांचें उत्पत्तिस्थानभूत असे आपले दोन्ही पाय जोडून विटेवर उभा राहिला आहे, आणि

भीमातीर्थरूप होऊन भक्तजनाला भूषित करीत असा होत्साता त्यांच्या उद्धाराविषयीं यत्नानें उदकादि घेतो; आणि आपलें दर्शन घेणाऱ्यांस वैकुंठादिक लोक देतो.

अपश्यं गोपामनिपद्यमानमा च परा च पथिभिश्चरंतम् ॥ स सध्रीचीः स विषूचीर्वसान आ वरीवर्ति भुवनेष्वंतः ॥ ५ ॥

## पदानि

अपश्यं । गोपां । अनिपद्यमानं । आ । च । परा । च । पथिभिः । चरंतं ॥ सः । सध्रीचीः । सः । विषूचीः । वसानः । आ । वरीवर्ति । भुवनेषु । अंतः ॥ ५ ॥

## ऋगर्थः

दीर्घतमा ऋषिराह ॥ पथिभिः ( नानाविधैर्मार्गैः ), गोचारणाय कौमारावस्थायामाचरंतं (ईषदेव संचारं कुर्वंतं),ततः पौगंडके वयसि पराचरंतं ( पराक् गोवर्धनाद्रिशिखरादौ संचारं कुर्वंतं ), चकारद्वयमुभयोः संचारयोः प्राधान्यार्थं यदग्नये च प्रजापतये च सायं जुहोतीत्यादिवत् गोपाम् (गोपालकृष्णम् ), अनिपद्यमानम् ( पदगतौ दिवादिः क्वाप्यगच्छंतं श्रीपुंडरीकप्रार्थनावशादेकत्रैव तिष्ठंतं ), अहं अपश्यं ॥ स्पष्टप्रतिपत्त्यर्थमुत्तरार्धेन स्वरूपं वर्णयति ॥ सः भुवनेषु ( चंद्रभागातीर्थोदकेषु ), अंतः ( अभ्यंतरे ), आस्वेन तीर्थमूर्तिरूपेण, आ वरीवर्ति ( भृशं वर्तते ) ॥ किंच सः सध्रीचीः ( सहांचतीः ), विषूचीः ( विविधं गच्छंतीः प्रतीच्यादि महादिशः कोणदिशश्च ), वसानः ( परिधानंवान् भुवनेषु लोकेषु अंतःमध्ये भूलोके पौंडरीकक्षेत्रे वर्तते ॥

## प्राकृतार्थ

दीर्घतमानामक ऋषि बोलत आहेत कीं, गाई चारण्याकरितां नानाप्रकारच्या मार्गेकरून वृंदावन व तसाच गोवर्धन शिखरादिकांचे ठायीं संचार करणारा असा जो गोपालकृष्ण त्याला श्रीपुंडरीकाच्या प्रार्थनेमुळें एके ठिकाणींच बसलेला असा पाहता जाहलों. असा पूर्वार्धाचा अर्थ जाहला. नंतर उत्तरार्धांत स्पष्टपणामुळें स्वरूपवर्णन करीत आहेत. तोच प्रभु चंद्रभागोदकामध्यें गुप्तमूर्तीनें राहत आहे, आणि त्रैलोक्यामध्यें पवित्र जें पांडुरंगक्षेत्र, त्यामध्यें कंबरेवर हात ठेऊन पुंडरीकाच्या प्रार्थनेमुळें उभा राहिला आहे. अशाविषयीं स्कंदपुराणामध्यें श्लोक आहेतः—

**वसामि तीर्थमध्येऽहं क्षेत्रमध्ये तथैव च ॥**
**ध्यात्वा तीर्थस्थितं विष्णुं दृष्ट्वा क्षेत्रस्थमुत्तमं ॥**
**सर्वान् कामानवाप्येह सायुज्यं लभते हरेः ॥**

### अर्थ

मी क्षेत्रामध्यें व तीर्थामध्यें रहातों. तीर्थाच्या ठिकाणीं राहणाऱ्या माझें ध्यान करून क्षेत्रस्थ परमेश्वराचें दर्शन घेतलें असतां, दर्शन घेणाऱ्या मनुष्यास या लोकीं इच्छित भोग आणि अंतीं विष्णूचें सायुज्यपद हीं प्राप्त होतात. या प्रमाणें श्रीपांडुरंगप्रतिपादक पुष्कळ श्रुति आहेत; परंतु ग्रंथविस्तार होईल, ह्मणून येथें मी लिहीत नाहीं. बरें असो. या प्रमाणेंच या क्षेत्राविषयीं वर्णन पुराणामध्यें ही आहे. तीं

प्रमाणें :— ब्रह्मांडपुराणे, अगस्त्यनारदसंवादे, नदी क्षेत्रस्तोत्रप्रकरणे, "शालग्रामं च वेदाद्रिं नरनारायणाश्रमम् ॥ वृंदावनं च केदारं हरिद्वारं च गोकुलम् ॥ शृंगाकुलं च श्रीकूर्मं पांडुरंगं च पीठरम् ॥ अहो बलं जगन्नाथं व्यंकटाद्रिं च नैमिषं ॥" ब्रह्मांड पुराणामध्यें, अगस्तिऋषीनें नारदास प्रश्न केला आहे कीं, 'नारदा, दर्शनमात्रेंकरून मुक्ति देणारीं क्षेत्रें व ज्या नद्या असतील त्या मला सांगा.' नंतर नारदांनीं प्रथम श्लोकापासून सांगण्यास आरंभ केला आहे. याचा अर्थ असा आहे कीं:—यांपैकीं कोणत्याही स्थानाचें दर्शन घेतलें असतां मुक्ति होते. सदरील श्लोकांतील द्वितीय श्लोकांत "पांडुरंग" असें ह्मटलें आहे. या प्रमाणेंच गरुडपुराणे, श्रीभगवता स्वस्याष्टोत्तरशतव्यक्तस्थानवर्णनाध्याये, "अहो बले गारुडाद्रौ हिरण्यासुरमर्दनं ॥ विठ्ठलं पांडुरंगं च व्यंकटाद्रौ रमासखं ॥ १ ॥ नारायणं यादवाद्रौ नृसिंहं घटिकाचले ॥ वरदं वारणगिरौ कांच्यां कमललोचनम्" ॥ २ ॥ गरुडपुराणामध्यें भगवंतांनीं एकशें आठ आपलीं राहण्याचीं स्थलें व स्थलांचें माहात्म्य सांगितलें आहे. त्यांतील हे श्लोकः— अहो, बल व गरुडाद्रि यांचे ठायीं हिरण्यकशिपूचा नाशक जो नृसिंह याचें दर्शन घेणाऱ्यांस जशी वैकुंठप्राप्ति होते, त्याप्रमाणें पांडुरंगक्षेत्राचे ठायीं विठ्ठलाच्या दर्शनमात्रेंकरून व व्यंकटाद्रीचे ठायीं रमापतीच्या दर्शनमात्रेंकरून, वैकुंठप्राप्ति होते. हा अध्याय रामानुजामध्यें प्रसिद्ध आहे.

### शिवगीता

अविमुक्ते द्वाराकायां श्रीशैले पौंडरीकके ॥
देहांते तारकं ब्रह्म लभते मदनुग्रहात् ॥ १ ॥

शिवपुरी जी काशी, व श्रीशैल, तशीच विष्णुपुरी जी द्वारका व पौंडरीकक ह्मणजे पंढरपुर क्षेत्र येथें देहांत झाला असतां, माझ्या अनुग्रहानें नरास तारकोपदेश होतो.

### चंदला माहात्म्यांतील श्लोक.

'चंदलादेविमाहात्म्ये, भीमासरिद्वर्णनप्रस्तावे'
पांडुरंगे महापुण्ये सैव पुण्यतमा स्मृता ॥१॥
तत्र स्नानेन दानेन तर्पणेन नरो भुवि ॥
अस्मिन्नवाप्य सौभाग्यममुष्मिन्याति सद्गतिम् ॥२॥

अपहाय परं धाम भगवानादिपूरुषः ॥
गोप गोपीजनानंदसंदायकदृगंचलः ॥ ॥१॥
कमलावल्लभो देवः करुणारसशेवधिः ॥
चंद्रभागातटे यत्र पुंडरीकस्य सन्निधौ ॥ ॥२॥

चंदलादेवी माहात्म्यांतील भीमानदीच्या वर्णन प्रकरणांतील श्लोकाचा अर्थः—

महा पुण्यकारक जें पंढरपुरक्षेत्र याचे ठायीं तीच भीमानदी आहे. येथें स्नान व दान केलें असतां मनुष्य या लोकीं सुख भोगून अंतीं उत्तम गति पावतो. या क्षेत्राचे ठायीं पुराणपुरुष, गोपगोपी यांप्रति आनंद देणारा असा परमेश्वर वास करीत आहे. याच्या दर्शनमात्रेंकरून मुक्ति होते.

तथा करवीरमाहात्म्ये,

तत्र श्रीविठ्ठलं देवं प्रियाभ्यां सह शोभितं ॥
तं दृष्ट्वा विस्मिता प्राह स्वप्रियं सुभगा सती ॥ १ ॥

हा श्लोक करवीर माहात्म्यांतील आहे. याचा अर्थः— प्रसिद्ध जें पांडुरंगक्षेत्र याचे ठायीं राधिका व रुक्मिणी दोन स्त्रियांनीं युक्त ( उभे भद्रे या पूर्वीं सांगितलेल्या ऋचेस अनुसरून ) असा प्रभु अवलोकन करून सती आश्चर्ययुक्त होऊन आपल्या प्रियाला बोलते.

'पद्मपुराणोत्तरखंडे, गीतामाहात्म्ये, षष्ठाध्याये जानश्रुतिभूपतेः सूतस्य तीर्थक्षेत्रपर्यटनोक्तिप्रसंगे,

ततो निवृत्त आयातः पश्यन्भीमरथीतटे ॥
द्विभुजं विठ्ठलं देवं भुक्तिमुक्तिप्रदायकं ॥ १ ॥
ततो गोदावरीजन्मस्थानं ब्रह्मगिरिर्महान् ॥

पद्मपुराणांतील उत्तरखंडस्थगीतामाहात्म्याचा अध्याय सहा, श्लोक ९८, याचा अर्थ :—जानश्रुतिनामक राजाचा सारथी तीर्थें व क्षेत्रें फिरतफिरत श्रीशैल्यापासून माघारा परतून भीमातटाकाचे ठायीं द्विभुज, व भक्तांला इच्छित सुखें आणि मोक्ष देणारा, असा श्रीविठ्ठलनामक देव, त्यास अवलोकन करून, गोदावरीनदीचें जन्मस्थान जो ब्रह्मगिरि त्यास गेला.

स्कंदपुराणांतील भीमामाहात्म्याच्या चतुर्थाध्यायांतील श्लोक.

आषाढशुक्लैकादश्यामुपोष्य हरिमर्चयेत् ॥
पांडुरंगे स्थितं देवं यः स मुक्तिमवाप्नुयात् ॥ १ ॥

कार्तिके तु सिते पक्षे एकादश्यां विशेषतः ॥
पूजयेद्गोपवेषं तं पांडुरंगे स्थितं हरिम् ॥ २ ॥

अर्थ

आषाढशुक्लएकादशीचे ठायीं उपोषण करून पंढरपुर क्षेत्राचे ठायीं राहणारा जो कोणी श्रीविठ्ठल देव याची पूजा करितो, त्या मनुष्यास मोक्षप्राप्ति होते. याचप्रमाणें कार्तिकशुक्लपक्षीं एकादशीचे दिवशीं विशेषेंकरून गोपवेषाला धारण करणारा, पांडुरंगक्षेत्राचे ठिकाणीं राहणारा, जो हरि, त्याची पूजा करणाऱ्यास मोक्षप्राप्ति होते.

शिवरहस्य, अंश पांच, अध्याय ३६ यांतील श्लोकः—

इति स्तुत्वा तदा विष्णुर्गच्छेत्यभिहितो मया ॥
अवसत्तत्र मे लिंगं दधन्मूर्ध्नि हरिस्तदा॥ ११ ॥
उवास दक्षिणे तीरे भीमरथ्यास्तदांबिके ॥
तत्पांडुरंगं क्षेत्रं हि विष्णोः प्रियकरं सदा ॥२॥

शंकर पार्वतीप्रति सांगतातः—याप्रमाणें विष्णूनें माझी स्तुति केल्यानंतर मीं 'जा' ह्मणून आज्ञा दिल्यावर विष्णूनें आपल्या मस्तकाचे ठायीं माझें लिंग धारण करून प्रभु विष्णु भीमानदीच्या दक्षिणतीराचे ठायीं वास करिते झाले. तें स्थान पांडुरंगक्षेत्र या नांवानें प्रसिद्ध, परमपवित्र, विष्णूस प्रियकारक, असें आहे. याप्रमाणें पद्मपुराणांतील, उत्तरसंहितेंतील, भीमामाहात्म्याच्या ३९ व्या॰ अध्यायामध्यें, या क्षेत्राचें वर्णन आहे. या अध्यायाचे श्लोक ७९ आहेत. त्यांतील थोडेसे श्लोकः—

पौंडरीकं महातीर्थं चंद्रभागा च तत्र वै ॥
पुष्पवत्याः संगमश्च कुंडलं तीर्थमेव च ॥ १ ॥
पद्मतीर्थं च संप्रोक्तं यत्र देवश्च विठ्ठलः ॥
एवमेतानि तीर्थानि संति चापि पुरे द्विज ॥२॥
तेषु स्नानं च दानं च पुनरावृत्तिदुर्लभम् ॥
चंद्रभागां च यः स्नात्वा कृत्वा श्राद्धं विधानवित् ॥३॥
यत्रानुष्ठानमात्रेण मुच्येत् संसारबंधनं ॥
श्रृणु नारद वक्ष्यामि कथां पुण्यां महीयसीं॥४॥
यस्याः स्मरणमात्रेण सर्वपापैः प्रमुच्यते ॥

ब्रह्मदेव नारदाप्रति सांगतातः—हे नारदा, पंढरपुर या नांवाचें महाक्षेत्र आहे; ज्या क्षेत्राचे ठायीं चंद्रभागा नदी आहे; पुष्पावती ( ह्या लहानशा नदीस हल्लीं कलीचा ओढा ह्मणतात, तोच गोपाळपुराजवळून जाऊन चंद्रभागेस मिळाला आहे.) नदीचा व चंद्रभागेचा संगम आहे, येथें श्रीविठ्ठल देव आहे. या नगरामध्यें कुंडलतीर्थ व पद्मतीर्थ ( पद्मावतीचा तलाव या नांवानें हल्लीं प्रसिद्ध आहे ). अशीं पुष्कळ तीर्थें आहेत. त्यांचेठायीं स्नान अथवा दान केलें असतां पुनर्जन्म नाहीं. याचप्रमाणें चंद्रभागेचें स्नान करून श्राद्ध केलें असतां, सर्व पितरें मोक्षास जातात. याप्रमाणें वर्णन करून पूर्वींचा इतिहास सांगितला आहे. असेंच अणखी या क्षेत्राविषयीं पद्मपुराणांत, उत्तरसंहितेंत, पांडुरंगमाहात्म्य आहे. व त्याचप्रमाणें स्कंदपुराणांतही माहात्म्य आहे. याप्रमाणें पुष्कळ पुराणांचीं प्रमाणें आहेत, परंतु विस्तारभयामुळें मी येथें लिहीत नाहीं.

विठ्ठलशब्दोत्पत्तिः ॥ वेदनं वित् ॥ विद्ज्ञानेऽस्मात् संपदादिभ्यश्चेति भावे क्विप् ॥ तेन ठाः शून्याः 'ठः शून्येति बृहद्ध्वनौ इत्यभिधानात्' ॥ तान् लाति स्वीकरोति इति विठ्ठलः 'ला आदाने' अस्माद्धातोः आतोऽनुपसर्गे क इत्यनेन सूत्रेण कः प्रत्ययः। आतो लोप इटि चेत्यनेन सूत्रेण आलोपे कृते विठ्ठल इति शब्दः सिद्धो भवति ॥ अज्ञानुग्राहक इत्यर्थः ॥ अशाविषयीं प्रमाणः—"विदा ज्ञानेन ठान् शून्यान् लाति गृण्हाति यः स्वयं ॥ अज्ञानुग्रहकृद्देवो विठ्ठलः कथ्यते बुधैः" ॥ १ ॥

ज्ञानशून्य लोकांला ग्रहण करणारा इत्यर्थः पुंडरीकाचें मागणें असेंच आहे. "ज्ञानविज्ञानहीनानां मूढानां पापिनामपि ॥ दर्शनात्ते भवेन्मोक्षः प्रार्थयामि पुनः-पुनः ॥ १ ॥

या देवाविषयीं जुन्या ग्रंथांत मंगलाचरणाच्या वगैरे संबंधानें पुष्कळ श्लोक सांपडतात त्यांपैकीं मी येथें थोडेसे लिहितों :—

धर्मशास्त्रप्रतिपादक कालनिर्णयनामक ग्रंथ आहे त्याचें हें मंगलाचरण "कालचक्रप्रयोक्तारं नत्वा श्रीविठ्ठलं गुरुं॥ धर्मशास्त्रार्थमातन्मः कालनिर्णयदीपिकाम्" ॥ १ ॥

अर्थ

कालचक्राला प्रेरणा करणारा गुरु, जो श्रीविठ्ठल, याला नमस्कार करून धर्मज्ञान होण्याकरितां कालनिर्णयदीपिकानामक ग्रंथास आरंभ करितों. हें ग्रंथकर्त्यानें श्रीविठ्ठल देवाचें मंगलाचरण केलें आहे, यावरून सह-

जच याच्या पूर्वींही हें क्षेत्र प्रसिद्ध होतें. हा ग्रंथ बराच जुना आहे. कारण याचीं प्रमाणें निर्णयसिंधुकर्त्यानें आपल्या ग्रंथांत स्थलविशेषीं घेतलीं आहेत. याप्रमाणें सप्रक्रियाकौमुदीचें मंगलाचरण पद्य:

श्रीमद्विठ्ठलमानम्य पाणिन्यादिमुनीन् गुरून् ॥
प्रक्रियाकौमुदीं कुर्मः पाणिनीयानुसारिणीम् ॥ १ ॥

हा प्रक्रियाकौमुदीचा कर्ता फारच प्राचीन आहे. कारण याच्या कौमुदीवर कृष्णपंडिताचें व्याख्यान आहे. हा कृष्णपंडित तूर्त जी कौमुदी तिचा कर्ता, भट्टोजिदीक्षित प्रसिद्ध आहे, त्याचा गुरु होता. एवंच प्रक्रियाकौमुदीकर्त्यानें ही या देवाचें वर्णन मंगलाचरणरूपानें केलें आहे. यावरून हें क्षेत्र त्यापूर्वींही प्रसिद्ध होतें. श्रीमद्भागवततृतीयस्कंध, याच्या प्रारंभीं व शेवटीं विजयध्वजांनीं मंगलरूप दोन श्लोक केले आहेत.

## श्लोक

यल्लीलाजलराशिलोललहरिस्नानक्षमाणां नृणां
संसारोदधिराशुशुष्यतितरामग्न्युप्तशुष्कैधवत् ॥
यस्माद्विश्वमशेषमुद्भवति यस्तत्त्वं परं योगिनां
श्रीमंतं तमुपास्महे सुमनसामिष्टप्रदं विठ्ठलं ॥ १ ॥
सनीरनीरदश्यामं सच्चिदानंदविग्रहम् ॥
रमारमणमीशेशं विठ्ठलं समुपास्महे ॥ २ ॥

या प्रमाणेंच कुवलयानंदाच्या टीकेंत ही या देवाविषयीं मंगलाचरण आहे. तसेंच द्वैतमतवादी राजस्वामीनें या-

चें पुष्कळ वर्णन केलें आहे; व रामानुजाचार्य वल्लभाचार्य इत्यादिकांनीं या देवाविषयीं पुष्कळ वर्णन केलें आहे. ह्या गोष्टी सांगण्याची आह्मांस जरूरी नाहीं; कारण हें स्थळ वेदप्रणीत आहे, असें आह्मीं पूर्वी सुचविलेंच आहे. तेव्हां त्यापुढें हजार दोन हजार वर्षांजवळचीं प्रमाणें विशेष वजनदार आहेत असें नाहीं. तथापि इतकेंच दाखविणें आहे कीं, हें क्षेत्र फार प्राचीन काळापासून विख्यात आहे. याच्या प्रसिद्धीची खंडना मध्यंतरीं कधींच झाली नाहीं. आतां कित्येक कमी समजुतीचे लोक हा देव बौद्धांचा आहे असें म्हणतात; परंतु त्यांचें हें बोलणें सर्वथा गैर आहे; कारण बौद्धमतखंडणकर्ते जे श्रीमच्छंकराचार्य यांनीं या देवाविषयीं एक अष्टक केलें आहे. तें बरेंच उपलब्ध आहे :—

श्रीगणेशाय नमः ॥ महायोगपीठे तटे भीमरथ्या वरं पुंडरीकाय दातुं मुनींद्रैः ॥ समागत्य तिष्ठंतमानंदकंदं परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥ १ ॥ तडिद्वाससं नीलमेघावभासं रमामंदिरं सुंदरं चित्प्रकाशम् ॥ वरं त्विष्टकायां समन्यस्तपादं पर० ॥ २ ॥ प्रमाणं भवाब्धेरिदं मामकानां नितंबः कराभ्यांधृतो येन यस्मात्॥ विधातुर्वसत्यै धृतो नाभिकोशः पर० ॥ ३ ॥ स्फुरत्कौस्तुभालंकृतं कंठदेशे श्रिया जुष्टकेयूरकं श्रीनिवासम् ॥ शिवं शांतमीड्यं वरं लोकपालं पर० ॥ ४ ॥ शरच्चंद्रबिंबाननं चारु-

हासं लसत्कुंडलाक्रांतगंडस्थलांगम् ॥ जपारा-
गबिंबाधरं कंजनेत्रं पर० ॥ ५ ॥ किरीटो-
ज्वलत्सर्वदिक्प्रांतभागं सुरैरर्चितं दिव्य-
रत्नैरनर्घ्यैः ॥ त्रिभंगाकृतिं बर्हमालावतंसं
परब्रह्म० ॥ ६ ॥ विभुं वेणुनादं चरंतं दुरंतं
स्वयं लीलया गोपवेषं दधानम्॥गवां वृंदकानं-
ददं चारुहासं परब्रह्म० ॥७॥ अजं रुक्मिणी-
प्राणसंजीवनं तं परं धाम कैवल्यमेकं तुरीयम्॥
प्रसन्नं प्रपन्नार्तिहं देवदेवं परब्रह्मलिंगं० ॥८॥
स्तवं पांडुरंगस्य वै पुण्यदं ये पठंत्येकचित्तेन
भक्ताश्च नित्यम् ॥ भवांभोनिधिं ते समुत्तीर्य
काले हरेरालयं शाश्वतं प्राप्नुवंति ॥ ९ ॥ इति
श्रीमच्छंकराचार्यविरचितं पांडुरंगाष्टकं संपूर्णम्॥

जर हा देव बौद्धाचा असता तर शंकराचार्यांनीं या देवाविषयीं कसें वर्णन केलें असतें; असें त्यांच्या मनांत कसें येत नाहीं. एवंच त्यांचें भाषण सर्वथा खोटें आहे. खरोखर विचारानें पाहिलें असतां या देवाचें वर्णन वेदांतही आहे. त्यांतील थोडींशीं प्रमाणें प्रथमतः लिहिलींच आहेत; तशींच व्यासकृत ब्रह्मांडादि पुराणें यांचीं प्रमाणें लिहिलीं आहेत. जुने मोठेमोठे ग्रंथकार यांनींही आपल्या ग्रंथांतून याचें वर्णन केलें आहे. तसेंच येथील देवाचे भक्त एकनाथादिक मोठमोठे साधु यांनीं या देवाविषयीं पुष्कळ ग्रंथ केले आहेत. त्यांविषयीं माहिती व प्रसिद्ध प्रसिद्ध साधु यांचें वर्णन पुढील तृतीय भागांत

लिहूं. एवंच हें स्थान वेदशास्त्रपुराणादिकांस मान्य असें अर्थांतच सिद्ध होतें.

श्रीगुरुचरित्रांतला या देवाविषयींचा दाखला :–

येथील आराध्ये मंडळीच्या मूळपुरुषास साक्षात् दत्तात्रेयांनीं पंढरपुरास पांडुरंगाच्या दर्शनास्तव जाण्याविषयीं सांगितलें. ही कथा गुरुचरित्राच्या, ४८ व्या अध्यायामध्यें आहे. अशी श्रीगुरूची आज्ञा झाल्यानंतर, आराध्यांचे मूळ पुरुष श्रीक्षेत्रपंढरपुरासच येऊन राहिले. त्यांचे वंशज लोक येथेंच आहेत. एवंच श्रीदत्तासही क्षेत्र मान्य आहे असें सहज सिद्ध होतें. तसेंच कलियुगांत झालेले धर्मसंस्थापनकर्ते जे आचार्य यांनीं ही ह्या देवाविषयीं पुष्कळ वर्णन केलें आहे, व आपल्यास मान्य असल्याकारणानें येथें आपुले मठ स्थापिले आहेत.

यांपैकीं मध्वाचार्यांचा मठ येथें हरिदासाच्या घांटावर दत्ताच्या पादुकांच्या पाठीमागें आहे, व रामानुजाचार्यांचा मठ व्यासाजवळ आहे, वल्लभाचार्यांचा मठ नदीच्या पलीकडेस आहे. ह्या सर्व मठांमध्यें यांच्याच संप्रदायाचे लोक रहातात. एवंच सर्व जगमान्य हें क्षेत्र आहे, आणि येथें साक्षात् वैकुंठवासी विष्णु वास करीत आहे. या देवानें पुष्कळ लोकांस चमत्कार ही दाखविले आहेत. पूर्वीं रामदास स्वामींस रामरूपानें दर्शन दिलें आहे. रामदासस्वामींनीं रामरूप पाहून मोठ्या आनंदानें वर्णन केलें आहे, त्यापैकीं एक पद.

येथें कारे उभा रामा, मनमोहन मेघश्यामा ॥
काय केली अयोध्यापुरी, येथेंवसविली पंढरी ॥
काय केली शरयू गंगा, येथें आणिली चंद्रभागा॥
काय केलें वानरदळ, येथें मेळविले गोपाळ ॥
काय केला कपिनायक, येथें आणिला पुंडरीक ॥
धनुष्यबाण काय केले, कां कर कटावरी ठेविले ॥
काय केली सीताबाई, येथें, राही, रखुमाई ॥
रामे रामदास भावे, तैसा होय पंढरिराये ॥१॥

हें पद रामदासचरित्रांत आहे. या प्रमाणेंच पांडुरंगानें नरहरिसोनारास शिवरूपानें दर्शन दिलें आहे; तसेंच चोखामेळ्याबरोबर गुरें ओढिलीं आहेत. दामाजीपंताकरितां महार झाले. नामदेवाच्या तर घरांतच राहिले होते. अशा शेंकडो कथा प्रसिद्ध आहेत; त्यांतलि कांहीं तृतीय भागांत लिहूं. एवंच हें स्थान सर्व जगद्वंद्य आहे. येथें परमेश्वर जगदोद्धाराकरितां वास करीत आहे. याविषयीं वेदाचीं प्रमाणें व पुराणांचीं प्रमाणें लिहिलींच आहेत. आतां येथील देवाच्या दर्शनाच्या फलाविषयीं वगैरे द्वितीय भागांत लिहूं. अणखी वेदादिकांत पुष्कळ प्रमाणें आहेत. व आनंदरामायणाच्या ३५ व्या अध्यायापासून ३७ व्या अध्यायापर्यंत हेंच वर्णन केलें आहे. तसेंच पूर्वी पेशवे बाजीरावसाहेब, लोकांच्या ह्मणण्याप्रमाणें कांहीं दिवसपर्यंत, या देवाविषयींची श्रद्धा नसल्याकारणानें येत नसत; पुढें सर्व पुराणें ऐकण्यापासून या देवाचें माहात्म्य त्यांस कळलें. नंतर तेही नेहमीं पांडुरंगाच्या दर्शनाकरितां येथें येऊं लागले.

तसेंच पूर्वींचे सर्व मोठमोठे श्रीमंत लोक येत असत, व अद्यापिही येतात. एवंच कांहीं अविचारी लोक या देवाविषयीं मुळींच प्रमाण नाहीं, आणि वारकरी लोकांनीं नवीन हें बंड माजविलें आहे, असें ह्मणतात. हें त्यांचें भाषण सर्वथा अज्ञानपणाचें आहे. असें वरील प्रमाणें वाचून त्यांचें त्यांसच वाटून, आपली दुर्बुद्धि सोडून, येथील पांडुरंगाच्या दर्शनास येऊन, साष्टांग नमस्कार करून, आपल्या वागपराधाची क्षमा मागतील तर भावीं मुखसोहाळ्यास मुकणार नाहींत.

## श्रीपांडुरंग प्रसन्न.

श्रीरुक्मिणीप्रियमहं रविसोम, भीमाप्रतीरनिलयं करुणासमुद्रं ॥ वंदे भवार्तशरणं सुरवंदितांघ्रि दामोदरं दरविनाशकरं नतानां ॥ १ ॥ त्रिदशकुलशरण्यं पीतकौशेयवंतं सजलघननिभांगं गीयमानं च वेदैः ॥ प्रणतदुरितवज्रीभूतपादारविंदं जितविधुसुपमास्यं विठ्ठलं नौम्यजस्रं ॥ २ ॥ विलोक्य भवसागरे विविधदुःखकीलालके ह्यनन्यशरणान् जडभ्रमयुतान् निमज्जज्जनान् ॥ नमाम्यवतुमागतं जलजलोचनं तारकं तरण्युडुपपं हि दासजनसेवितं विठ्ठलं ॥ ३ ॥ सुवर्णमुकुटोज्ज्वलन्मणिमरीचिभी राजितं स्फुरन्मकरकुंडलं रुचिरकौस्तुभोद्भासितं ॥ नतार्तिहरणोद्यतं कमलवासिनीवल्लभं दयोदधिमहं नमामि वनमालिनं विठ्ठलं ॥ ४ ॥ वेणुनादरसिकं द्विजवत्सलं पुंडरीकवरदं भज विठ्ठलं ॥ मध्यदेशवसतिर्मम वर्तते सूचनाय धृतमध्यमिति प्रभुं ॥ ५ ॥ जी-

वान् जडान्भवदवानलतप्तकायान्दुष्कर्मसंघनिरता-न्सुखवांछया च ॥ दीनान्हि दुःखशतविह्वलचेत-सश्च त्रातुं समागतमिमं भज पांडुरंगं ॥ ६ ॥ आनंद-मंदिरमहं जगदेकनाथं भक्तत्रितापनुदमद्भुतचारुली-लं ॥ वंदारुरक्षणपरं वत पांडुरंगं वंदे रमेक्षणचको-रनिशेश्वरं वै ॥ ७ ॥ शशांकसरसीरुहद्युतिजयिष्णुव-क्त्रद्युतिं लसत्कनकनूपुरं मदनसुंदरं माधवं ॥ विहं-गपतिवाहनं भुजगशायिनं पावनं नमाम्यमरनायकं प्रणतवत्सलं विठ्ठलम् ॥ ८ ॥ श्यामसुंदरदेहस्य विठ्ठ-लस्य महौजसः ॥ यः पठेत् स्तोत्रमेतद्वै स लभेद्वांछित फलं ॥ ९ ॥ इति [illegible]रूरकरकुलोत्पन्नेन काशीनाथ-सूनुना विठ्ठलेन विरचितं श्रीपांडुरंगाष्टकं संपूर्णम्.

# श्रीपांडुरंग प्रसन्न.

## भाग दुसरा.

हा भाग, येथें यात्रेस येणाऱ्या लोकांस येथील प्रसिद्ध तीर्थें व देव यांचें माहात्म्य समजावें ह्मणून, मीं स्कंदपुराणांतील व पद्मपुराणांतील जीं पांडुरंगमाहात्म्यें आहेत, त्यांच्या आधारानें लिहिला आहे. पद्मपुराणांतील माहात्म्यामध्यें पार्वती व शंकर यांचा संवाद आहे. व स्कंदपुराणांतील माहात्म्यामध्यें स्वामी कार्तिकेय आणि नारद यांचा संवाद आहे. त्या दोन्ही माहात्म्यांचे अभिप्राय घेऊन मी हें लिहितों.

[illegible] शंकराला ध्यानस्थ पाहून पार्वतीला मोठें आश्चर्य वाटलें; कारण, यांच्यापेक्षां मोठा

कोणी दुसरा देव नसून हे कोणाचें ध्यान करितात, असें मनांत येऊन ती विचारिते कीं,– "हे शंकरा, आपण सर्व देवांपेक्षां श्रेष्ठ असून ध्यान कोणाचें करीत अहां, हें मला मोठें आश्चर्य वाटतें." नंतर शंकर सांगतात,—"हे पार्वती, जो परमेश्वर आत्मानात्मविचारानें योगिलोकांसही लौकर प्राप्त न होणारा, जो ईश्वर दुष्ट कंसादिकांच्या नाशाकरितां गोकुलाचे ठायीं प्रगट झाला, त्याचें मी ध्यान करितों." पार्वती ह्मणते:—"हे शंकरा, तर मग भूमीवर आल्यावर त्यानें काय काय केलें तें सांगा." शंकर सांगतात,– "पूर्व युगामध्यें इंद्राणीचे मनांत असें आलें कीं, आपण प्रभूसहवर्तमान क्रीडा करावी. नंतर मनोरथ सिद्ध होण्याकरितां, तिनें साठ हजार वर्षें तप केलें. त्या वेळेस परमेश्वर प्रसन्न होऊन तिला वर देतात,—'हे इंद्राणी, पुढें होणार जो कृष्णावतार त्यावेळेस तूं राधा होशील; आणि तुझे मनोरथ पूर्ण होतील'. पुढें दुष्ट वधाकरितां प्रभूंनीं कृष्णावतार घेतला. व आपण पूर्वीं इंद्राणीस दिलेला वर खरा करण्याकरितां, राधेस मांडीवर घेऊन बसले असतां, हें रुक्मिणीनें पाहिलें; आणि ती मोठ्या रोषानें तप करण्याकरितां निघाली. ती, फिरतां फिरतां पुष्कळ मोठमोठीं तीर्थें, क्षेत्रें, व नद्या वगैरे पाहत पाहत डिंडिरव नामक अरण्यांत येऊन तेथें महापुण्यकारक लोहदंड या नांवाचें क्षेत्र पाहून, तेथेंच तप करीत बसली. इकडे रुक्मिणी गेल्यानंतर कृष्ण फार दुःखित होऊन विरहानें सर्व टाकून गोपाळांसहवर्तमान रुक्मिणीचा शोध-

करीत करीत डिंडिरव वनांत आले. आणि तेथें रुक्मिणीला पाहून ह्मणतात,—'हे स्त्रिये, मीं तुला असें काय भाषण केलें, कीं तूं त्यामुळें असल्या भयंकर वनांत येऊन बसलीस. पहा, ज्या वनांत किर्र दाट झाडी असल्यानें सूर्यकिरणाचाही प्रवेश होत नाहीं, व भयंकर व्याघ्रादि श्वापदें इकडेतिकडे फिरतात, अशा ठिकाणीं येऊन तप करीत बसलीस ? तेव्हां तुला आतां काय ह्मणावें."

पार्वती शंकराप्रत विचारते,—'स्वामी त्या वनाला डिंडिरव व त्या [illegible]ला लोहदंड हीं नांवें का प्राप्त जाहलीं, हें सांगा'. शंकर सांगतात.—"पूर्वी महाबलवान्, लोकांचा नाश करणारा, मोठा भयंकर, डिंडिरवनामक राक्षस होऊन गेला. त्यानें आपल्या पराक्रमानें सर्व देव पीडित केले. नंतर देव फार दुःखित होऊन, विष्णूस शरण जाऊन, राक्षसाचें कर्म निवेदन करिते झाले. तेव्हां विष्णूनें सांगितलें कीं, तुह्मीं कांहीं चिंता करूं नका; मी चंद्रनायक राजाचा मल्लिकार्जुन नामें पुत्र होऊन, त्या दुष्टाचा नाश करीन, असें देवांस प्रभूचें आश्वासन मिळाल्यानंतर देव स्वर्गलोकास जाते झाले. नंतर प्रभु रात्रीं राजपत्नीच्या स्वप्नामध्यें सूर्यरूपानें गेले, व मी तुझा पुत्र होतों, असें तीस निवेदन करिते झाले. यास्तव त्यास्थळीं सूर्यतीर्थ जाहलें. नंतर चंद्रसेनाचा मल्लिकार्जुन नामें पुत्र होऊन डिंडिरव राक्षसाशीं युद्ध करीत असतां, प्रभूंनीं मोठ्या रोषानें लोहदंड गदा घेऊन त्यास प्रहार केला, तेव्हां तो व्याकुळ होऊन पू-

वेपुण्याईमुळें 'हरे, हरे,' असें ह्मणाला; नंतर 'हरे' हा शब्द कानावर पडल्याबरोबर विष्णु गरुडावर बसून आले; व दैत्यास ह्मणाले, 'हे दैत्या, मी प्रसन्न आहें, इच्छित वर माग. दैत्य नमस्कार करून ह्मणाला 'हे प्रभो, मला एवढाच वर द्या, कीं लोहदंडानें माझा मृत्यु झाला, यास्तव येथें लोहदंडनामक क्षेत्र व्हावें, व या क्षेत्राचे दर्शनमात्रेंकरून सर्व पापीजनांचा उद्धार व्हावा. येथें गदा पडली, यास्तव हें गदातीर्थ व्हावें, आणि हें अरण्य माझ्याच नांवानें प्रसिद्ध व्हावें. हें त्याचें वचन ऐकून प्रभु दैत्यास ह्मणतात; 'हे दैत्या, सर्व तुझ्या ह्मणण्याप्रमाणें होईल,' असें सांगून विष्णु अंतर्धान पावले.

यामुळें त्या वनाला 'डिंडिरव' हें नांव व क्षेत्राला 'लोहदंड' असें नामाभिधान प्राप्त झालें. आणि मल्लिकार्जुननामक विष्णूचा अवतार ज्यास्थळीं जाहला, तेथें मल्लिकार्जुन या नांवाचें शिवलिंग हल्लीं आहे. हें देवालय हेमाडपंती आहे. याच्या दर्शनानें शिवलोकप्राप्ति होते. 'हे पार्वती मी ध्यान कोणाचें करितों तें तुला सांगतों, ऐक'.

## पुंडरीकाची कथा.

लोहदंड क्षेत्राचे ठायीं जानुदेवनामक कोणी एक मोठा विद्वान्, एकपत्निक, सुशील असा ब्राह्मण होता. याच्या स्त्रियेचें नांव सत्या. या ब्राह्मणाला एक पुत्र जाहला, त्याचें नांव पुंडरीक. हा पूर्वीं फारच दुष्टस्वभावाचा होता; व आईबापांस पीडा देत असे, याच्या त्रासानें

जानुदेव व सत्या हे मातापितर काशीस गेले. नंतर थोड्याच दिवसांनीं पुष्कळ लोक काशीस निघालेले पाहून पुंडरीकाच्याही मनांत आलें कीं, काशीस लोक जातात तर तेथें काय मजा आहे ती आपणही पहावी. नंतर आपल्या कुटुंबास घेऊन तो निघाला, आणि जातां जातां अस्तमानाच्या वेळेस मार्गामध्यें एक ऋषीचा आश्रम पाहून तेथेंच त्यानें मुक्काम केला. त्या ऋषीचें नांव कुक्कुट ऋषि. तो कुकुट ऋषि मातापितरांच्या सेवेंत नेहमीं तत्पर असे; या कारणानें त्याच्या दर्शनास गंगा, यमुना, सरस्वती, [illegible]गादिक नद्या प्रत्यहीं येत असत. प्रारब्धयोगानें त्या रात्रींही त्या भागीरथी, यमुना, आणि सरस्वती, ह्या नद्या डोक्यावर कुंभ घेऊन तेथें आल्या; आणि त्याचें दर्शन घेऊन दिव्यदेह झाल्या. हें पुंडरीकानें सर्व कृत्य पाहिलें, व त्याला मोठें आश्चर्य वाटलें, आणि नमस्कार करून विचारतो, 'तुह्मी कोण'? गंगादिक नद्या पुंडरीकास, ऋषीच्या दर्शनानें पवित्र जाहलेला पाहून बोलतात, 'मी' गंगा, ही यमुना, ही सरस्वती.' त्रैलोक्याच्या पापक्षालनानें आह्मांला मलिनता येते, व ऋषीच्या दर्शनानें पुनः पूर्वरूपाची प्राप्ति होते. हें ऐकून पुंडरीक ह्मणतो एवढें ऋषीचें काय पुण्य आहे? नद्या सांगतात, 'हे पुंडरीका, मातृदेवो भव ॥ पितृदेवो भव ॥ याचा अर्थ. आई व बापच आहेत देव ज्याला असा तूं हो. या श्रुत्यर्थाप्रमाणें हा ऋषि, बापाला व आईला साक्षात् शिवपार्वती मानून सेवा करीत आहे. हें ऐकून पुंडरीकास मोठा पश्चात्ताप जाहला. नंतर नमस्कार

करून बोलतो, 'हे गंगे, मीं तरी आईबापांस फारच छ-ळिलें. मला कोणता नरक प्राप्त होइल. हें कळत नाहीं, तर हे मातुश्री गंगे, मला प्रायश्चित्त सांग.' गंगा बोलते, –'हे पुंडरीका, तूं या ऋषीच्या दर्शनानें व पश्चात्तापानें पवित्र झाला आहेस आतां तूं आपल्या मातापितरांची सेवा कर ह्मणजे साक्षात् विष्णु तुला प्रसन्न होईल असा माझा वर आहे.' नंतर पुंडरीक, गंगादिक नद्या व ऋषि यांस नमस्कार करून निघाला, आणि आपल्या आश्र-मास गेला. नंतर रात्रंदिवस मातापितरांची सेवा करूं लागला. त्या सेवेनें परमेश्वर संतुष्ट होऊन त्यास वर देण्याकरितां गोपाल व सर्व देव यांच्या सहवर्तमान पुं-डरीकाच्या आश्रमाचे ठायीं प्राप्त झाले; नंतर पुंडरीकानें घनश्याम ह्मणजे सजलमेघाप्रमाणें शामवर्ण, पिवळा पितांबर नेसलेली, सहस्र सूर्यांप्रमाणें जिची कांती आहे, गळ्यामध्यें वैजयंती माळा धारण केलेली, कानांतील म-कराकार कुंडलांची कांति गालांवर पडली आहे, अशी प्रसन्नवदन मूर्ति पाहून तो वेडावला, (शंकराचार्यांनीं ही आपले अष्टकांत स्वरूपाचें असेंच वर्णन केलें आहे.) आणि कर्तव्य विसरून नाचूं लागला व हसूं लागला. हा त्याचा भाव अवलोकन करून प्रभूला मोठा आनंद झाला, नंतर थोड्या वेळानें पुंडरीकानें साष्टांग नमस्कार करून प्रभूची स्तुति केली, व उगीच उभा राहिला. इतक्यामध्यें सनकादिकांसहवर्तमान ब्रह्मदेव तेथें येऊन ह्मणाले, 'हे प्रभो, याला इच्छित वर द्या;' नंतर पांडुरंग बोलतात,– 'हें पुंडरीका, तुला मी प्रसन्न आहें, वर माग.

वर देणारा असा मी प्रसन्न असतां दुर्लभ कांहींच नाहीं असें समज.' नंतर पुंडरीक नमस्कार करून बोलतो, 'हे प्रभो, मला एवढाच वर द्या कीं, येथें आपण याच रूपानें वास करून या क्षेत्राचे ठायीं कसेही पापी लोक अनन्यभावें शरण आल्यास त्यांचें पाप नाहींसें करून दर्शनमात्रें त्यांस मोक्ष द्यावा.' नामदेव त्याच अभिप्रायास अनुसरून एका अभंगांत ह्मणतातः— "पुंडरीक ह्मणे देवा मुकुटमणी, परिसा विनवणी एक माझी ॥ पंच-महापातकी विश्वासघातकी, ज्यांशीं यमादिकें गांजविलें॥ ऐशिया पतिता त्वां करावें सनाथ, पुरवी माझा अर्थ पांडुरंगा ॥" 'हे प्रभो, येथें तीर्थरूपानें हि आपण वास करा आणि हें क्षेत्र सर्व क्षेत्रांमध्यें श्रेष्ठ व माझ्या नामानें अंकित असें व्हावें. हे देवा तूंही माझ्या नामानें अंकित हो. मला याप्रमाणें वर द्यावेत' नंतर प्रभु 'तथास्तु' ह्मणून पुंडरीकाच्या वचनाप्रमाणें क्षेत्रामध्यें राहिले आहेत. त्या देवाचें 'ज्ञानशून्यान् जनान् गृह्णन् विठ्ठलोऽभूत्तदाख्यया' ॥ ज्ञानहीन लोकांचा संग्रह करित होत्साता प्रभु विठ्ठल या नांवानें प्रसिद्ध जाहला आहे. जानुदेव हा पुंडरीकाचा पिता. हा ब्राह्मण मोठा विद्वान् पवित्र असे. याचें देवालय पुंडरीकाच्या डावेबाजूस हल्लीं आहे. याचें दर्शन अवश्य घ्यावें.

## भीमा नदी.

पूर्वीं त्रिपुरासुर सर्व लोकांस पीडा देत असतां सर्व देव शंकरास शरण गेले, नंतर शंकरानें देवांच्या प्रा-

र्थनेनें त्रिपुरासुरास जिंकण्याकरितां भूमिरूप रथावर एक पाय ठेऊन, व एक पाय नंदिकेश्वरावर ठेऊन, भयंकर युद्ध करून त्रिपुरासुरास जिंकिलें. त्यावेळेस श्रमानें शंकरास घाम आला, तोच घाम पांडुरंगक्षेत्रास भूषित करण्याकरितां नदीरूपानें येत येत पंढरपुराजवळ आला; नंतर नदीचा तो भयंकर शब्द ऐकून क्षेत्रांतील लोक भयभीत होत्साते क्षेत्रपाल जो भैरव त्यास शरण गेले, आणि नमस्कार करून बोलतात, 'हे भैरवा, आमच्या क्षेत्रास कांहींतरी मोठें अरिष्ट आलें आहे. पहा, ज्याचा शब्द प्रलयकाळींच्या मेघाप्रमाणें होत आहे, असें हें आहे तरी काय? तर आह्मांला या विघ्नापासून संभाळा. नंतर भैरवानें सर्व लोकांस अभय दिलें. व मोठ्या रोषाच्या योगानें हातांत दंड घेऊन नदीपाशीं आला. ती भैरवाची अक्राळविक्राळ व भयंकर मूर्ति पाहून भीमा नदी भयभीत होऊन थरथरां कापूं लागली, आणि श्रीपांडुरंगाची स्तुति करूं लागली, 'हे विठ्ठला, हे जगन्निवासा, हे जगदोद्धारा, प्रभो, पूर्वी जसें तुह्मीं नक्रापासून गजेंद्रास संभाळलें, त्याप्रमाणें मला या क्षेत्रपालापासून संभाळावें. याप्रमाणें पुष्कळ रीतीनें श्रीपांडुरंगाची स्तुति केली. नंतर पांडुरंग ह्मणतात, 'हे भीमे, तूं भय पावूं नको; माझ्या कृपेनें तुला भय नाहीं. परंतु, माझे आज्ञेनें या क्षेत्रभागामध्यें शब्द न करितां वहात जावें, व जे पातकी लोक येतील त्यांचीं पातकें स्पर्शमात्रेंकरून नाहींशीं करावींत. नंतर भीमा 'तथास्तु' ह्मणाली, आणि क्षेत्रभागामध्यें

प्रभूचे आज्ञेप्रमाणें शब्द न करितां अद्याप वहाते. ही नदी भीमकर्मापासून जाहाली, ह्मणून हिला भीमा हें नांव प्राप्त जहालें. ही भीमा नदी भागीरथीपेक्षां ही श्रेष्ठ आहे. कारण, प्रभु पुंडरीकप्रार्थनेंमुळें आपणच नदीरूप जाहले आहेत, यास्तव या नदीच्या दर्शनमात्रेंकरून सर्व पापें दूर होतात. मांडव्य ऋषि ह्मणजे ज्यास तूर्त मांडवखडकी असें ह्मणतात, त्या स्थलापासून विष्णुपदापर्यंत या नदीस चंद्रभागा असें दुसरें नांव प्राप्त झालें आहे. हें शंकराचें वाक्य ऐकून पार्वती शंकरास विचारिते, हे देवदेवा, या नदीस हें दुसरें नांव प्राप्त होण्याचें कारण मला सांगा. नंतर शंकर सांगतात. पूर्वीं बृहस्पतीची बायको तारा, चंद्रानें भोगिली, हें कर्म बृहस्पतीनें पाहिलें. नंतर रोषानें शाप दिला, 'हे चंद्रा, तूं असा दुष्ट आहेस त्यापेक्षां क्षयरोगी होशिल.' असा शाप दिल्यावर चंद्र मोठ्या दुःखानें युक्त होऊन बृहस्पतीची स्तुति करिता झाला. हे गुरुवर्या, मला आतां या दुःखापासून मुक्त करणारा असा आपल्यावांचून दुसरा कोणी नाहीं, तर आतां मजवर कृपा करून माझे सर्वापराध क्षमा करावे. अशी स्तुति ऐकून गुरु संतुष्ट झाले, आणि बोलतात, 'हे चंद्रा, माझा शाप सर्वथा खोटा होणार नाहीं. तथापि डिंडीरववनामध्यें लोहदंडक्षेत्र आहे, तेथें सूर्यतीर्थ आहे, त्या तीर्थामध्यें स्नान करून पांडुरंगाचें दर्शन घेऊन सूर्याचें ध्यान कर, ह्मणजे कृष्णप्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत तुला क्षयरूपता राहील; नंतर शुक्लप्रतिपदेपासून पौर्णि-

मेपर्यंत वृद्धि होईल. 'जा, लवकर उपाय कर.' नंतर चंद्र गुरूचें वाक्य ऐकून, हे गुरो, आज्ञेप्रमाणें करितों असें बोलून, साष्टांग नमस्कार करून निघाला, व भीमानदीतीरस्थ जें सूर्यतीर्थ त्याचें स्नान करून पांडुरंगाचें दर्शन घेऊन सूर्याराधना करीत बसला, तेणेंकरून त्याचें सर्व पाप गेलें. नंतर सूर्य प्रसन्न होऊन सूर्यानें चंद्राला पौर्णिमेपर्यंत वृद्धि पावणारी अशी कला देऊन अंतर्धान पावला. हे पार्वती, या नदीचे ठायीं चंद्राचा दोष जाऊन कलारूप भाग मिळाला ह्मणून या क्षेत्रभागांतील नदीस "चंद्रभागा" हें दुसरें नांव प्राप्त झालें. त्या साक्षीस्तव येथें भीमा चंद्राकार जाहली आहे. येथें स्नान केलें असतां गुरुपत्नीगमनादि महापातकांपासूनही मनुष्य मुक्त होतो.

या भीमा नदीचा, 'निरा' नामक नदीशीं संगम आहे. हा संगम या क्षेत्रापासून बारा कोसांवर आहे. तेथें नृसिंहपुरनामक क्षेत्र आहे. हें क्षेत्र या पांडुरंगक्षेत्राचें उत्तरेकडील बहिर्द्वार आहे. येथें नृसिंहमूर्ति आहे. हें क्षेत्रही परमपवित्र आहे. याच्या दर्शनानें सर्व पापें जातात. येथें मृत्यु आला असतां वैकुंठप्राप्ति होते. याविषयीं परमपवित्र एक इतिहास सांगतों, ऐक. 'पूर्वी ब्रह्मदेशामध्यें मोठा विद्वान् कोणी एक ब्राह्मण होता. तो वंगदेशाला गेला. नंतर तेथील दुर्जनांनीं दारू, मांस, इत्यादिक पदार्थांच्या योगानें त्याला बाटविलें. नंतर तो सर्व ब्रह्मकर्म टाकून एक शूद्रस्त्री ठेवून राहिला. मद्यमांसा-

दिकांसहवर्तमान तिच्याशीं व्यवहार करीत असतां ती मरण पावली. नंतर दुसरी षोडशवर्षांची सुस्वरूप स्त्री चांडालाची पाहिली; नंतर तिलाच ठेवून राहिला; तिला पुढें तीन मुलगे व दोन मुली जाहल्या. त्यांच्या सुखानें वागत असतां त्याला आपल्या ब्राह्मणपणाची स्मृतिसुद्धां नाहींशी जाहली. कोणे एके काळीं मृगया करण्याकरितां बरोबर कुत्रें घेऊन अरण्यांत गेला. इकडे प्रारब्धानें घरास आग लागून सर्व मनुष्यें जळून मेलीं. येऊन पाहतो तों घर व मनुष्यें जळत आहेत, व अग्निशमनापासून फल नाहीं, हें पाहून, मोठ्या दुःख[illegible]मूर्छित होऊन पडला; नंतर थोड्या वेळानें सावध होऊन विचार केला कीं, आतां रडून उपयोग नाहीं. बरें, आपलीं सर्व मनुष्यें व सर्व सामान नाहींसें झालें, तर आतां आपण तरी वांचून काय करावयाचें आहे; असा निश्चय करून निघाला. व मोठमोठीं अरण्यें वगैरे फिरत फिरत सहज या नृसिंह क्षेत्राचे ठायीं आला; आणि संगमतीर्थाचें स्नान केलें, व उपवासानें लौकरच मरण पावला. नंतर त्यास न्यावयाकरितां, मोठा पापी असल्याकारणानें, यमदूत आले, व नृसिंहक्षेत्राचे ठायीं मेल्याकारणानें, विष्णुदूत आले, आणि त्यांचा वाद होऊन विष्णुदूतांनीं विमानांत बसवून त्यास वैकुंठास नेला. तो अद्यापि 'मुकुंद'नामक पार्षद होऊन विष्णूपाशीं वास करीत आहे. या क्षेत्राचे ठायीं साक्षात् प्रभु विष्णु नृसिंहरूपानें आहेत. रात्रीं देव त्यांची पूजा करि-

तात, त्या वेळेस घंटेचा नाद स्पष्ट ऐकावयास येतो. यास्थळीं कसाही पापी आल्यास त्याचा उद्धार होतो. याकरितां मनुष्यांनीं या क्षेत्राचे ठायीं मोठ्या प्रयत्नानें वास करावा. याप्रमाणें श्रीक्षेत्र पंढरपुराच्या उत्तरेकडील द्वार जें नृसिंहपुर त्याचें माहात्म्य आहे.

## अगस्त्यतीर्थ.

परमपवित्र, देव व ऋषि यांनीं वंदित, असें हें तीर्थ नृसिंहपुरीच्या अलिकडे आहे. यातीर्थाचे ठायीं अगस्त्य ऋषीनें तप केलें व त्यास सिद्धि जाहली, ह्मणून या तीर्थास अगस्त्यतीर्थ असें ह्मणतात. हें तीर्थ सत्याहत्तर हात लांबीरुंदीचें आहे. या तीर्थांत लिंगमूर्तीनें महादेव आहे. येथें स्नान केलें असतां शिवलोक प्राप्त होतो. यास प्रमाण, स्कंदपु०, अध्याय ४, यांतील श्लोक:— 'ततोऽगस्त्यमिति ख्यातं तीर्थं देवर्षिसेवितं ॥ सप्तसप्तति हस्तं तत्स्नानादेवोर्ध्वलोकदं ॥ १ ॥ अगस्तिस्तु तपस्तप्त्वा तत्र सिद्धिमवाप ह ॥ जलमध्ये लिंगमूर्तिरहं तिष्ठामि पूजितः' ॥ २ ॥

## गणपतितीर्थ.

हें तीर्थ अगस्त्यतीर्थाच्या पूर्वेस आहे. या तीर्थीं गणपतीनें स्नान करून श्रीकृष्णाचें आराधन केलें, व कृष्णप्रसाद जाहला. नंतर गणपति परमपवित्र स्थान पाहून आपण ही येथेंच राहिले, यामुळें या तीर्थास गणपतितीर्थ ह्मणतात. या तीर्थांत स्नान करून गणपतीचें दर्शन घेतलें असतां सर्व विघ्नें नाश पावून गणपतीचें सायुज्य प्राप्त होतें. यास आधार.

श्लोकः—'गाणपत्यं ततः पूर्वं तीर्थं विघ्नविनाशनम् ॥ यत्राराध्य जगन्नाथं गोविंदं गोपवल्लभम् ॥ १ ॥ तन्मंत्रस्यांगतां प्राप्य स्थितस्तत्र विनायकः ॥ तत्र स्नात्वा सकृन्मर्त्यो विघ्नसंघानयत्नतः ॥ २ ॥ विधूय सर्वपापानि गणेशत्वं च गच्छति' ॥

## संकर्षणतीर्थ.

हें तीर्थ गणपतितीर्थाच्या पूर्वेस आहे. बलराम तीर्थयात्रा करीत करीत या तीर्थी आले. व स्नान करून पहातात तों साक्षात् पांडुरंगमूर्ति दृष्टीस पडली. बलरामानें पांडुरंगमूर्तीस सांष्टाग नमस्कार केला. नंतर पांडुरंग बोलले, 'हे बलरामा, वर माग' प्रभूचें वाक्य ऐकून राम बोलतात, 'हे देवा, मला असा वर द्या कीं, येथें जो स्नान पान, इ० करील त्याला आपली सायुज्यप्राप्ति व्हावी. नंतर पांडुरंग 'तथास्तु' ह्मणाले. त्या कारणानें हें तीर्थ संकर्षणतीर्थ या नांवानें प्रसिद्ध जाहलें आहे. यास प्रमाण श्लोकः— प्रत्यक्षं रूपिणं देवं पांडुरंगमपश्यत ॥ वरदोऽस्मीति तेनोक्तो वरमेनमयाचत ॥ १ ॥ मन्नाम्नैव भवेत्तीर्थं स्नानात्सायुज्यदायकं ॥ एवमस्त्विति तस्योक्त्वा तत्रैवांतर्दधे हरिः ॥ २ ॥ तत्र स्नात्वा च पीत्वापः सायुज्यं लभते नरः ॥ तस्मात्पूर्वं च जाबालेस्तीर्थं पापप्रणाशनम्' ॥ ३ ॥

## जाबालितीर्थ.

हें जाबालितीर्थ—परमपवित्र आहे. तेथें जाबालि ऋषीनें तप केलें ह्मणून या तीर्थाला जाबालितीर्थ असें

ह्मणतात, येथें स्नान केलें असतां, स्वर्गलोक प्राप्त होतो. श्लोकः 'जाबालिस्तु तपस्तप्त्वा सिद्धिं यत्राप निर्मलाम् ॥ तत्र स्नात्वांजसाप्नोति नरः स्वर्गमयत्नतः' ॥ १ ॥

## ब्रह्मतीर्थ.

हें तीर्थ जाबालितीर्थाच्या पुढें आहे. याचें मान पन्नास धनुष्यें आहे. या तीर्थी पूर्वी ब्रह्मदेवानें विष्णूची आराधना करून, प्रसाद संपादन केला. येथें स्नान केलें असतां, अश्वमेध यज्ञाचें फल प्राप्त होतें.

## पंचगंगा.

हें तीर्थ क्षेत्रापासून दीड कोसावर उत्तरेकडे आहे. येथें पांच नद्या आहेत. त्यांचीं नांवें:— तुंगा, सती, सुना, कीर्ति, भृंगारी. या पांच नद्या आहेत. येथें सावर्णि मनूनें शिवलिंग स्थापन केलें आहे. हें तीर्थ फारच पुण्यकारक आहे. येथें शिवरात्रीस यात्रा भरते. या नद्यांचें स्नान करून शंकराचें दर्शन घेतलें असतां शिवलोक प्राप्त होतो.

## मांडव्यस्थानतीर्थ.

यास तूर्त 'मांडवखडकी' असें ह्मणतात. येथें पूर्वी मांडव्य ऋषीनें तप केलें, व त्यास सिद्धि प्राप्त झाली. त्याच्या पुढें 'कलशतीर्थ' आहे. येथें विष्णु गुप्तरूपानें वास करितात.

## पितृतीर्थ.

हें तीर्थ कलशतीर्थाच्या पुढेंच आहे. या तीर्थाची लांबी रुंदी सात हात आहे. या तीर्थी अर्यमादि पितर

वास करितात. येथें श्राद्ध करून पितरांस पिंड दिला असतां, सप्त गोत्रांचा उद्धार होतो; अथवा स्नान करून पितराचें तर्पण केलें असतां एकवीस पितरांचा उद्धार होतो. हें तीर्थ गयेपेक्षांही शतगुणित पुण्य देणारें आहे. याकरितां येथें स्नान, पितृतर्पणादिक कर्में, अवश्य करावींत.

## चक्रतीर्थ.

हें तीर्थ पितृतीर्थाच्या दक्षिणेस आहे. याची लांबीरुंदी नऊ हात आहे. येथें चक्रांकित शिला अद्यापि ही केव्हां केव्हां दिसतात. येथें स्नान केल्यास स्वर्गलोकप्राप्ति होते.

## व्यासतीर्थ.

हें तीर्थ व्यासदेवाच्या समोर आहे. येथें व्यासानें तप केलें नंतर त्यास व्यासत्व प्राप्त झालें, ह्मणून या तीर्थास व्यासतीर्थ असें ह्मणतात येथें स्नान करून व्यासाचें ध्यान केलें असतां सुबुद्धि प्राप्त होते.

## लक्ष्मीतीर्थ.

हें तीर्थ लखूबाई देवीच्या समोर आहे. येथें पूर्वीं लक्ष्मीनें मोठें तप केलें; ज्या तपाच्या योगानें विष्णूच्या हृदयावर तिला जागा मिळाली. या तीर्थाचें पूजन केलें असतां लक्ष्मी प्राप्त होते.

## तीर्थपंचक.

या लक्ष्मीतीर्थाचे पुढें 'शंखतीर्थ,' 'चक्रतीर्थ,' 'गदातीर्थ,' 'पद्मतीर्थ,' आणि 'गोपिकातीर्थ' हीं 'पांच

तीर्थें' आहेत. यांचें प्रमाण साठ हात आहे. येथें स्नान केलें असतां, सर्व पातकें जाऊन इच्छित फल प्राप्त होतें. याप्रमाणेंच श्रीपुंडरीकाचे समोर 'मुक्तकेशी' नामक तीर्थ आहे. येथें स्नान केल्यास मोक्षप्राप्ति होते.

## विष्णुपद.

हें स्थान फारच पवित्र आहे. सभोंवतीं श्रीचंद्रभागेचें पाणी असल्याकारणानें अप्रतिम दिसतें. याच्या दर्शनाकरितां मार्गशीर्षमासीं यात्रा भरत असते; व गांवांतील लोकही भोजनाकरितां येथें जातात. हें उत्पन्न होण्याविषयींचा असा इतिहास आहे कीं, पूर्वीं 'संगम' नामक कोणी एक राक्षस होता. या राक्षसाचें आणि श्रीकृष्णाचें भयंकर युद्ध जाहलें. या युद्धामध्यें श्रीकृष्ण आपणास खरोखर मारतो असा विचार करून राक्षस कृष्णापासून पळून गेला. आणि मनामध्यें रोष धरून प्रभूला मारावें असा नेहमीं विचार करीत राहिला. गाई व गोपाळ यांसहवर्तमान एके समयीं प्रभु क्रीडा करीत असतां, राक्षसाच्या मनामध्यें असें आलें कीं, या सर्वांस मारण्याची तूर्त संधि बरी आहे. असा विचार करून, मोठी पर्वतप्राय शिला आपल्या मस्तकावर धारण करून, राहिला. हें कर्म प्रभूंनीं पाहून वेणु वाजवीत वाजवीत त्या नादानें सर्वांस मोह घालून प्रभु एकदम त्या शिळेवर जाऊन उडून उभे राहिले. आणि मोठ्या भारानें इकडे तिकडे फिरून, त्या राक्षसाचा चूर केला. त्या वेळेस शिळेवर प्रभूचे पाय उम-

टले; त्यांपैकीं अठरा पदें अद्यापि त्या शिळेवर दिसतात. त्या पदांचीं नांवें पुराणांतून प्रसिद्ध आहेत. तीं येणेंप्रमाणें. त्या पदांचीं नांवें:—१ ब्रह्मपद, २ रुद्रपद, ३ इंद्रपद, ४ कार्तिकपद, ५ चंद्रपद, ६ सूर्यपद, ७ आह्वनीयपद, ८ गार्हपत्यपद, ९ दक्षिणाग्निपद, १० सभ्यपद, ११ आवसथ्यपद, १२ गणेशपद, १३ क्रौंचपद, १४ अगस्तिपद, १५ कश्यपपद, १६ कण्वपद, १७ दिंदिचिपद, १८ मतंगजपद. येथें श्राद्ध करून, पितरांस पिंड दिले असतां सर्व पितरांचा उद्धार होतो. हें स्थान गयेपेक्षांही श्रेष्ठ आहे. चंद्रभागेचें स्नान करून, विष्णुपदाचें दर्शन घेतलें असतां, सर्व इच्छित पूर्ण होतें, आणि अंतीं वैकुंठपदाची प्राप्ति होते. प्रभूंनीं भोजन केलेल्या ठिकाणीं, दहींभाताचीं शितें अद्यापि दिसतात. येथें भोजन केल्यास मोठें पुण्य प्राप्त होतें. येथें चंद्रभागेच्या सर्व प्रदेशामध्यें गाईचीं खुरें व गोपालांचीं पदें उमटलेलीं दिसतात. हें देवालय बांधल्याचा शोध मुळींच लागत नाहीं, परंतु वरील भागाचा जीर्णोद्धार चिंतामण नागेश ऊर्फ काका बडवे यांनीं केला. यास वर्षें सत्याण्णव जाहलीं.

## गोपालपुर.

यास्थळीं श्रीकृष्ण गाई चारीत असत. येथें गोपालकृष्णाची मूर्ति आहे. ही मूर्ति उभी असोन, वेणु वाजवीत आहे. ह्या मूर्तीच्या दर्शनास ब्रह्मादिक देव ही येतात. हें स्थान फारच पवित्र आहे. आपल्यास

पवित्रता यावी अशा इच्छेनें येथें आलेल्या प्रत्येक मनुष्यानें याचें दर्शन अवश्यमेव घ्यावें, व याची पूजा करावी. येथें जप, होम, इ० केले असतां, अनंतपट होतात. स्कंद० ॥ पांडु० अध्याय ॥ ९ ॥

श्लोक.

'तत्समीपे वेणुधारी गोपालपुरमाश्रितः ॥
क्रीडन्गोपगणैः साकमास्तेऽद्यापि हरिः स्वयम् ॥१॥
प्रयत्नेनेक्षितव्यश्च संपूज्यः शुद्धिमिच्छता ॥
जपहोमादि तत्रैव विशिष्टफलदं भवेत् ॥२॥

हें देवालय हेमाडपंती आहे. याचा जीर्णोद्धार, सातारा येथील राहाणार गोपाळराव अनगळ, या नांवाचे मोठे श्रीमान् गृहस्थ होते त्यांनीं केला. हे शालिवाहन शके १६६७, क्रोधननामसंवत्सर, यावर्षीं येथें यात्रेस आले होते. नंतर गोपालकृष्णाच्या दर्शनास गेले; व तेथील अनादि जीर्ण जाहलेलें देवालय पाहून, त्यांनीं त्याचसंवत्सरांत त्याचा जीर्णोद्धार केला. यास वर्षें १३७ झालीं. याच देवालयाच्या ओवऱ्या तळेकर दाभाडे यांनीं बांधिल्या. या दोन्हीविषयींची ही शिळालिपि तेथेंच आहे. या देवालयांतील खालील भागांत जनाबाईची मूर्ति व एक महादेवाचें देवालय आहे. येथें आषाढी व कार्तिकीचे यात्रेस आलेले भक्तलोक आषाढशुद्ध १५ व कार्तिकशुद्ध १५ चे दिवशीं काल्याचा उत्साह करितात. हें स्थान फारच पुण्यकारक, व रमणीय, श्रद्धायुक्त भक्तांस पाहण्यास योग्य, अस

आहे. याचें वर्णन गोपाळपुर माहात्म्यामध्यें पुष्कळ केलें आहे.

## नारद.

नारद येथें येऊन राहण्याचें कारण स्कंदपुराणामध्यें असें सांगितलें आहे कीं,– पूर्वीं नारदांनीं शंकरास प्रश्न केला; 'हे शंकरा, तीर्थ, क्षेत्र, आणि देव या तिन्ही गोष्टी एकत्र आहेत असें क्षेत्र सांगा.' नंतर शंकरांनीं पंढरपुरक्षेत्र असें आहे ह्मणून सांगितलें. आणि येथील सर्व माहात्म्यही त्यास निवेदन केलें. नंतर नारदाच्या आग्रहामुळें श्रीपाडुरंगाच्या वक्षस्थलावरती [illegible]णारा मंत्र, ज्या मंत्राचा जप बलराम, रुक्मिणी व प्रद्युम्न सदोदित करितात, तो मंत्र नारदास सांगितला. नंतर नारद पंढरपुरक्षेत्रास येऊन, विष्णुपदासमीप राहून, अद्यापि नेहमीं जप करीत आहेत. हें नारदाचें देऊळ नदीपात्रांत विष्णुपदासमीपच आहे.

## व्यास.

पूर्वीं भगवान् श्रीवेदव्यास यांनीं पुष्कळ दिवस तप केलें; ज्या तपाच्या योगानें पांडुरंगप्रसाद झाला. नंतर हें क्षेत्र फारच पवित्र आहे, असा विचार करून, व्यास येथेंच राहते जाहले. यांचें दर्शन घेतलें असतां ज्ञानप्राप्ति होते. व्यासांचें देवालय बरेंच मोठें आहे. हें लखुबाईच्या जवळ आहे. येथें साधुलोक राहतात.

## पद्मतीर्थ.

हें तीर्थ पांडुरंगाच्या पश्चिमेकडे आहे. येथें श्रीवि-

ष्टलांनीं आपल्या हातांतील पद्म ह्मणजे कमल ठेविलें होतें. ह्मणून या तीर्थास पद्मतीर्थ असें ह्मणतात. येथें पद्मावती देवी आहे. या तीर्थाचें स्नान करून, पद्मावती-देवीचें दर्शन घेतल्यास मनुष्य वैकुंठास जातो. या विषयीं पूर्वींचा इतिहास असा आहे कीं, पूर्वीं सुशर्मानामक कोणी एक ब्राह्मण होता. हा ब्राह्मण फारच पापी असे, कारण गुरुपत्नीबरोबर जाणारा, मद्य प्राशनक-रणारा, व मांसभक्षण करणारा, असा होता. हा ब्राह्मण दैवयोगानें फिरतां फिरतां या तीर्थीं आला. आणि उष्ण-तेच्या संबंधानें या तीर्थाचें स्नान करून, सहजच देवीचें दर्शन घेऊन, मृगया करण्याकरितां गेला. नंतर पुष्कळ काळानें हा मरण पावला. त्या वेळेस यास नेण्याक-रितां यमदूत व विष्णुदूत आले; आणि त्यांचा परस्पर वाद जाहला. नंतर विष्णुदूतांनीं यमदूतांचा पराजय क-रून, सुशर्माब्राह्मण विष्णुलोकाप्रत नेला. नंतर यमदूत यमापाशीं जाऊन सर्व वर्तमान निवेदन करिते झाले. त्या वेळेस यम ह्मणतात, 'हे दूतहो, विष्णुदूतांचा मु-ळींच अपराध नाहीं, कारण त्या ब्राह्मणानें श्रीक्षेत्र पंढरपुर येथील पद्मतीर्थामध्यें स्नान केलें होतें त्या पु-ण्याच्या योगानें त्याचीं सर्व पापें गेलीं, व तो वैकुंठास गेला. येथील सांप्रतचें भव्य देऊळ व सभोंवारचा वि-स्तृत तलाव हीं धारच्या पंवारांनीं, त्यांस देवीचा अद्भुत चमत्कार झाल्यामुळें, बांधिलीं आहेत.

## कुंडलतीर्थ.

हें तीर्थ श्रीपांडुरंगाच्या उत्तरेस आहे. या तीर्थाचे

ठायीं प्रभूंनीं दैत्यांशीं युद्ध करितेसमयीं आपल्या का-
नांतील दिव्य मकराकार कुंडलें ठेविलीं होतीं, ह्मणून
यास कुंडलतीर्थ असें ह्मणतात. हें स्थान परम पवित्र व
सर्व पापांचा नाश करणारें असें आहे. येथें एक नृसिंह-
मूर्ति आहे. तिचें दर्शन घेतल्यास राजसूयफलप्राप्ति होते.
याकरितां याचें दर्शन सर्वांनीं अवश्य घ्यावें.

## संगमतीर्थ.

येथें भीमा नदी व पुष्पावतीनामक नदी यांचा संगम
आहे. पैकीं भीमा नदीची कथा पूर्वीं लिहिलीच आहे.
पुष्पावती नदीची कथा अशी आहे कीं, पुष्पावती नदी
ही यमुना नदी होय. इजला येथें येण्याचें कारण असें
झालें कीं, पूर्वीं श्रीकृष्ण पंढरपुरास येण्यास निघाले हें
पाहून, यमुना नदी फार दुःखित होऊन श्रीकृष्णाची
प्रार्थना करिती झाली, 'हे प्रभो, आपण जर येथून जाल
तर मी कधींही येथें राहणार नाहीं.' असें बोलून ती
रुदन करूं लागली. तेव्हां श्रीकृष्ण दयेनें युक्त होऊन
हांसून बोलतात, 'हे यमुने, तूं भिऊं नको, चल मज-
बरोबर.' याप्रमाणें कृष्णाज्ञा झाल्यानंतर यमुना दुसरें
रूप धारण करून श्रीकृष्णाबरोबर पंढरपुरास आली.
नंतर श्रीकृष्णानें आपलें नांव बदललें हें पाहून यमुनेनें
ही आपलें नांव सोडून पुष्पावतीनामानें गाई व गोपाल
यांच्या सहवर्तमान प्रभु ज्या स्थलीं क्रीडा करितात
असें जें गोपाळपुर तेथें राहिली. या संगमतीर्थाचे ठायीं
स्नान केलें असतां सर्व पापें जाऊन नर वैकुंठास जातो.
यास आधार:— स्कंद० गोपाल० ॥ अध्याय ॥ २ ॥

श्लोक. 'प्रार्थयामास मां त्यक्त्वा कथं तत्राधितिष्ठसि ॥ मामाज्ञापय देवेश वस्तुं तत्र कृपानिधे ॥ ३६ ॥ नोचेत्प्राणानहं त्यक्ष्ये त्वद्वियोगाक्षमा भृशम् ॥ इत्युक्त्वा श्रुमुखी खिन्ना रुरोद यमुना भृशम् ॥ ३७ ॥ तदा श्रीकृष्णनाथोऽसौ करुणापूर्णमानसः ॥ सस्मितं प्राह कालिंदीं माभैर्मत्प्राणवल्लभे ॥ ३८ ॥ मत्सन्निधिं त्वमागच्छ भीमामनुविशाधुना ॥ संगमस्ते पुण्यरूपो भविष्यति न संशयः ॥ ३९ ॥ तत्र मत्स्थानमतुलं प्राहुर्विष्णुपदं भुवि ॥ पुष्पावतीति विख्यातं त्वन्नाम भविता ध्रुवम्॥४०॥ इत्युक्ता कृष्णमानम्य कालिंदी प्रीतमानसा ॥ पुष्पावतीति नाम्नाभूद्गोपालपुरसन्निधौ ॥४१॥ तीर्थानामुत्तमं तीर्थं सरितामुत्तमा सरित् ॥ मुक्तिदा सर्वदा स्नानान्महापातकिनामपि ॥४२॥

या संगमतीर्थास पर्जन्यकालामध्यें पाणी फार येत असे, यामुळें श्रीकृष्णाचे दर्शनास जाण्यास फारच अडचण पडे हें पाहून हैदराबादकर दिवाण प्रसिद्ध उदार चंदूलाल, यांचे पुत्र लालाप्रसाद यांनीं येथें पूल बांधिला. यास वर्षें ६० सुमार झालीं आहेत. या पुलाची लांबी १३१ गज आहे. रुंदी १० गज व उंची ७ गज आहे. या संगमतीर्थाच्या उत्तरेस भीमेच्या कांठीं अनंतपुर ह्मणून स्थान आहे. येथें शिवलिंग आहे. येथें स्वल्प जरी पुण्य केलें तरी तें अनंतपट होतें. यामुळें हें नांव याला प्राप्त जाहलें आहे. याला प्रस्तुत 'अंतापुर' असें लोक ह्मणतात. या शिवाचें दर्शन घेतलें असतां सर्व पापें भस्म होतात.

## वृद्धकालेश्वर.

या अंतापुराच्या दक्षिणेस यमतीर्थ आहे. येथें यमानें स्थापन केलेलें वृद्धकालेश्वरसंज्ञक शिवलिंग आहे. व कालोदकनामक कूप आहे. या कूपाचें स्नान करून वृद्धकालेश्वराचें दर्शन घेतलें असतां, सर्व मनोरथ पूर्ण होतात व दारिद्र्य कधींही प्राप्त होत नाहीं. याच तीर्थासमीप अचिंत्यशक्ति अशी भुवनेश्वरी देवी आहे. ही देवी अष्टभुजा आहे. इच्या दर्शनानें ज्यांस जी इच्छा असेल ती पूर्ण होते.

## वेणुतीर्थ.

हें तीर्थ संगमतीर्थापासून बारा धनुष्यांवर आहे. येथें राधेनें कृष्णाचा वेणु ह्मणजे पांवा रागानें टाकिला, यास्तव याला हें नांव प्राप्त झालें आहे. या तीर्थांत स्नान केलें असतां स्वर्गलोकप्राप्ति होते.

## गुंजातीर्थ.

हें तीर्थ वेणुतीर्थापासून चार बाणांवर आहे. व वर्तुलाकार आहे. या तीर्थीं प्रभूच्या मुकुटापासून गुंजा गळून पडल्या ह्मणून यास गुंजातीर्थ हें नांव प्राप्त झालें. येथें अद्यापि किंचित् किंचित् रक्तवर्ण पाणी दिसतें. या तीर्थाचें दर्शन घेतलें असतां, सर्व पापें जातात.

## गोपाळपुरचा पर्वत.

हा पर्वत गोवर्धन पर्वत होय. पूर्वीं श्रीकृष्ण पंढरपुरास जाण्यास निघालेले पाहून गोवर्धन पर्वतही निघाला. कदाचित् प्रभु रागावतील ह्मणून तेथें दुसऱ्या रूपानें

राहिला. व आपला सर्व मोठेपणा टाकून दुसरें रूप धारण करून पुष्पावती व भीमरथी यांचे संगमाच्या ठायीं जें गोपाळपुर तें आपले मस्तकीं धारण करून राहिला. याकरितां सर्व मनुष्यांनीं याची पूजा करावी. यास आधारः—स्कंद०, अध्याय २, गोपाल० माहात्म्य. श्लोकः–पुष्पावतीभीमरथ्योः संगमे सुप्रतिष्ठितः ॥ त्यक्तोन्नत्यं कृष्णभक्त्या नातिनिम्नः स्वगौरवात् ॥ आस्ते गोपालकृष्णस्य शिरसा धारयन्पुरं ॥ ९८ ॥ अतः पूज्यो गिरिरयं सदा श्रेयोऽर्थिभिर्नरैः ॥ द्रष्टव्यश्च प्रयत्नेन स्मर्तव्यो वा दिवानिशं ॥ ९९ ॥

## कालभैरव.

हें देवालय पांडुरंगाच्या ईशान्येकडे आहे. येथें कालभैरवाची मूर्ति आहे. हा दर्शनमात्रेंकरून सर्व पापें दूर करून भक्तांचें कल्याण करितो. हा क्षेत्राला उपद्रव देणाऱ्यांचा नाश करण्याकरितां राहिला आहे.

पूर्वीं कोणी एक गंधर्व तरुण स्त्रियांसहवर्तमान विमानामध्यें बसून मोठ्या स्वरानें गायन करीत श्रीविठ्ठलाच्या देवालयावरून चालला. हें क्षेत्रपाल जो भैरव यानें पाहिल्यानंतर, मोठ्या रोपानें एकदम उडी मारून त्याचें विमान खालीं पाडिलें, आणि त्यास पुष्कळ ताडण करूं लागला. हें भैरवाचें कृत्य श्रीपांडुरंगानें पाहून, भैरवास निवारण करून, मूर्छित झालेल्या विद्याधरास सावध केलें. नंतर विद्याधर गंधर्वानें, शंख, चक्र, गदा, पद्म, धारण करणारा, पीतांबरधारी, विष्णूचा अवतार अवलोकन करून भयभीत होत्साता साष्टांग नमस्कार करि-

ता झाला. आणि हात जोडून गद्गदवाणीनें त्यानें पुष्कळ स्तुति केली. आणि 'हे प्रभो, माझे अपराध सहन करा, मी सर्वस्वी अपराधी आहें, मजवर क्षमा करा, अशा पुष्कळ प्रार्थनेंकरून प्रभूचा प्रसाद झाल्यानंतर आपल्या विमानांत बसून जाता जाहला. याकरितां क्षेत्ररक्षणास्तव स्थापन केलेला जो कालभैरव, याचें प्रथमतः दर्शन घेऊन याची पूजा करावी ह्मणजे यात्रा सफल होते.

## अमृतेश्वर.

या देवाचें देवालय हेमाडपंती आहे. येथील शिवलिंग फारच सुंदर आहे. या देवाचा रथोत्साहवगैरे शिवरात्रीस होतो. या महादेवाचें दर्शन घेतलें असतां, सर्व पापें जातात.

## संध्यावळी देवी.

श्रीक्षेत्राचें पूर्वेकडील द्वार. या द्वाराचे ठायीं दोन नद्यांचा संगम आहे. एकीचें नांव भीमा व दुसरीचें नांव शिशुमाला. हें तीर्थ प्रयागापेक्षांही पुण्यकारक आहे. येथें ब्रह्मपत्नी, सरस्वती देवी, हिची स्थापना विष्णूंनीं केली आहे. या देवीला तूर्त संध्यावळी देवी असें ह्मणतात. या देवीचें पूजन केलें असतां पूजकाचे सर्व मनोरथ जगदंबिका पूर्ण करिते. हिनें ज्याच्याकडे पाहिलें तो प्राणी सर्वज्ञ होतो. येथें ब्रह्मदेव अश्वत्थरूपानें राहिले आहेत. आणि येथील पाषाणादिक सर्व देवच आहेत. या ठिकाणीं जें पुण्य केलें तें अक्षय्य होतें. सहा महिने हिचें सेवन केलें असतां

कसाही पातकी असला तरी त्या पातकापासून मुक्त होतो. येथील संगमाचें स्नान, व उपोषण करून देवीचें दर्शन घेतलें असतां, ब्रह्मलोकप्राप्ति होते. या संगमाचें स्नान करून, चंद्रसूर्यांच्या ग्रहणामध्यें, येथें ज्या मंत्राचा जप करावा तो मंत्र सिद्ध होतो.

## मासनूर.

श्रीक्षेत्राचें दक्षिणद्वार मासनूर. येथें शिवलिंग आहे. याचें नांव सिद्धेश्वर. यास्थळीं पुष्पावती नदीचा संगम आहे. या संगमामध्यें स्नान करून श्रीसिद्धेश्वराचें दर्शन घेतलें असतां दर्शन घेणारा प्राणी ज्ञानी होऊन शिवलोकास जातो.

पूर्वीं कोणी एक व्याध हातांमध्यें धनुर्बाण धारण करून अरण्यामध्यें फिरत असतां त्यास पाहून सर्व मृग भिऊन पळूं लागले. नंतर एक उत्तम मृग संगमतीर्थाचें पाणी पीत होता त्यास व्याधानें बाण मारिला. त्या योगानें तो मृग व्याकुल होऊन आपला प्राण सोडिता झाला. संगमतीर्थाच्या जलप्राशनानंतर मरण पावल्याकारणानें, त्याला विमान आलें; आणि तो विमानांत बसून शिवरूप होऊन कैलासास जाता झाला. हें पाहून व्याधास मोठें आश्चर्य वाटलें; आणि तीर्थमाहात्म्य जाणून आपण ही सर्व दुष्टपणा सोडून देऊन तेथें राहिला. नंतर अंतीं शिवलोकास गमन करिता जाहला. याप्रमाणें या तीर्थाचें माहात्म्य आहे. याकरितां सर्व लोकांनीं संगमाचें स्नान करून सिद्धेश्वराचें दर्शन अवश्य घ्यावें.

## भुवनेश्वरी.

ही देवी या क्षेत्राच्या पश्चिमद्वाराचे ठायीं विष्णूंनीं स्थापन केली आहे. मनुष्यांस दर्शनमात्रेंकरून इच्छित फल देणारी, सर्व भुवनांची ईश्वरी, अचिंत्यशक्ति, अष्टभुजा, अशी ही देवी आहे, सर्वांनीं हिचें दर्शन घ्यावें; व हिची पूजा करावी; ह्मणजे इच्छित फल प्राप्त होतें.

• आधारः—स्कंद०, पांडु०, अध्याय ॥२॥ श्लोकः-पश्चिमे च स्थिता देवी द्वारे भुवनपूजिता ॥ भुवनाधीश्वरी नृणामभीष्टफलदायिनी ॥ संपूज्य प्रेक्षितव्या च नमस्कार्या विशेषतः ॥

## दुर्गादेवी.

उत्तरेकडील द्वाराचे ठायीं भयंकर दैत्याचा नाशकरणारी अशी देवी आहे, हिचें नांव दुर्गादेवी. हिला 'दुर्गा' असें नांव प्राप्त होण्यास असें कारण झालें कीं, पूर्वीं हेरंबनामक राजा होता, त्याचे शत्रु मोठे प्रबल होऊन दुर्ग ह्मणजे किल्ले यांच्या आश्रयानें हेरंब राजाचा पराजय करिते झाले. तदनंतर हेरंब राजानें या देवीपाशीं येऊन तप केलें, व देवीनें प्रसन्न होऊन शत्रूंचे दुर्गांचा नाश केला, म्हणून या देवीस दुर्गादेवी असें ह्मणतात. येथें भीमा नदी व भरणीनामक नदी यांचा संगम आहे. या संगमाचें स्नान करून देवीचें दर्शन घेतलें असतां इच्छित मनोरथ पूर्ण होतात, व पिशाचबाधा दूर होते. ही देवी 'इसबावी'पाशीं आहे.

याप्रमाणें या क्षेत्राचीं चार अंतर्द्वारें आहेत; यांचें दर्शन अवश्य घ्यावें. या द्वारांचे ठिकाणीं राह-

णाऱ्या ज्या देवता त्या देवतांचें पूजन सर्व मनुष्यांनीं अवश्य करावें. ह्मणजे इच्छित मनोरथ पूर्ण होतील. पांडु० श्लोकः—‘ द्वाराण्येतानि चत्वारि तथा द्वारस्थदेवताः ॥ प्रेक्षितव्याश्च पूज्याश्च यथोक्तफलमिच्छता ’ ॥ याप्रमाणेंच या क्षेत्राचीं चार बहिर्द्वारें आहेत. पश्चिमेकडील ‘करवीर’ हें द्वार. येथें जगज्जननी लक्ष्मी आहे. हिच्या दर्शनानें लक्ष्मी प्राप्त होते. दक्षिणेकडील ‘शूर्पालय’नामक क्षेत्र आहे. येथें भगवान् शंकर वास करितात. यांच्या दर्शनानें शिवलोकप्राप्ति होते. पूर्वेकडील द्वार त्रिविक्रम आहे, येथें विष्णुमूर्ति आहे. हिचे दर्शनानें सर्व पापें जातात. उत्तरेकडील द्वार नृसिंहपुर. येथें नृसिंहमूर्तीचे रूपानें विष्णु वास करितात. यांचे दर्शनानें सर्व पापें जातात; अध्याय १०, श्लोकः— करवीरपुरंनाम पश्चिमद्वारमीरितं ॥ शोभितं गोपुराट्टालप्रासादगृहतोरणैः ॥४८॥ यत्र चास्ते महाविष्णोः प्रिया नारायणी रमा ॥ यस्या दर्शनमात्रेण ह्याढ्यो भवति मानवः॥४९॥तस्यास्तीरे महत्क्षेत्रं शूर्पालयमिति श्रुतं ॥ तीर्थे तस्मिन्नहं वत्से दक्षिणद्वारमाश्रितः ॥ ५० ॥ पूर्वद्वारे तु भगवान्स्वयमास्ते त्रिविक्रमः ॥ महत्या गदया युक्तो लोकत्रयपरिरक्षया ॥ ५१ ॥ श्रीनृसिंहस्तथा देवो हिरण्यकशिपो रिपुः ॥ उत्तरद्वारमाश्रित्य तिष्ठत्यद्यापि सोऽच्युतः ॥ ५२ ॥

शंकर सांगतात. ‘श्रीक्षेत्रपंढरपुर याचीं जीं अष्टद्वारें, व द्वारांचे ठिकाणीं राहणाऱ्या ज्या देवता, त्यांच्या दर्शनाचें पुण्य असें आहे. साक्षात् पंढरपुराविषयींचें माहा-

त्म्य सर्व मी सुद्धां जाणत नाहीं, तथापि यथामति तुला सांगतों. हें क्षेत्र अर्धयोजन विस्तीर्ण आहे, याची रुंदी कोसमात्र आहे; हें क्षेत्र सर्व फलांप्रति देणारें विष्णूस व मला प्रिय असें आहे. हें क्षेत्र पुष्करक्षेत्रापेक्षां त्रिगुण, केदारक्षेत्रापेक्षां षड्गुण, आणि काशीक्षेत्रापेक्षां दशगुणित पुण्यकारक आहे. या क्षेत्राचे ठायीं इंद्रादिक सर्व देव, व ऋषि, पितर, व सिद्ध, त्याचप्रमाणें गंधर्व आणि शेषादिक सर्प राहतात. सर्वशक्तिमान् साक्षात् विष्णु येथें वास करीत आहेत. भूमीवर जितकीं तीर्थें आहेत तीं सर्व गंगादिक तीर्थें, या क्षेत्राचे ठायीं राहतात. सर्व क्षेत्रांमध्यें श्रेष्ठ; सर्व गुह्यांमध्यें गुह्य; अशा या उत्तम क्षेत्रराजाच्या दर्शनेंकरून सर्व पापांपासून मनुष्यें मुक्त होतात. हे नारदा, आणखी तुजप्रत काय निवेदन करूं. भूमीचे ठिकाणीं व पातालादिकांच्या ठायीं या क्षेत्राबरोबरीचें क्षेत्र मुळींच नाहीं. या क्षेत्राचे ठायीं सर्व देवांमध्यें श्रेष्ठ, योग्यांचा ईश्वर, कर्णाचे ठिकाणीं रत्नखचित मकराकार कुंडलें धारण करणारा, वक्षस्थलाचे ठायीं श्रीवत्सकौस्तुभ धारण करणारा, मदनापेक्षां सुंदर, असा हा विष्णु साक्षात् वास करीत आहे. अशा क्षेत्राप्रत टाकून जो मनुष्य दुसऱ्या क्षेत्रांप्रत सेवन करितो तो मनुष्य केवळ विचारशून्य जाणावा. जसें एखाद्या भागीरथीजवळ राहणाऱ्या मनुष्यानें तृषाशमनार्थ कूप खोदावा, त्याप्रमाणें हा मनुष्य समजावा. या क्षेत्राचे ठायीं मी वास करून सदोदित पांडुरंगाची पूजा करितों. या क्षेत्राचे ठायीं एक दिवसही वास क-

रणाऱ्या मनुष्यास विष्णुसायुज्य प्राप्त होतें. ज्या प्रमाणें पृथ्वीचे ठायीं सर्व प्राण्यांमध्यें मनुष्यजन्म जसें दुर्लभ, त्याप्रमाणें येथें वासही दुर्लभ जाणावा. या पंढरपुर क्षेत्राचे ठायीं शीतभर जरी अन्नदान केलें, तरी त्यापासून मेरुपर्वतप्राय दानाचें फल प्राप्त होतें. या प्रमाणें अन्य वस्तुदानांचेंही फल समजावें. स्वर्गलोकवासी देव सुद्धां पांडुरंगाचें दर्शन आपणांस एकवेळ तरी व्हावें अशा इच्छेनें भूलोकाचे ठायीं जन्म वांछितात. या क्षेत्राचे ठायीं पितरांच्या उद्देशानें जें कांहीं श्राद्धादिक कर्म करावें तें अक्षय्य होतें. या पांडुरंगक्षेत्राच्या यात्रेविषयीं सर्वहीकाल पर्वकाल आहे असें समजावें. येथील पाषाण देवरूप. सर्व जीव दानपात्र. या क्षेत्राचे ठिकाणीं ब्रह्महत्यादिक पातकें करणारेही येथें आले असतां येथील पांडुरंगाच्या दर्शनमात्रेंकरून मुक्त होतात. याप्रमाणें माता, पिता, बंधु, आणि गुरु इत्यादिकांचा वध करणारे लोक या क्षेत्रवासेंकरून पवित्र होतात. यास्तव सर्वांनीं येथें वास करावा. कारण गंगाद्वार आणि प्रयाग आणि गंगासागर यांचा संगम कुरुक्षेत्र, केदारक्षेत्र, नैमिषारण्य, यांचे ठायीं हाजारों युगेंपर्यंत वास केला असतां जें फल प्राप्त होतें तें पुण्य श्रीपांडुरंग याचे दक्षिणेकडे क्षणार्धवासेंकरून प्राप्त होतें. या क्षेत्राचे ठायीं भगवान् पांडुरंग आपण, पुंडरीकास दिलेल्या वरामुळें सर्व देवांसहवर्तमान राहिले आहेत. हे येथें आलेले लोकांस दर्शनमात्रेंकरून पुनीत करून अंतीं वैकुंठपदास नेतात.

आधारः—स्कंदपुराण, पांडु०, अध्याय २, श्लोकः—
'अर्धयोजनविस्तीर्णं तद्र्धायामसंमितं ॥ तत्क्षेत्रं सर्वफलदं विष्णोर्मम च वल्लभं ॥ पुष्करात्त्रिगुणं प्रोक्तं केदारात् षड्गुणं भुवि ॥ वाराणस्या दशगुणं क्षेत्रं तत्पौंडरीककं' ॥

अध्याय ५ यांतीलः— यत्र तिष्ठंति विबुधा विधिशक्रपुरोगमाः ॥ ऋषयः पितरः सिद्धा विद्याधरमहोरगाः ॥१॥ यत्र विष्णुः सर्वशक्तिः परिपूर्णो विराजते ॥ गंगादीनि च तीर्थानि यानि संति महीतले ॥ २ ॥

अध्याय ६,— श्लोकः— 'क्षेत्राणां परमं क्षेत्रं गुह्यानां गुह्यमुत्तमं ॥ क्षेत्रराजमिमं ज्ञात्वा सर्वपापैः प्रमुच्यते ॥ १ ॥ बहुना किमिहोक्तेन पाताले चांबरे भुवि ॥ नास्ति नास्ति समं क्षेत्रमतस्तत्र वसाम्यहम् ॥ २ ॥

अध्याय ७,— श्लोकः— 'क्षेत्रे ह्यस्मिन्महाविष्णुः सर्वदेवोत्तमोत्तमः ॥ आस्ते योगीश्वरोऽनित्यं शक्तिभिर्नवभिः सह ॥ कुंडले माकरे बिभ्रत्कर्णयो रत्नभूषिते ॥ श्रीवत्सकौस्तुभभ्राजद्दिश्रुतोरस्थलो विभुः ॥'

अध्याय १०,— श्लोकः— 'पौंडरीकं परित्यज्य योन्यत्क्षेत्रमुपासते ॥ वसन्स जान्हवीतीरे कूपं खनति दुर्मतिः' ॥ १ ॥

अध्याय २,—श्लोकः—'तत्र स्थित्वार्चयाम्येनं पांडुरंगमहं सदा ॥ अन्यक्षेत्रस्थदेवानामर्चने यत्फलं भवेत् ॥ तदत्र लभते मर्त्यः सहस्त्रगुणमर्चने ॥ एकरात्रौ स्थितश्चापि सायुज्यं लभते ध्रुवम् ॥ दुर्लभं मानुषं जन्म यथा भुवि शरीरिणां ॥ वासोऽपि तद्वदेवात्र क्षेत्रेऽस्मिन्दुर्लभो मतः ॥ सिक्थप्रमाणमप्यन्नमस्मिन्क्षेत्रे ददाति यः॥तदन्नं

मेरुणा तुल्यमक्षय्यं च फलं लभेत् ॥ पर्वकालः सर्वकालः प्रस्तरा देवरूपिणः ॥ सर्वे जावा दानपात्राः क्षेत्रऽस्मिन्पौंडरीकके ॥ ब्रह्मघ्नो वा सुरापो वा स्तेयी च गुरुतल्पगः ॥ तत्संगी वा त्यजेत्प्राणान्नरो गच्छेत्परं पदं ॥ ९ ॥ मातृहा पितृहा चैव भ्रातृहा गुरुहा तथा ॥ तत्क्षेत्रवासान्नष्टांहो देवैः सह निगद्यते ॥ गंगाद्वारे प्रयागे च गंगासागरसंगमे ॥ कुरुक्षेत्रे महापुण्ये केदारे नैमिषे तथा ॥ वसतां युगसाहस्रं यत्फलं मुनिभिः स्मृतं ॥ क्षणार्धेनात्र तत्पुण्यं महाविष्णोश्च दक्षिणे ॥

श्रीक्षेत्र पंढरपुर येथें नवीन झाल्याकारणानें, पांडुरंगमहात्म्यामध्यें नसणारीं अशीं अन्य देवस्थानें:—

**नामदेवाची पायरीः**—ह्या पायरीविषयीं अशी कथा आहे कीं, पूर्वी नामदेवानें श्रीपांडुरंगापाशीं असें मागितलें कीं, 'हे देवा, मला तुमचें वैकुंठपद नको; इंद्रपद नको; दुसरें कांहींच नको; तर, याच क्षेत्रामध्यें येणाऱ्या सर्व भक्तमंडळीचें पदरज मला लागेल अशी जागा द्या'; नंतर पांडुरंग 'तथास्तु' ह्मणाले. आणि तूर्त पायरी असणाऱ्या भूमीकडे पाहिलें, तों एकदम भूमि दुभंग जाहली. नंतर प्रभूनें नामदेवास सांगितलें कीं, 'हे नाम्या, तुला ही भूमि दिली आहे. तुझ्या ह्मणण्याप्रमाणें माझ्या दर्शनास येणाऱ्या भक्तमंडळीचें पदरज तुला लागेल.' नंतर नामदेवानें पांडुरंगास नमस्कार केला. व त्या दुभंग जालेल्या भूमीमध्यें उडी टाकिली तों, त्याच वेळेस नामदेवाच्या सर्व मंडळीनेंही उड्या घातल्या. नंतर सर्व लोक पाहत असतां भूमि ए-

कदम पहिल्याप्रमाणें झाली. ही गोष्ट शके १२६८ आषाढ वद्य १३ स जाहली. त्या स्थळीं सर्व लोकांनीं पूजेकरितां पायरी केली आहे. या पायरीस नामदेवाची पायरी असें ह्मणतात. हिचें दर्शन व पूजन अवश्य करावें.

**वनशंकरी**:— ह्या देवीस शाकंभरी देवी असें ह्मणतात. हिचें देवालय अनगळ यांणीं बांधिलें आहे. येथें पौष शुद्ध ॥ १५ चा उत्साह होतो.

**खंडोबा**:— हें देवालय कोन्हेर बडवे यांनीं बांधिलें. येथें चंपाषष्ठीचे संबंधानें बराच उत्साह होतो.

**मारुति**:— हें देवालय अनादिसिद्ध आहे. याचा जीर्णोद्धार 'पांढरे' यांनीं केला.

**कोटेश्वर**:— हा महादेव बिंदुतीर्थावरचा ह्मणजे तूर्त जी सरकारी चावडी आहे ती जागा त्याचें देवालय होतें. सरकारांनीं यास तेथून काढून चावडी करण्याकरितां देवालय घेतलें; नंतर होळकर सरकार यांनीं आपले जाग्यांत लहानसें देवालय बांधून याची स्थापना केली आहे.

**श्रीरामाचें देवालय**:— हें देवालय फारच रमणीय आहे. येथें संगमरवरी पाषाणाच्या राम, लक्ष्मण आणि सीता यांच्या मूर्ति आहेत. पैकीं रामाची मूर्ति फारच उत्तम आहे. येथेंच अहिल्याबाईची मूर्ति करून बसविली आहे. रामाच्या समोर दगडी मंडप आहे; या मंडपामध्यें लहानशी एक दत्ताची मूर्ति आहे; याचे पुढेंच सागवानी उत्तम मंडप आहे. या मंडपांत

एक लहानसें मारुतीचें देवालय आहे त्यांतील मारुति फारच सुंदर आहे. या मंडपामध्यें चातुर्मास्यांत कथा व पुराण होत असतें. या रामाचा चैत्र शु॥ १ पासून १०पर्यंत उत्साह होत असतो. हें देवालय अहिल्याबाईनें बांधिलें आहे. या देवळालगतच अहिल्याबाईनेंच बांधिलेला एक वाडा आहे; हा वाडा बराच विस्तीर्ण आहे; याचे खण सुमारें २०० आहेत. यामध्यें जे राहणारे लोक आहेत त्यांस भाडें मुळींच नाहीं. या वाड्यामध्यें होळकर सरकारांनीं ब्राह्मणांकरितां एक छत्र, व गोसावी बैरागी लोकांकरितां सदावर्त, ठेविलें आहे. या वाड्याच्या बाहेरील भागांत ह्मणजे पश्चिम व दक्षिणेकडील बाजूंस काढिलेलीं दुकानें आहेत, त्यांस मात्र भाडें आहे.

**गारेचा महादेवः**— हा महादेव स्थापित आहे. यास पूजा व नैवेद्य 'देवस्थानकमिटी 'कडून आहे.

**मुरलीधराचें देवालयः**— हें देवालय बरेंच विस्तीर्ण आहे. याचें काम फार उत्तम आहे. येथें गोपालकृष्णाची मूर्ति आहे. या मूर्तीच्या दोहोंबाजूंस राधिकेची व रुक्मीणीची अशा दोन मूर्ति आहेत. तेथेंच बायजाबाईची एक मूर्ति करून स्थापिलेली आहे. या सर्व मूर्ति रम्य व पाहण्यास योग्य अशा आहेत. हें देवालय श्रीमंत शिंदे सरकार, अलिजाबाहदर, यांनीं बांधिलें. या देवळालगतच यांनींच बांधिलेला असा एक वाडा आहे, हाही वाडा बराच विस्तीर्ण आहे. या वाड्याच्या बाहेरच्या बाजूस दुकानें आहेत; वाड्या-

मध्यें शिंदे सरकारानें ठेवलेलें एक छत्र आहे.

**गुजराथी लोकांची बैठकः—** हें स्थान नदीच्या पलीकडच्या कांठीं आहे, व पवित्र आणि सुंदर आहे. तेथिल काम साधें आहे. यामध्यें एक भुयार आहे. तें वल्लभाचार्यांची वसण्याची जागा होती, ह्मणून तेथें एक गादी व तकिया ठेविलेला असतो, त्याची पूजा करितात. याचे वरचे बाजूस एक राधाकृष्णाची मूर्ति आहे. हें स्थान गांवांत न होतां पलीकडे होण्यास असें कारण सांगतात कीं, पूर्वीं भगवान् वल्लभाचार्य श्रीक्षेत्र पंढरपुरास आले. आणि नदीस पाणी फार आहे असें पाहून शिष्यमंडळीसुद्धां तेथेंच बसले, आणि असें ह्मणाले कीं, श्रीपांडुरंगास अगत्य असल्यास तो येथेंच येईल, असें बोलून तेथेंच बसले, नंतर भगवान् पांडुरंगानें तेथें जाऊन वल्लभचार्यांस व त्यांच्या सर्व शिष्यमंडळीस दर्शन दिलें. त्यामुळें हें स्थान तेथें जाहलें आहे. याचें दर्शन घेतलें असतां वैकुंठपद प्राप्त होतें. याच्या बाहेरच्या बाजूस चंद्रभागेचें पाणी आणण्याकरितां घांट बांधिला आहे.

**दत्ताचें देवालयः—** हें देवालय बोरबनकर बापुसाहेब विप्र यांनीं बांधिलें आहे. येथें शालिग्राम शिळेची दत्ताची मूर्ति उत्कृष्ट आहे. किंबहुना या प्रांतांत अशी मूर्ति नाहीं ह्मटल्यास हरकत नाहीं. या देवळाच्या बाहेरल्या भागांत नवीन महादेवाचें देवालय बांधिलें आहे. हें देवालय येथील पेंठकरी लोकांनीं बांधिलें आहे.

**दत्ताच्या पादुकाः**— या पादुका हरिदास घांटावर आहेत. या पादुकांचे मागेंच एक अश्वत्थ व औदुंबर असे दोन वृक्ष आहेत. या पादुकांस नवीन देवालयही बांधिलें आहे. यांच्या दर्शनाकरितां सायंकाळीं पुष्कळ लोक येतात.

**सोन्याचे देवः**—जवळच श्रीमंत खासगीवाले यांच्या वाड्यांत, श्रीविठ्ठल, राही, व रखुमाई, अशा तीन सुवर्णमूर्ति आहेत. श्रीविठ्ठलाची मूर्ति उत्कृष्ट आहे. वाड्यापुढें मोठा रथ आहे. आषाढी कार्तिकी एकादशीस या मूर्ति रथांत घालून रथ ग्रामप्रदक्षिणेस निघतो. बरोबर साक्षात्कारी चातुर्मास्ये बोवा असतात. उत्साह प्रतिवर्षीं खासगीवाले मोठ्या कडाक्यानें करतात. ही विठ्ठलमूर्ति नवसास पावते.

याप्रमाणें या क्षेत्रामध्यें नवीन स्थापित पुष्कळ देव आहेत. तसेच अनादिसिद्धही आणखी कांहीं देव आहेत. ते येथें सर्व लिहिले असतां ग्रंथ फारच मोठा होईल ह्मणून मुख्य मुख्यच येथें लिहिले आहेत.

## ताकपिठ्या विठोबा.

हा देव श्रीपांडुरंगाच्या देवालयाच्या पश्चिमेस आणि मंडईच्या ईशान्य कोनास बाबा महादेव बडवे यांचे वाड्यांत आहे. या देवास येथें येण्याविषयींची, व सदरील नांव प्राप्त होण्याविषयींची, अशी कथा सांगतात कीं, पूर्वीं रमाबाईनामक एक स्त्री होती. ती महापतिव्रता व वृद्ध होती. हिचें गांव पैठण. हिला एक-

नाथाचा अनुग्रह होता. हिजला अत्यंत पांडुरंगाची भक्ति होती, आणि रमाबाईस पांडुरंगाचा साक्षात्कार होता, हें पुढील कथेवरून सहजच ध्यानांत येईल. ही आपलें गांव सोडून श्रीक्षेत्र पंढरपुर येथें येऊन राहिली होती, आणि रात्रंदिवस पांडुरंगाची सेवा करीत असे. या बाईचा असा नियम होता कीं, कोणताही आपला खाण्याचा पदार्थ असो, तो पांडुरंगास आधीं अर्पण केल्यावांचून आपण खावयाचा नाहीं. हिनें अर्पण केलेले पदार्थांपैकीं ताकपीठ पांडुरंगास फारच आवडे आणि पांडुरंगानें सांगावें कीं, 'तुझें पीठ मला फारच आवडतें. वास्तव दररोज मला पीठ खाण्यास देत जा.' ती बाईही परमभाविक श्रीपांडुरंगाच्या आज्ञे-प्रमाणें प्रतिदिवशीं सायंकाळीं त्याचा इच्छित पदार्थ त्यास समर्पण करीत असे. पुढें रमाबाई देहप्रारब्धानें आजारी पडली. यामुळें हिच्यानें पांडुरंगाच्या देवाल-यास जाववेना, देवास नैवेद्य अर्पण होईना, व देवास अर्पण घडेना यास्तव ती आपणही कांहीं खाईना. या योगें बाईस उपवास पडूं लागले. तेव्हां भक्तजनांविषयीं परमदयाळू असा श्रीविठ्ठल दुसरें रूप धारण करून तिच्या खटपटीकरितां रुक्मिणीसहवर्तमान तेथेंच जाऊन राहिला; आणि ताकपीठ प्रतिदिवशीं बाललीलेप्रमाणें मिटक्या मारीत 'मला आणखी दे, आणखी दे,' असें ह्मणत खाऊं लागला. पुढें त्या बाईची प्रकृति बरी झा-ल्यानंतर प्रभु त्या बाईस ह्मणूं लागले कीं, 'आह्मी आतां जातों' त्यावेळेस रमाबाईनें सांगितलें कीं, 'देवा

ठाणे.

तूं येथेंच रहा, मला पूर्वींप्रमाणें घटिकेघटिकेसि देवालयांत येववत नाहीं. तूं गेल्यास मी उपोषित राहून आपला प्राणत्याग करीन.' अशा रीतीच्या अतिशय आग्रहामुळें श्रीविठ्ठल तेथेंच राहिले, आणि तिचें पीठ प्रतिदिवशीं खाऊं लागले. या कारणानें सर्व लोकांत वर लिहिलेलें नांव प्रसिद्ध झालें. हा देव अद्यापि रुक्मिणी सहवर्तमान तेथेंच आहे. यांचें दर्शन घेतलें असतां, अथवा पूजन केलें असतां, सर्व पापें जातात. यामुळें यांचें दर्शन अवश्य घ्यावें. यास्थलीं एका ब्राह्मणास भोजन घातलें असतां लक्ष ब्राह्मणभोजनाचें श्रेय प्राप्त होतें. या देवास ताकपिठाचा नैवेद्य समर्पण केला असतां, अगर ब्राह्मणांस ताकपीठ समर्पण केलें असतां, प्रभु सर्व पातकांपासून मुक्त करून अंतीं वैकुंठलोकास नेतो.

**श्रीपांडुरंगाचे देवळांतील देवः**— प्रथम जातांक्षणींच १ नामदेवाची पायरी. ( या पायरीविषयींची कथा पूर्वीं लिहिलीच आहे ). हिचें दर्शन घेतल्यानंतर कांहीं पायऱ्या वर चढून दक्षिणेकडे वळावें म्हणजे २ तेहत्तीस कोटि देव, व प्राचीन महान् वटवृक्ष हीं लागतील. या देवांसमोर एक मारुति आहे. ३ मुक्तिमंडपांतील गणपति, म्हणजे नगारखान्याखालचा गणपति. ४ कान्हया हरिदासाची समाधि. ( या हरिदासास पांडुरंगाचा साक्षात्कार होता ). ५ पारावरील मारुति. ६ गरुडाचें देवालय. ( हें देऊळ लहानसें आहे. ) ७ मारुतीचें देवालय. ८ जयविजय. ( या मूर्तींच्या डाव्या बाजूस एक मोठी घांट बांधिलेली आहे.) व पुरा—

णमंडप, पितळेच्या दरवाज्याच्या बाजूस. ९ गणपति. १० सरस्वती. सोळखांबींतील देवः—सोळखांबीपासून तों तहत देवापर्यंत सर्व गाभारे एकजात दगडी आहेत. ११ गरुडखांब. १२ हनुमंताचा खांब. १३ भानुदासांनीं स्थापन केलेल्या दगडी पादुका. १४ त्याहून जरा उंच गारेच्या पादुका, दामाजीपंतांनीं स्थापन केलेल्या. १५ गणपति. १६ सरस्वती. १७ जयविजय. नंतर श्रीविठ्ठल सन्मुखजातां आधीं चौखांबी, त्यांत दक्षिणेस प्रदक्षिणेचें लहान द्वार असून उत्तरेस प्रभूचें शेजघर आहे. पुढें अगदीं लहान दोन गाभारे आहेत. दुसऱ्यांत १८ श्रीपांडुरंग. ( भक्तजनांस इच्छित सुखें देणारा विटेवरती विराजमान पूर्ण ब्रह्मरूप. ) श्रीपांडुरंगाचें दर्शन घेऊन दोहों बाजूंस हत्ती असणाऱ्या दक्षिण दरवाजांतून बाहेर निघावें, आणि नीट समोर जावें. नंतर लंबाल्यानें बांधलेला मंडप लागतो. तेथून पूर्वेकडे १९ महिषासुरमथिनी देवी. नंतर जवळ २० गारेचा गणपति. बाजूस २१ मुरलीधर. व २२ केशवराज. तरटीचे दारापाशीं व महालक्ष्मीपुढें २३ कान्हुपात्राची समाधि तरटीचे झाडाखालीं. ( हिजविषयींची कथा तृतीयभागांत लिहिली आहे. ) पुढें २४ व्यंकटेश. ही मूर्ति श्रीविठ्ठलाएवढीच आहे. ) २५ व्यंकटेशाच्या उजवीकडे गणपति. व्यंकटेशाचे पश्चिमभागास २६ नाग. नंतर जरा वळून २७ जगज्जननी महालक्ष्मी. तेथेंच २८ श्रीलक्ष्मीच्या देवळांत अन्नपूर्णा. २९ नारद. ( हा नारद बाजीरावाच्या ओवरींत आहे. ) व पुढील देवही देवळांत लहान मोठ्या-

गाभाऱ्यांतून आहेतः— ३० बालकृष्ण. ३१ खंडोबा. ३२ रामेश्वर. ३३ नागोबा. ३४ कालियामर्दन. ३५मारुति. ३६ गणपति, याच देवळांत सूर्यनारायण. ३७ नवग्रह अष्टवसू. ३८ राही. हिचें देऊळ जरा मोठें आहे. ३९ सत्यभामा. तसेंच हिचें आहे. ४० आदिशक्ति जगज्जननी श्रीरुक्मिणी. या श्रीदेवीचें दर्शन घ्यावें. येथें रुक्मिणीचें शेजघर आहे. त्यास वंदन करावें. नंतर प्रदक्षिणा घालून श्रीचे समोर नीट जावें व अश्वत्थास नमस्कार करावा. नंतर ४१ गणपति. ४२काशीविश्वेश्वर. त्या समोरच शाकंभरी. ही लहानशी देवी सोळखांबींत शिरण्याच्या द्वारांपैकीं एका द्वारावर आहे. ४३ रामचंद्र. जवळच ४४ काळभैरव. व ४५ दत्तात्रेय. आणि ४६ महादेव. नंतर ४७ चौऱ्यांशी. ४८नरसोबा. व ४९ मारुति.

या प्रमाणें श्रीपांडुरंगाच्या देवळांतील प्रसिद्ध देव आहेत. यास्तव यांस आपल्या शक्त्यनुरूप दक्षिणादिक समर्पण करून या सर्व देवांचें दर्शन घ्यावें. श्रीपांडुरंगाची पंचामृतपूजा करावी; तशीच अलंकारपूजा करावी; तसेच वसंतादि ऋतूंत योग्य उपचार देवास समर्पण करावेत. कारण, त्यांचें महापुण्य सांगितलें आहे. पंचामृतपूजेविषयींचें प्रमाणः— स्कंद०, पांडु०, अ० ३, पंचामृतैरिक्षुरसैः स्नाप्य कस्तूरिमिश्रितैः ॥ संपूज्य प्राप्नुयात्कामानिह नास्त्यत्र संशयः ॥ १ ॥ अर्थः—कस्तूरीमिश्रित पंचामृतांनीं श्रीपांडुरंगाची पूजा केली असतां पूजा करणाराचे सर्व मनोरथ पूर्ण होतील.

वसंत ऋतूंतील पूजेविषयीं प्रमाणें:— स्कंद०, पांडु०, अ० ३, वसंते पांडुरंगं तं तत्कालकुसुमैः शुभैः ॥ पूजयेच्चंदनैर्दिव्यैः श्वेतवस्त्रैः सुकोमलैः ॥ उच्चावचैः फलैर्लेह्यैरपूपैः शर्करान्वितैः ॥ इष्टान्कामानिह प्राप्य सायुज्यं लभते नरः ॥ अर्थः— वसंतऋतूचे ठायीं वसंतकालोद्भव पुष्पांच्या योगानें, तसेंच चंदनानें, पांढऱ्या मृदु वस्त्रांनीं, व उत्तम उत्तम फलांनीं श्रीपांडुरंगाची पूजा करणाऱ्या मनुष्यास ह्या लोकीं इच्छित सुखें प्राप्त होतात. व अंतीं वैकुंठपद प्राप्त होतें. असें या अध्यायांत पुष्कळ पूजामाहात्म्य सांगितलें आहे. ज्यांस पाहिजे असेल त्यांनीं हा अध्याय पहावा. याप्रमाणें हा द्वितीय भाग समाप्त झाला.

---

## श्रीपांडुरंग प्रसन्न.

### भाग तिसरा.

### श्रीपांडुरंगाचें साधुवात्सल्य आणि कांहीं प्रसिद्ध भगवद्भक्तांचें संक्षिप्त इतिवृत्त.

ज्ञानेश्वरः— याचें जन्म ११९४ मध्यें झालें. याच्या बापाचें नांव विठ्ठलपंत, याच्या आईचें नांव रखुमाबाई. हा विष्णूचा अवतार; यास दोन भाऊ व एक बहिण होती. त्यांपैकीं, वडील भावाचें नांव निवृत्तिनाथ. हा शंकराचा अवतार. निवृत्तिनाथ ज्ञानेश्वराचा गुरूही

होता. धाकटा सोपानदेव. बहिणीचें नांव मुक्ताबाई ज्ञानेश्वरांनीं लोककल्याणाकरितां ज्ञानेश्वरी ग्रंथ केला आहे. हा ग्रंथ सन १२०० मध्यें जाहला. याचप्रमाणें अमृतानुभव यानें केला व त्याचा उपास्य देव जो पांडुरंग यास अनुलक्षून यानें पुष्कळ अभंगही केले आहेत.

'रूप पाहतां लोचनीं ॥ सुख झालें हो साजणी ॥ १ ॥
तो हा विठ्ठल बरवा ॥ तो हा माधव बरवा ॥ धृ० ॥
बहुतसुकृतांचीजोडी ॥ ह्मणुनिविठ्ठलींआवडी॥तोहा०॥२॥
सर्वसुखाचेंआगर ॥ बाप रखुमादेवीवर ॥ तोहा० ॥ ३ ॥

'बाप रखुमादेवीवर' असें नांव अभंगांत लिहिण्याचा याचा परिपाठ असे. ह्मणून असे जेवढे अभंग आहेत तेवढे ते सर्व याचे समजावेत. अंभगाचे अंतीं 'ज्ञानदेव' असेंही नांव कोठेंकोठें आहे. असो; याचा प्रथमतः लोकांनीं छळही पुष्कळ केला. नंतर यानें चमत्कारही पुष्कळ दाखविले. पैठणमुक्कामीं रेड्याकडून वेद बोलविला, आणि आळंदी येथें भिंत चालविली, ती भिंत अद्यापि आहे. असे पुष्कळ चमत्कार दाखविले. ज्ञानदेव पंढरपुरच्या वाऱ्या नियमानें करीत होते. व नामदेव, कबीर, गोराकुंभार, इत्यादिक सर्व भक्तांपेक्षां श्रेष्ठ होते. यांच्याविषयीं सर्व कथा भक्तविजय, अ० ८, ९, यांत आहे.

**एकनाथस्वामीः**—प्रसिद्ध जो भानुदास नांवाचा साधु त्याचा हा पणतू, चक्रपाणीचा नातू, व सूर्योपंताचा पुत्र होय. याच्या आईचें नांव रुक्मिणी होतें. हा देशस्थ आश्वलायन ब्राह्मण होता. याची राहण्याची जागा

पैठण. याचें जन्मवृत्त भक्तविजयामध्यें, ४५०या अध्या-यांत, वर्णिलेलें आहे. त्यांतील सारांश येणेंप्रमाणें:— याचा व्रतबंध झाल्यावर याचीं आईबापें निवर्तलीं. तेव्हां याचें पालनपोषण याचा आजा जो चक्रपाणी त्यानें केलें. व वंशास तंतू कायतो हा एकच होता. ह्मणून यास घरांतील माणसें 'एक्या' अशा नांवानें हांक मारीत. हा सदाचारसंपन्न, नैष्ठिक, क्षमाशील, भक्तिमान् आणि विरक्त असा होता. याच्या वयाच्या पंध-रावे वर्षाच्या सुमारास याच्या मनांत असें आलें कीं, गुरूस शरण जावें. नंतर गुरूविषयींचा विचार करूं लागला. तों दौलताबाद येथें राहणारे यवनाचे मुख्या-धिकारी जे जनार्दनपंत यांची कीर्ति ऐकिली. नंतर दौलताबाद येथें जाऊन जनार्दनपंताची फारच सेवा केली. तेणेंकरून ते इतके संतुष्ट झाले कीं, त्यांनीं आ-पल्या गुरूचें स्मरण केलें. त्याबरोबर ते तेथें प्रकट झाले असतां जनार्दनपंतांनीं यावर कृपा करण्याची विनंती केली. तीवरून त्यांनीं 'तूं कृतार्थ आहेस,' असा एक-नाथास अशीर्वाद दिला. 'व आतां घरीं जाऊन प्रपंच व परमार्थ सांग करावा,' अशी आज्ञा करून आपण अंतर्धान पावले. यानें चमत्कार वगैरे लोकांस दाखविल्याच्या गोष्टी भक्तविजयांत व लोकांच्या सांग-ण्यांत पुष्कळच आहेत, परंतु सर्वभूतीं भगवद्भाव, तशीच भूतदया, यांविषयीं याची एक गोष्ट आहे. ती अशी:— एकदां असें झालें कीं, याच्या घरीं पितृतिथि असतां त्यानिमित्त आदल्या दिवशीं यानें ब्राह्मणांस

क्षण दिला. नंतर दुसऱ्या दिवशीं स्वयंपाकास आरंभ होऊन कित्येक पदार्थ तयार झाले. इतक्यांत त्या मार्गानें जाणाऱ्या अतिशूद्रांस त्याचा खमंग सुवास आल्यानें, असें अन्न आपणासारिख्या हतभाग्यांस कोठून मिळणार अशाविषयीं परस्परांत संभाषण झालेलें नाथांच्या कानावर गेलें. त्यावरून नाथ लागलेच बाहेर आले. व अतिशूद्रांस हांक मारून परत बोलावून ह्मणाले. 'तुह्मी सर्वजण बायकामुलांसुद्धां स्नान करून सत्वर यावें. ह्मणजे स्वयंपाक सिद्ध आहेच. जेवून मग खुशाल पाहिजे तिकडे जावें,' असें ऐकून अतिशूद्र ह्मणाले, 'महाराज, आपण आह्मांस दयेस्तव बोलावितां, ह्मणून आह्मीं यावें, हें खरें, परंतु मोंगलाई असल्यामुळें सरकारांत कोणी चाहाडी केल्यास आमचा परिणाम नीट होणार नाहीं ह्मणून भय वाटतें.' तेव्हां नाथ ह्मणाले, 'त्याची काळजी करणें तुह्मास नलगे. प्रसंगच आल्यास सरकार व आह्मी पाहून घेऊं तुह्मांस इजा होऊं देणार नाहीं.' त्यावरून गांवांतील अतिशूद्रमंडळी सर्व तेथें जमा झाली व त्यांस नाथांनीं यथेच्छ भोजन देऊन राहिलेलें अन्न त्या सर्वांस वांटून दिलें व मार्गस्थ केलें. नंतर सडासंमार्जन करून पुनः स्वयंपाकास आरंभ झाला. नाथ स्नान करून संध्या होतांच देवतार्चनास येऊन बसले.

इकडे गांवांत अतिशूद्रांस आधीं जेऊं घातल्याचा सर्वत्र बोभाट झाल्यानें ब्राह्मणांनीं कट केला कीं, आज नाथाच्या घरीं भोजनास कोणींही जाऊं नये. इतक्यांत

नाथाच्या घरीं सर्व तयारी झाल्यावर त्यांनीं ब्राह्मणांस बोलावूं पाठविलें. परंतु सर्वांचा निरोप असा परत आला कीं 'आह्मी कोणी येत नाहीं. तेव्हां नाथास मोठा विचार पडून आतां आयत्यावेळेस ब्राह्मण कोठून आणावे, ह्मणून आंत बाहेर एरझारा करीत असतां, असें सांगतात कीं, एकाएकीं पाहतात तों ब्राह्मण येऊन पाटांवर बसले आहेत. त्यावरून नाथ हर्षित होऊन, त्यांनीं यथासांग श्राद्ध कडेस लावून ब्राह्मणांस विडे, दक्षिणा दिली. व त्यांस मार्गस्थ केले. तों गांवचे ब्राह्मण वाट पाहत बसलेच होते कीं; याच्या घरचें श्राद्ध आज कसें होतें तें पाहूं. इतक्यांत श्राद्धीय ब्राह्मणांची झुंड बाहेर पडलेली त्यांनीं पाहिली. तों त्यांत कोणाचा बाप, कोणाचा आजा, कोणाचा चुलता, इत्यादि आहेत असें पाहून सर्व लज्जित होऊन आपआपल्या मनांत ह्मणूं लागले कीं, आपणांस साधूचा छळ घडला हें नीट झालें नाहीं. सारांश, पुढें, ब्राह्मणांनीं नाथापाशीं क्षमा मागितली, व ती त्यानें संतोषानें दिली.

आतां नाथांनीं जे ग्रंथ लिहिले ते येणेंप्रमाणें आहेत. प्रथमतः त्यांनीं गुरूची आज्ञा झाल्यावरून, दौलताबादेस असतांच चतुःश्लोकी भागवतावर टीका लिहिली, व 'चंद्र'भटाच्या घरीं तयार करून गुरूस आणून निवेदन केली. पुढें पैठणास आल्यावर भागवताच्या एकादशस्कंधावर टीका लिहिण्यास आरंभ करून पहिली 'पंचाध्यायी' पैठणास समाप्त केली. व राहिलेला ग्रंथ श्रीक्षेत्र काशी येथें शालिवाहन शके

१४९९मध्यें पुरा केला. असें सांगतात कीं, ही टीका चालली असतां काशींतील ब्राह्मणांनीं त्याची फार छळ केला. परंतु पुढें असा चमत्कार झाला कीं, तीच टीका त्याच ब्राह्मणांनीं पालखींत घालून तिची मिरवणूक क्षेत्रभर केली. याचा तिसरा ग्रंथ 'भावार्थरामायण;' चौथा 'रुक्मिणीस्वयंवर;' पांचवा 'हस्तामलक;' सहावा ग्रंथ 'आनंदलहरी;' आणि सातवा ग्रंथ शुकाष्टकावर टीका 'स्वात्मसुख' अशा नांवाची. याशिवाय पदें, अभंग, जागल्या, जोशी, गारुड, इत्यादि कविता याची पुष्कळ असून; गोड आहे. यांनीं आपल्या भक्तिभावानें पांडुरंग इतका वश करून ठेविला होता कीं, यांचे घरीं ब्राह्मणरूपानें राहून पाणी आणीत असे. त्याची साक्ष अद्यापि आहे. श्रीक्षेत्र पैठण येथें फाल्गुन वद्य ६ चा मोठा उत्साह होतो. या उत्साहसंबंधाचा एक मोठा हौद आहे. हा हौद नाथांच्या देवळांतच आहे. यांत सुमारें हजार पंधराशें घागरी पाणी मावतें. हा हौद भरण्याकरितां गांवांतील लोक पाणी आणून ओतूं लागतात. तो दोनप्रहरपर्यंत निमा अगर पाऊण इतका भरलेला असतो आणि दोनप्रहरच्या वेळेस भगवान् पांडुरंग गुप्तरूपानें कावड नेऊन ओततात. त्यावेळेस असा कांहीं विलक्षण चमत्कार होतो कीं, तो हौद निमा असला तरीही एकदम भरून बाह्यप्रदेशामध्यें पाणी वाहूं लागतें. त्याच वेळेस येथें (पंढरींत) पांडुरंगाचा स्कंध ओला झालेला असतो, असा पुष्कळांनीं साक्षात्कार पाहिला आहे. पैठण येथें

या उत्साहाकरितां सुमारें एक लक्ष यात्रा जमते. हें स्थान फार पाहण्यास योग्य आहे. हेंच पूर्वीचें प्रतिष्ठाननामक शहर. शककर्ते शालिवाहन यांची राजधानी होय.

## नामदेव.

हा पंढरपुरचाच रहाणारा. याच्या बापाचें नांव दामशेटी शिंपी व आईचें नांव गोणाई असें होतें. दामशेटी शिंप्यास मूल नसल्याकारणानें फार खिन्न होऊन त्यानें श्रीपांडुरंगाची प्रार्थना केली. त्यावेळेस पांडुरंगानें स्वप्नांत येऊन यास सांगितलें कीं, उद्ईक तुला चंद्रभागेंत वहात जाणारी अशी एक शिंप दृष्टीस पडेल त्या शिंपीमध्यें माझा परम भक्त मूल आहे. तोच तुझा पुत्र होईल. असें सांगून प्रभु गुप्त झाले. व दुसरे दिवशीं दामा चंद्रभागेस जाऊन पाहतो तों, चंद्रभागेंतून वहात जाणारी शिंप दृष्टीस पडली. ती मोठ्या आनंदानें घेऊन दोन भाग करून पाहिलें तों मुलगा उत्तम दिसला. नंतर त्यास घेऊन घरीं आला. आणि गोणाईच्या स्वाधीन केला. इतक्यांत गोणाईस पान्हा फुटला, त्या वेळेस तिनें स्तनपान करविलें. आणि उभयतां, देवांनीं आह्मांस पुत्र दिला, अशा आनंदानें जिकडेतिकडे सांगूं लागलीं. या पुत्राचें नांव 'नामदेव' असें ठेविलें. हा उद्धवाचा साक्षात् अवतार. याचें जन्म शालिवाहन शके १२०० मध्यें झालें. हा विठोबाचा परम भक्त होता.

दामाशेटीचा नित्य नेम असा होता कीं, देवळांत जाऊन, देवाची पूजा करावी आणि देवास नैवेद्य सम-

र्पण करून, तो घरीं घेऊन यावें, आणि भोजन करावें. एकदां दामशेटी गांवास जाऊं लागला व जातांना तो नामदेवास सांगून गेला कीं, 'रोज देवळांत जात जा व देवाची पूजा करून नैवेद्य समर्पण झाल्यावर मग घरीं येऊन भोजन करीत जा.' इतकें सांगून तो परगांवीं गेला असतां त्याच दिवशीं नामदेव नैवेद्य घेऊन देवाच्या पूजेकरितां देवळांत गेला आणि पूजा झाल्यावर त्यानें नैवेद्य देवापुढें ठेविला. परंतु तो देव खात नाहीं असें पाहून यानें हात जोडून देवास विनंती केली कीं, 'माझ्या बापानें आपणास अर्पण केलेला नैवेद्य आपण नित्य खातां, असें ऐकिलें आहे. तर आज मीं आणलेला नैवेद्य स्वीकार करावा. मीं लेंकरानें आणिला ह्मणून अनादर करूं नये.' तरी देव तो नैवेद्य ग्रहण करीत नाहीं, व कांहीं बोलत नाहीं, असें पाहून यास फार वाईट वाटलें. मग हा देवास ह्मणाला. 'पांडुरंगा जर आपण नैवेद्य खाणार नाहीं तर मी येथेंच प्राणत्याग करीन.' ह्मणून देवापुढें मस्तक आपटणार तों विठ्ठलमूर्ति जेऊं लागली. त्यावरून त्यास आनंद झाला व हा रिकामें ताट घेऊन घरीं आला. हा घरीं येतांच आईनें पुसलें, 'अरे ताट रिकामें कां ? नैवेद्य काय झाला ?' यानें देवानें खाल्ला ह्मणून सांगतांच ती त्याच्यावर संतापून ह्मणाली, 'मेल्या, देव कसचा नैवेद्य खातो. तूंच खाऊन देवाचें नांव लटकें सांगतोस. पण बाळा असें करूं नये घरधनी आज इतकीं वर्षें झालीं नैवेद्य नेतात पण देवानें तो एक दिवस देखील खाल्ला नाहीं.' नामदेव ह्मणाला

'आई, तूं उगीच रागाऊं नको. खोटें वाटत असेल तर मजबरोबर देवळांत चल, आणि प्रत्यक्ष पहा.' त्यावरून हें पोर आहे, याच्या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें समजून त्यास जेऊं घालून ती आपण जेवली.

असा क्रम आठ दहा दिवस चालत असतां, दामशेटी घरीं आला. येतांच त्यानें बायकोस पुसलें, 'नाम्या देवाच्या पूजेस नित्य जात होता कीं नाहीं ?' तिनें जात होता ह्मणून सांगितलें. पण 'मेला नैवेद्य काय करीत होता कोण जाणे. मी पुसलें असतां, देवानें खाल्ला ह्मणून बोलला. तें त्याचें बोलणें मी कांहींच मनावर घेतलें नाहीं.' बायकोनें सांगितलेली गोष्ट ऐकून दामशेटीस प्रथम आश्चर्य वाटलें. परंतु नाम्या लबाड बोलावयाचा नाहीं. ही त्याची पक्की खात्री होती, ह्मणून दुसऱ्या दिवशीं त्यानें देवळांत नैवेद्य घेऊन जाण्यास नामदेवासच सांगितलें. व आपण त्याच्या मागून गेला. कारण, देव नैवेद्य कसा खातो, हें त्याच्या मनांत पाहण्याचें होतें. बापानें सांगितल्याप्रमाणें नामदेव देवळांत गेला, व पूजा करून नैवेद्य ग्रहण करा ह्मणून देवास ह्मणूं लागला. परंतु देव त्या दिवशीं नैवेद्य खाईना तेव्हां नामदेव बोलला, 'कां नैवेद्य खायाचा आहे कीं नाहीं ? कां पहिल्या दिवसासारखें करूं.' त्यावरून देवानें नैवेद्य भक्षण केला, व तो स्वतः दामशेटीनें पाहिला. सारांश नामदेव हा कोणी सामान्य पुरुप नव्हे असें त्या दिवसापासून दामशेटी समजूं लागला, व त्याचे योगानें त्यास व त्याचे बायकोस कांहीं दिवसांनीं देवाची प्र-

त्यक्षता झाली. एकदां नामदेव चंद्रभागेवर स्नानास गेला असतां त्याच्या मनांत कविता करावी असें येऊन, त्यानें एकदम शतकोटी काव्याच्या संकल्पाचें उदक सोडिलें. तेव्हां देवानें यास ह्मटलें, 'तूं हा अघटित संल्कप आतां कोणत्या रीतीनें सिद्धीस नेणार.' नामदेव बोलला, 'संकल्प करून तर चुकलों आहें. आतां सिद्धीस नेणें तुजकडे आहे.' कांहीं दिवसांनीं नामदेवाचें लग्न झालें. यास एका पाठीमागें एक नारायण, महादेव, गोविंदा आणि विठोबा असे चार पुत्र झाले. त्यापुढें त्यांचींही लग्नें झालीं. लाडाई, गोडाई, येसाई आणि साकराई आशा याला चौघी सुना आल्या. नाऊबाई त्याची बहीण होती व निंबाई त्याची मुलगी होती. येणेंप्रमाणें त्याच्या कुटुंबांतील माणसें पाहून देव नामदेवास ह्मणाले, 'तूं व तुझ्या कुटुंबांतील सर्व माणसें यांनीं शतकोटी काव्य कडेस लावावें. सर्वत्रांस स्फूर्ति देणें, व अभंग लिहिणें, तें मजकडे लागलें.' याप्रमाणें आज्ञा होतांच सर्वांनीं काव्य रचनेस आरंभ केला.

नामदेवाचे घरीं फारच दारिद्र्य असे, व घरांत मनुष्यें पुष्कळ असत. ह्मणून सर्वांस प्रतिदिवशीं अन्न मिळण्याची पंचाइत. याचे घरीं पुष्कळ साधूही येत असत. त्यांचें भोजन झाल्यानंतर आपण जेवण्याचा याचा नेहमींचा नित्य नियम असे. दरिद्रामुळें सर्वांच्या अंगावर फाटकीं वस्त्रें असत. एकदां नामदेवास श्रीविठ्ठलांनीं विचारलें कीं 'नाम्या, तुला माझी शपत आहे. तुझ्या घरची खरीखरी हकीकत सांग. नंतर नामदेवांनीं सर्व सांगितलें. तें ऐ-

कून देवास वाईट वाटलें. आणि त्यावेळेस कांहींच बोलले नाहींत. दुसरे दिवशीं प्रभु वाणी होऊन गरुडास बैल केलें आणि त्याजवर सुवर्णहोनाची एक गोणी घातली, आणि नामदेवास नकळतां निघाले. तेव्हां मार्गांत लोक विचारूं लागले, 'शेटजी कोठें चालला.' पांडुरंगानें सांगितलें कीं, 'नामदेवाचे घरीं जातों.' नंतर लोकांनीं हंसावें, कारण त्याच्या घरीं आधींच अन्न नाहीं व हा तेथें चालला. नंतर प्रभु कांहींच न बोलतां, नामदेवाच्या घरास आले. नामदेवाची बायको राजाई हीस प्रभु ह्मणतात 'बाई, तुमचे घरीं पाहुणे आले त्यांस बाहेर बसावयास द्या. हें वाक्य ऐकून राजाई ह्मणाली घरीं घरधनी नाहींत, जाऊन फिरून यावें.' असें बोलून जवळ शेजारीण होती तिच्यापाशीं जाऊन गाऱ्हाणें सांगूं लागली, 'हे बाई काय तुला सांगूं पाहुण्यांनीं प्राण खाल्ला. त्याचप्रमाणें साधु दरदिवशीं येतात, बरें असो. आज तर घरांत दाणे देखील नाहींत.' हें सर्व बोलणें प्रभूंनीं दरवाजापाशीं उभें राहून ऐकिलें आणि प्रभु ह्मणतात 'बाई, लौकर या'. नंतर राजाईनें दरवाज्याआडून विचारलें, 'तुह्मी कोण, कोठून आलां, तुमचें नांव काय?' नंतर श्रीविठ्ठल आपलें नांव सांगतात. 'माझें नांव केशवशेट; नामदेवाचा व माझा स्नेह आहे. त्याचे घरीं अन्न नाहीं, असें वर्तमान ऐकिलें ह्मणून त्यास देण्याकरितां होनांनीं भरलेली गोणी आणिली आहे.' हें वाक्य ऐकतांच राजाईनें बाहेर येऊन बसावयास दिलें आणि मोठ्या नम्रतेनें बोलूं लागली. त्या

वेळेस पांडुरंग ह्मणाले, 'अगे राजाई, ही द्रव्याची गोणी आपल्या घरांत नेऊन ठेव, आणि नामदेवास सांग कीं, तुझा मित्र आला होता, आणि हें द्रव्य संपल्यानंतर मला निरोप पाठीव; आतां आह्मी जातों.' राजाई ह्मणाली 'आपणास न जाणून मी फार निष्ठुर बोलिल्यें, यास्तव राग नसावा आतां भोजन करून जावें. घरधन्याचें व आपलें एवढें प्रेम आहे, हें मला माहीत नव्हतें. आतां भोजन केल्यावांचून मात्र जाऊं नये' नंतर प्रभूंनीं सांगितलें कीं, 'मी नाम्यास टाकून कधीं जेवणार नाहीं.' असें बोलून पांडुरंग जाते जाहले. नंतर राजाई मोठ्या आनंदानें गोणींतून वाटीभर होन काढून वाण्यास देऊन त्याजकडून सर्व सामान आणविलें. आणि मोठ्या हर्षानें स्वयंपाक करूं लागली. नंतर नामदेवानें सर्व द्रव्य वगैरे पाहून विचारलें, हें द्रव्य कुठलें? त्यावेळेस राजाईनें नामदेव द्रव्य वांटून टाकील अशा भयानें कांहींच उत्तर दिलें नाहीं, नंतर जनाबाईनें सर्व वर्तमान सांगितलें. तें ऐकून नामदेवानें असा विचार केला कीं, हें द्रव्य आपणास ईश्वरभजनाविषयीं प्रतिबंधक होईल, यामुळें हें आपल्यापाशीं नको. असा निश्चय करून गांवांतील ब्राह्मण बोलावून त्यांस तें सर्व द्रव्य वांटून टाकलें. अशाप्रकारच्या उदारतेच्या व सज्जनपणाच्या याच्या पुष्कळ गोष्टी आहेत, त्या बहुतेक भक्तविजयग्रंथांत लिहिल्या आहेत. ज्यास पाहिजे असतील त्यानें तो ग्रंथ पहावा. श्रीनामदेवाचा मठ क्षेत्र मजकुरीं आहे. येथें नामदेव राहत

होते; हा मठ फारच रम्य आहे; यामध्यें एक प्रभूची मूर्ति आहे, तिजपुढें नेहमीं भजन चाललें असतें. हें स्थान पाहाण्यासारखें आहे. आतां श्रीनामदेव शके १२९८ सालीं आषाढवद्य त्रयोदशीस गुप्त जाहले; तेथें पूजेकरितां त्या स्थलीं पायरी केली आहे; तीस नामदेवाची पायरी असें ह्मणतात; तिजविषयींची सर्व हकिकत द्वितीय भागांत लिहिलीच आहे.

## जनाबाई.

ही शूद्राची स्त्री, नामदेवाच्या घरीं दळण, कांडण, वगैरे सेवा करणारी, त्याची दासी होती. हिची मूळ गोष्ट अशी आहे कीं, कोणी वारकरी आपल्या स्त्री सहवर्तमान, कार्तिकीच्या यात्रेकरितां पंढरीस आला असतां, त्यानेंही आपली मुलगी बरोबर आणिली होती. गोपाळकाला झाल्यावर तो संत गांवाकडे परत जाण्यास निघाला; तेव्हां ही परत जाईना, ह्मणून हिला परत नेण्याविषयीं, आपली होती तितकी पराकाष्ठा यानें केली; शेवटीं ही येत नाहीं, असें पाहून तो हिला देवाच्या महाद्वारापाशीं सोडून गांवाकडे चालता झाला. पुढें हिला अनाथ जाणून नामदेवानें हिचें पालन केलें. त्यावरून ही त्याच्याच घरीं राहूं लागली. नामदेवाच्या संगतीनें त्याचें भजन पूजन पाहून ही विठोबाची संतीण झाली. हिनें भक्तिभावानें देव आपला इतका ऋणी केला होता कीं, तो हिला दळूं व कांडूं लागे; व हिच्या घरीं भोजनही करी. एकदां पाहांटेस देव हिला दळूं लागला, आणि तें पुरें होतांच देवळांत गेला. परंतु द-

ळतांना गळ्यांतील जडावाच्या पदकाचा हार काढून ठेवलेला तेथेंच राहिल्यामुळें, काकडआरतीच्या वेळीं तो गळयांत नाहीं असें पाहून, पुजाऱ्यांनीं चोहोंकडे चौकशी केली. त्यांत हा हार तिच्या अंथरुणांत निघाला. त्यावरून हिला सुळावर द्यावी असा सरकारचा हुकूम सुटला. व सुळावर चढवूं लागले. तेव्हां हिनें देवाचा धांवा केल्यावरून सुळाचें पाणी झालें. ( भक्तविजय, अ० २१. ) हिनें लग्न मुळींच केलें नव्हतें. नामदेवानें स्वतः आपण व घरचीं तेरा माणसें यांनीं मिळून जे अभंग लिहिले, त्या चौदा माणसांशिवाय ही एक पंधरावी त्यांत होती. हिचे अभंग फारच प्रेमळ आहेत.

## अंतोबा गोसावी.

हा समर्थ रामदास स्वामींचा शिष्य, सातारप्रांतांत मेथवड ह्मणून जो गांव आहे, तेथील राहणारा असे. समर्थांनीं यास पंढरी येथें आषाढी कार्तिकीस जावें ह्मणून आज्ञा करून पंढरपुरीं एक मठ बांधून देवविला होता. समर्थही या दोन्ही वाऱ्यांस कित्येक वर्षें येत असत. परंतु पुढें आपणास न बनल्यास यानें येत जावें असें सांगितल्यावरून हा येऊं लागला. याप्रमाणें कथा श्रीरामदासचरित्रांत आहे. एवंच समर्थ श्रीरामदास ही पंढरपुरच्या वाऱ्या नियमानें करीत होते. हें सहजच सिद्ध होतें. अस्तु.

## तुकाराम.

पंढरपुराच्या पांडुरंगाच्या भक्तमंडळांत हा एक मोठा

प्रख्यात साधु होऊन गेला. वडिलांपासून वाणीपणाचा धंदा करणारा असे. याचें जन्म देहू येथें शालिवाहन शके १६३० मध्यें झालें. याच्या पूर्वजांचा वृत्तांत येणेंप्रमाणें आढळतो:— याचा मूळपुरुष विश्वंभर होता. तो विठोबाचा मोठा भक्त असे. महिन्याच्या महिन्यास पंढरीस जाणें, हा त्याचा मोठा नेम होता. हल्लीं देहूस जें विठोबाचें देऊळ आहे तें त्याच्याच वेळेस बांधलें गेलें. विश्वंभराच्या बायकोचें नांव अमाई होतें. व हरि आणि मुकुंदा हे त्यास दोन पुत्र होते. विश्वंभर मरण पावल्यावर त्याच्या बायकोनें आपल्या दोघां मुलांस वारी करण्याचा उपदेश केला. परंतु त्यांचें चित्त प्रपंचांत अतिशय आसक्त असल्यामुळें त्यांनीं तिचा उपदेश अमान्य केला. व कोणी एका राजाच्या लष्करांत मोठा अधिकार मिळविला. पुढें आपापल्या बायकांस व आईस त्यांनीं तिकडेसच नेलें. आणि तिकडेच सुखानें प्रपंच करित राहिले. याप्रमाणें बरेच दिवसपर्यंत चाललें असतां त्या दोघांसही एकदां राजाबरोबर परचक्रावर जाण्याचा प्रसंग आला. व कर्मधर्मसंयोगानें उभयतांही लढाईंत पडून मरण पावले. हें वर्तमान अमाईस कळतांच तिला अनिवार शोक झाला. त्यांत एक सून ह्मणजे मुकुंदाची बायको ती तर नवऱ्याबरोबर सतीच गेली. व दुसरी मात्र गरोदर होती ह्मणून राहिली. नाहींतर तिचाही मानस तसाच होता. पुढें अमाई सुनेस घेउन सर्व चीजबस्त सुद्धां देहूस आल्यावर सून बाळंतीण होऊन तिला मुलगा झाला. त्याचें नांव तिनें विठोबा ठेविलें.

परंतु तो मोठा झाला नाहीं तोंच अमाई एकाएकीं मरण पावली. विठोबा मोठा झाल्यावर आईपासून त्याला आपल्या वडिलांची वगैरे सर्व हकिकत कळली. ह्मणून त्यानें पुनः वारी चालूं केली. भजनपूजनांत आपला काळ घालवून प्रपंच करूं लागला. पुढें विठोबाचें लग्न झालें व कांहीं काळानें त्यास पदाजी नांवाचा पुत्र झाला. त्या पदाजीस पुढें शंकर झाला. शंकराचा कान्होबा; कान्होबाचा बोल्होबा; आणि बोल्होबास कनकाईपासून सावजी, तुकाराम, व कान्होबा असे तीन पुत्र झाले.

या तिघांत सावजी जो वडील तो विरक्त असल्यामुळें व धाकटा लहान असल्यामुळें बोल्होबानें मधला मुलगा तुकाराम याच्या अंगावर सर्व प्रपंचाचा भार घातला. त्यावेळेस त्याचें वय सारें तेरा वर्षांचें होतें. हा आपले ठिकाणीं विरक्त होता. व प्रपंच करण्याची याला मुळीं जरूर नसे. परंतु आईबापांची आज्ञा मोडूं नये, व त्यांस दुःख देऊं नये, हा मुलाचा धर्म आहे; यास्तव तुकाराम ते जीवंत होते तोंपर्यंत त्यांच्या आज्ञेनें प्रपंच करीत होता. पुढें चार वर्षांनीं म्हणजे याच्या वयाच्या सत्रावे वर्षीं आईबापें मरण पावलीं. नंतर मोकळा झाला. पुढें मोठी महागाई पडली. तींमध्यें याचीं पुष्कळ मनुष्यें हीं मेलीं. अखेरीस हा, याची दुसरी कर्कशा बायको 'जिजाबाई' आणि धाकटा भाऊ, व त्याची बायको येणेंप्रमाणें माणसें शिल्लक राहिलीं. नंतर हा फारच वैराग्यशील जाहला.

प्रतिदिवशीं ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, यांचा कांहीं पाठ करून श्रीपांडुरंगाचें उत्तम रीतीनें ध्यान, भजन, व पूजन करून राही. व राहिलेल्या वेळांत कोणाचें काम करून निर्वाह चालवूं लागला. तुकारामाचें लो-कांकडे जें येणें होतें तें वसूल करण्याचें त्यानें तर सो-डून देऊन शिवाय त्याबद्दलचे त्याजवळ असलेले रोखे इंद्रायणींत बुडवावे असें त्यानें मनांत आणिलें. परंतु धाकटा भाऊ ह्मणूं लागला 'तुह्मीं असें करितां खरें पण माझी वाट काय ?' त्यावरून तुकारामानें निम्मे रोखे त्यास देतांच तो वेगळा राहिला. असें पाहून आपल्या वांट्याचे रोखे त्यानें इंद्रायणींत बुडवून टाकिले, आणि आपणापाशीं असलेलें सर्व द्रव्य याचकांस वांटिलें. नं-तर निखालस मोकळा होऊन भजनांत आपला काळ घालवूं लागला.

एकदां एक शेतकरी येऊन ह्मणाला, 'तुकारामशेट, तुह्मी उगीच देवळांत वगैरे भजन करीत जे बसतां ते जर माझ्या शेतावर बसाल तर तुमचें भजनाचें भजन होऊन, माझेंही शेत राखलें जाईल याबद्दल मी तुह्मास राशीवर अदमण दाणे देईन.' ही गोष्ट यानें कबूल क-रतांच यास शेतावर नेऊन बसविलें. आणि आपण खेप करण्यास परगांवीं निघून गेला. इकडे शेतांत दाणा भ-रत चालला होता त्यामुळें त्यावर पांखरें येऊन पडलीं. तेव्हां यानें विचार केला कीं भुकेलेल्या पांखरांस हां-कणें नीट नाहीं. यास्तव यांनीं खाऊन राहील तें रा-हील असें ह्मणून उगाच राहिला. त्या योगानें पांखरांनीं

शेताचा खराटा करून सोडिला. थोड्याच दिवसांनीं शेताचा मालक खेंपेहून आला आणि पाहतो, तर शेतांत दाणा ह्मणून मुळींच राहिला नाहीं. त्यावरून तुकारामाची व त्याची पुष्कळ बोलाचाली होऊन तें भांडण चावडीवर आलें या पंचाइतीस गांवांतील लोक ही जमले. नंतर त्यांनीं उभयतांचा मजकूर ऐकून घेऊन शेतकऱ्याचें दोन खंडींचें नुकसान झाल्याचें समजल्यावर तितक्या दाण्याचा पैका आकारून त्याबद्दलचा रोखा तुकारामाकडून लिहून शेतकऱ्यास देवविला. परंतु पुढें असा चमत्कार झाला कीं, राशीवर शेतांत सत्राखंडी दाणा उतरला. तो पाहून शेतकऱ्याच्या तोंडास पाणी सुटून तो तुकारामास रोखा परत देण्यास कबूल झाला. पण गांवकऱ्यांनीं झालेला ठराव फिरणार नाहीं असें सांगून त्यास दोन खंडी दाणे दिले व रोखा परत घेऊन तुकारामास दिला. नंतर राहिलेले पंधराखंडी दाणे महादाजीपंत देशपांडे ह्मणून एक प्रामाणिक गृहस्थ होता त्याजकडे भरून ठेवविले. ते तुकारामानें पोटास न खातां त्यांच्या पैशांत त्यानें वडीलांनीं बांधिलेल्या देहू येथील विठोबाच्या देउळाचा जीर्णोद्धार केला.

पुढें तुकाराम सार्वकाल कीर्तन करूं लागला. एकांतांत बसणें झाल्यास, देहूपासून सुमारें दोन कोसांवर भावनाथाचा डोंगर आहे, तेथें जाऊन बसूं लागला. सारांश प्रपंचाकडे पाहणें त्यानें इतकें सोडिलें कीं, घरीं बायको व मुलें त्यांचा निर्वाह कसा होतो, त्याची काळजी टाकिली. व पंधरा पंधरा दिवस घरींही येईनासा झा-

ला. त्यामुळें बायकोचा निरुपाय होऊन ती मोलाचें काम करून आपला व मुलांचा निर्वाह करूं लागली. आणि यासही हा असेल तेथें कधींकधीं वाढून नेऊन पोहों-चवूं लागली. महिपतिबावांनीं याचें चरित्र भक्तविज-याच्या अठ्ठेचाळीस व एकुणपन्नास अध्यायांत लिहिलें आहे. त्यांत तुकारामाचा वृत्तांत सविस्तर लिहिला आहे. ह्मणून, ग्रंथविस्तारभयामुळें, येथें लिहीत नाहीं. याप्रमाणें भजन, पूजन कथाकीर्तन करणें, एकादशीचें व्रत पाळणें, पंढरीस वारीस जाणें, इत्यादि नेमानें वा-गत असतां यास अभंग करण्याविषयींचा आज्ञा झाली. तीविषयीं यानें लिहिलें आहे तें असें:—

## अभंग.

नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें ॥ स्वयें पांडुरंगें येऊ-नीयां ॥ १ ॥ सांगितलें काम करावें कवित्व ॥ वाउगें निमित्त बोलूं नका ॥२॥ माप टाकी सळ धरीली विठ्ठलें॥ थापठोनी केलें सावधान ॥ ३ ॥ प्रमाणाची संख्या सांगे शतकोटी ॥ उरले शेवटीं लावी तुका ॥ ४ ॥

यानें एकंदर अभंग किती लिहिले त्यांची संख्या एके ठिकाणीं या प्रमाणें आहे :—

वेदाचे अभंग, केले श्रुतिपर ॥ द्वादश सहस्र, संहितेचे ॥ १ ॥ निरुक्त, निघंट, आणि ब्रह्मसूत्र ॥ अवतार सहस्र, उपग्रंथ ॥ २ ॥ अभंग ते कोटी, भक्तिपर केले ॥ ज्ञानपर केले, तितुकेची ॥ ३ ॥ पंचाहत्तर लक्ष वैराग्य वर्णिलें ॥ नाम तें गाईलें, तितुकेंची ॥ ४ ॥ साठी लक्ष केला, बोधक जनांसी ॥ वर्णिलें रूपाशीं,

तितुकेंची ॥ ५ ॥ द्वादश सहस्र, आत्मबोध केला ॥ अनुभव घेतला, एक सर्व ॥ ६ ॥ चौतीस सहस्र, लक्ष कोटी पांच ॥ सांगोनियां साच, तुका गेला ॥ ७ ॥

तुकारामाच्या अभंगांविषयींची संख्या वरील संख्येहून वेगळ्यारीतीची आढळते. बरें असो. यानें याप्रमाणें पांच कोट, एक लक्ष, चौतीस हजार, अभंग केले. आणि यानें लोकांस चमत्कारही पुष्कळ दाखविले. या गोष्टी लोकांत व भक्तविजय ग्रंथांत पुष्कळ प्रसिद्ध आहेत. याचा छळ ही पुष्कळच झालेला आहे. तरी त्यानें आपली शांत वृत्ति व भगवद्भक्ति कायम राखिली. त्यामुळें जरी कित्येक ब्राह्मण याच्या भक्तीस लागले, तरी यानें कोणास उपदेश ह्मणून केलाच नाहीं. कारण शूद्रानें ब्राह्मणास उपदेश देणें हा अविधि होय, असें पूर्ण तो समजत होता. त्याच्या मागें अभंग ह्मणूं लागणारे मुख्य चौदा असामी होते. त्यांपैकीं रामेश्वरभट्ट, कोंडभट्ट, गंगाधर मवाळ, संताजी तेली, इत्यादिक प्रसिद्ध आहेत. तुकोबाच्या भेटीस शिवाजी राजाही आला होता. व त्यानें यास पुष्कळ द्रव्यही दिलें होतें, परंतु यानें त्यांतील एक पैशास ही स्पर्श केला नाहीं. याची कीर्तन करण्याची शैली फारच चांगली होती, ह्मणून शिवाजी राजा याच्या कीर्तनास नेहमीं येई. त्यास काशी, भागीरथी, आणि गंगा अशा तीन मुली, व महादेव, विठोबा, नारायण, असे तिघे मुलगे होते. यांत धाकटा नारायणबावा गर्भांत असतांच तुकाराम परलोकवासी झाल्यामुळें

मागून जन्मला होता. हा नारायणबावा पुढें चांगला निपजून कीर्तन हीं उत्कृष्ट करूं लागला. तें त्याचें कीर्तन शिवाजीनें ऐकिल्यावर आणि त्याची भक्ति पाहिल्यावर, त्यास त्यानें चार गांवें इनाम करून दिलीं. तुकारामाच्या स्वर्गास जाण्याच्या गोष्टी प्रसिद्ध आहेत. कोणी म्हणतात तो श्रीक्षेत्र पंढरपुर येथें चंद्र-भागेंत गुप्त झाला. कोणी ह्मणतात देहासुद्धां वैकुंठास गेला. तकाराम फाल्गुन वद्य द्वितीया शके १५७१ विरोधी नाम संवत्सरामध्यें परलोकीं गेला. त्यावेळेस त्याच्या वयास ४१ वें वर्ष होतें. याच्या .गमनकालीं अप्सरा व गंधर्व गायन करूं लागले. दुंदुभी वाजूं लागले. याची योग्यता ज्ञानदेवाबरोबर आहे. किंबहुना अधिक ही ह्मटल्यास हरकत नाहीं. हा नामदेवाचा अवतार याचे अभंग फारच जगप्रसिद्ध आहेत.

## कूर्मदास.

भक्तविजयांतील सोळावे अध्यायांत याचें चरित्र आहे. त्यावरून असें कळतें कीं, हा पैठण येथील राहणारा, जातीचा ब्राह्मण होता. हा जन्मल्या दिवसापासून पांगळा व थोटा असे. ह्मणून याच्या मनांत पंढरीस जाऊन पडावें असें आलें. पुढें हा कार्तिकी एकादशीस पंढरीस जाण्याच्या हेतूनें खुरडत खुरडत निघाला. परंतु तशा चालण्यानें याच्यानें एका कोसाहून अधिक जाववत नसे. अशा रीतीनें जातां जातां कार्तिक शुद्ध १० स लहूळ ह्मणून, कर्माळें तालुक्यांत, आग्नेय दिशेस, एक गांव आहे, तेथें येऊन

पोहोंचला. तेथून पंढरपुर अकरा कोस आहे. तेव्हां यानें पाहिलें कीं आतां एकादशीकरितां आपलें जाणें पंढरीस होत नाहीं. ह्मणून मग यानें मनांत देवाची प्रार्थना केली. आणि भक्तिपूर्वक वारकऱ्यांबरोबर देवास निरोप सांगून धाडिला कीं, 'हे दयानिधे विठ्ठला कृपा करून येथें येऊन मला दर्शन द्यावें. त्या निरोपाप्रमाणें पांडुरंगांनीं तेथें जाऊन त्यास दर्शन दिलें. याची समाधि तेथें आहे. त्याचें दर्शन अवश्य घ्यावें. एवंच श्रीपांडुरंग हे अनन्यभावानें आपल्या दर्शनाची इच्छा करणारास कोठें ही असला तरी त्यास तेथेंच दर्शन देतात.

## चांगदेव.

हा पांडुरंगाचा मोठा भक्त होता. महाराष्ट्रदेशांत देशभाषेंत कविता करणारे जे साधु व कवि होऊन गेले, त्या सर्वांत हा पहिला होता. यावरून असें समजावें कीं, हा मुकुंदराजाच्याही आधींचा होता. आजपर्यंत प्रायः अशी समजूत होती कीं, मराठी भाषेंतील आद्यकवि मुकुंदराज होता. परंतु ती अलीकडे पुष्कळ बदलली आहे. एकनाथ स्वामींनीं तर भागवताची टीका लिहितांना हा आद्यकवि समजून यास नमन केलें आहे. त्यावरून असें दिसून येतें, कीं यानीं केलेले कांहीं ग्रंथही असावेत. एकनाथांनीं नमन केलें आहे तें येणेंप्रमाणें:—

ओंवी:— 'वंदू प्राकृत कवीश्वरू ॥ निवृत्ती प्रमुख ज्ञानेश्वरू ॥ नामदेव चांगदेव वटेश्वरू ॥ ज्या-

चें भाग्य थोरू गुरुकृपा ॥ १ ॥ जयाचे ग्रंथ पाहतां ॥ ज्ञान होय प्राकृतां ॥ तयाचे चरणीं माथा ॥ निजात्मता निजभावें ॥ २ ॥ महिपतीबावा यांनीं याची उत्पत्ति वर्णिली आहे. ती अशी:– स्वर्गामध्यें मरुद्गण नांवाचे देव आहेत. त्यांस एकेकाळीं कांहीं कारणावरून इंद्राचा शाप झाला कीं, 'तुह्मांस मृत्युलोकीं जन्म घडेल. तेव्हां त्यांनीं उःशापाविषयीं प्रार्थना केली. इंद्र बोलला, पुढें पृथ्वीवर ज्ञानेश्वरप्रभृति देवांश प्रगट होणार आहेत, त्यांचा तुह्मांस दर्शनलाभ व अनुग्रह झाला ह्मणजे तुह्मी स्वर्गास परत याल. यावरून मरुद्गण पृथ्वीवर आले. मरुद्गण पृथ्वीवर येतांच त्यांनीं मनुष्यांचीं रूपें धारण केलीं आणि तापी व पयोष्णी या नद्यांच्या संगमांतील कर्दळीवनांत संचार केला. त्याकाळीं त्यांपैकीं एक मरुद्गण हा ज्यांस ज्यांस दृष्टीस पडला, त्यांस त्यांस याच्या रूपाचें आश्चर्य होऊन हे कोणीतरी देवांश आहेत, असें त्यांनीं मानिलें. यांच्या रमणीय आणि दिव्य कांतीवरून चांगला देव याचा संक्षेप 'चांगदेव' करून त्या नांवानें याची सर्वत्र प्रसिद्धी केली.

लोक असें ह्मणतात कीं, हा समाधि लाऊन योगबलानें शंभर शंभर वर्षेंपर्यंत बसे. व शंभर वर्षें भरलीं कीं, बाहेर उठून येऊन एक वर्षभर बाहेर राहून पुनः समाधि लाऊन घेई. याप्रमाणें यानें तेरावेळ करून चौदाव्या खेपेस ह्मणजे त्या शतकाच्या समाप्तीस जेव्हां बाहेर आला, तो पुनः समाधि लाऊन बसला नाहीं. वरील गोष्टीविषयीं महिपतिबावांनीं आपल्या भक्तविजयाच्या

२२ व्या अध्यायांत याप्रमाणें लिहिलें आहेः— ओंवी. शतवर्षें भरतां जाणा ॥ मुदती करिती कालवंचना ॥ पुनरपि आणून देहभाना ॥ कौतुकें नाना दाखवी ॥ १ ॥ एक सहस्र चारि शतेंवरी ॥ चांगदेव वांचले याचिपरी ॥ कीर्ति प्रगटली देशांतरी ॥ उपमा दुसरी असेना ॥ २ ॥ चौदाशें वर्षांत साचार ॥ चौदा वर्षें क्रमिलीं बाहेर ॥ तितकीं ही स्थळें भिन्नाकार ॥ पृथ्वीवरी असती ॥ ३ ॥ याप्रमाणें हा चौदाशें चौदा वर्षें वांचला होता. चौदाव्या शतकाच्या अंतीं जेव्हां हा बाहेर राहण्यास आला, तेव्हां ज्ञानेश्वरानें रेड्याच्या मुखीं वेद बोलविल्याची कीर्ति ऐकिली, त्यावरून असें सांगतात कीं, यानें प्रथम पत्र पाठविलें तें कोरें असल्यावरून मुक्ताबाईनें इतकेंच ह्मटलें कीं, 'चौदाशें वर्षें वांचून अजून हा कोराच आहे.' ह्मणजे अध्यात्मज्ञानशून्य आहे. कोरें पत्र आलें त्याचें कारण असें, ज्ञानेश्वरादिक भावंडे वयानें आपणापेक्षां लहान आहेत म्हणून यांस तीर्थरूप लिहितां येत नाहीं. बरें चिरंजीव लिहावें तर ज्ञानवृद्ध आहेत. सारांश हा पुढें वाघावर बसून व हातांत सर्पाचा चाबूक घेऊन ज्ञानेश्वराच्या भेटीस निघाला. हें वर्तमान ज्ञानेश्वरास कळलें. त्यावेळेस तो सकाळीं भावंडांसहित पडक्या भिंतीवर ऊन खात बसला होता. चांगदेव जवळ आले असें पाहून ज्ञानेश्वरांनीं भिंतीस ह्मटलें 'चाल बाई' आणि ती भिंत चालूं लागली व सर्व भावंडें अशा प्रकारें त्यास सामोरीं गेलीं. ही भिंत अजून अळंदीस गांवाबाहेर आहे. जनाबाईनें

याविषयीं असें ह्मटलें आहे.

अभंगः–सांगा देव कां न होती ॥ निर्जीव चालविली भिंती ॥ १ ॥

चांगदेव सजीवावर बसून आला होता व हीं मुलें निर्जीवावर बसून येत आहेत, असें पाहून तो वाघा-खालीं उतरला. व गर्वहत होत्साता लोटांगण घालीत त्याजवळ आला. याविषयीं तुकारामानें याप्रमाणें ह्मटलें आहे. अभंग— 'उपजत ज्ञानी, हे वर्म जाणूनी ॥ आले लोटांगणीं, चांगदेव ॥ १ ॥ चांगदेव नमस्कार करतांना पाहून ज्ञानेश्वर भावंडांसहित भिंती-खालीं उतरला, आणि सर्वांनीं त्यास आलिंगनें दिलीं. नंतर परस्पर संभाषणें झालीं. व कांहीं काळानें त्यास अध्यात्मविद्येचा अनुग्रह झाला. तो 'चांगदेवपांसष्टी' ह्मणून पांसष्ट ओंव्यांचा ज्ञानदेवाचा ग्रंथ आहे. त्यांत स्पष्ट आहे.

आतां चांगदेवास 'चांगावटेश्वर' नांव पडलें. त्याचें कारण असें आहे कीं, चांगदेवाचे शिष्य अरुण-गांवाचे राहणारे दोघे भाऊ होते. ते कधींकधीं चांगदेवास तापीनदीवर स्नानासाठीं नेत असत. नेण्याचें कारण असें कीं, मार्गांत चालतांना वगैरे चांगदेव घरीं येतपर्यंत डोळे मिटून चालत. एकदां असें झालें कीं, चांगदेव स्नान करून आसनावर येऊन बसले तरी उभयतां बंधूंस पार्थिवाकरितां माती आणावयाची तिचें स्मरणच राहिलें नाहीं. पुढें जेव्हां चांगदेवांनीं पुसलें, 'अरे पार्थिवाची माती कोठें आहे? त्याबरोबर दोघांसही स्मरण झालें, व त्यांनीं तेथेंच वाळूंत एक वाटी उपडी घालून

ह्मटलें महाराज आज यास्थळीं आयतेंच स्वयंभू शिवलिंग असल्याकारणानें आह्मी माती आणिली नाहीं. त्यावरून चांगदेवांनीं 'बरें आहे' ह्मणून, पालथ्या घातलेल्या वाटीचेंच शिवलिंग समजून तिची पूजा केली. तेणेंकरून असें झालें कीं वाटी वाळूंत पक्की होऊन तिचें खरोखरीच शिवलिंग झालें. तेव्हांपासून त्या लिंगास 'वटेश्वर' नांव पडलें. व चांगदेवाकडून शिवलिंग झाल्यामुळें लोकांमध्यें चांगदेवाची 'चांगावटेश्वर' या नांवानें प्रसिद्धी झाली. ज्ञानेश्वरी ग्रंथ होऊन सुमारें सहाशें वर्षें होतें आलीं आहेत. त्यापूर्वीं चांगदेव चौदाशें वर्षें असल्यास त्याचें पृथ्वीवर येणें, विक्रमशकापूर्वीं कांहीं काळ झालें होतें, असें ह्मणणें भाग येतें. सारांश हा पुरुष दोन हजार वर्षांपूर्वींचा असून 'चांगाकेशवदास' हें याचें रूपांतर होतें असें ह्मणतात याविषयीं भक्तविजयांत कथा सविस्तर आहे.

चांगदेव श्रीपांडुरंगाचा मोठा भक्त होता हा श्रीक्षेत्र पंढरपुर येथें दर एक महिन्यास वारीकरितां येत असे. श्रीविठ्ठलाचें पुढील निम्में देवालय यानें बांधिलें. त्याजविषयीं एक शीळालिपि सांपडली आहे तींतील एक प्रमाणः—चांगदेवेतिविख्यातगोदातीरनिवासिना ॥ श्रीमद्विठ्ठलनाथस्य नेमं देवालयं कृतम् ॥ १ ॥

अर्थः—गोदावरीचे तीराचे ठायीं राहणारा चांगदेव या नामानें प्रसिद्ध जो साधु त्यानें श्रीविठ्ठलाचें निमें देवालय बांधिलें. यानें श्रीपांडुरंगाच्या स्तुतिपर पुष्कळ अभंग केले आहेत. ते सर्वत्र प्रसिद्धच आहेत.

## निवृत्तिनाथ.

पुण्यापासून सुमारें आठ कोसांवर इंद्रायणीच्या कांठी आळंदी म्हणून गांव आहे. तेथें याचें जन्म शालिवाहन शकाच्या ११९२ यावर्षीं प्रमोदनाम संवत्सरीं झालें. याच्या बापाचें नांव विठ्ठलपंत, व आईचें नांव रखुमाबाई होतें. ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई हीं याचीं धाकटीं भावंडें होतीं. व हा जातीचा वाजसनेयी ब्राह्मण होता. यासुद्धां याच्या भावंडांची उत्पत्ति भक्तविजय ग्रंथाच्या आठव्या अध्यायांत महिपतिबावा यांनीं येणेंप्रमाणें लिहिली आहे:— पैठणाजवळ गोदावरीच्या तिरीं असणारा आपेगांवचा कुलकर्णी गोविंदपंत नांवाचा कोणी गृहस्थ होता, त्याची बायको निराबाई होती, तिला त्यापासून एक पुत्र झाला, त्याचे नांव विठ्ठलपंत होतें, विठ्ठलपंताची मुंज झाल्यावर तो तीर्थयात्रा करण्यासाठीं निघाला, व कांहीं दिवसांनीं फिरतफिरत आळंदीस आला. तेथें सिद्धोपंत नांवाचा कोणी गृहस्थ सुखवस्तु रहात असे. त्यास एक कन्या होती, व ती उपवर झाली होती, ह्मणून तो तिच्या लग्नाच्या विचारांत होता. तेव्हां सिद्धोपंतास एके दिवशीं असा दृष्टांत झाला कीं, यानें आपली मुलगी विठ्ठलपंतास द्यावी. व ती विठ्ठलपंतानें वरावी. त्यावरून सिद्धोपंताचें व विठ्ठलपंताचें बोलणें होऊन लग्न ठरलें. व सिद्धोपंतानें विठ्ठलपंताच्या आईबापांस आपेगांवाहून आळंदीस आणून आपली मुलगी विठ्ठलपंतास लग्न करून दिली. तिचें नांव सासूसासऱ्यांनीं रखुमाई असें ठेविलें.

सिद्धोपंतास एकुलती एकच ही मुलगी होती. ह्मणून त्यानें गोविंदपंतास विनंती केली कीं, मला दुसरें कांहीं मूल नाहीं. याकरितां आपण चिरंजीवास थोडे दिवस येथें कृपा करून ठेवावें. यावरून गोविंदपंत 'बरें आहे' असें ह्मणून, कुटुंबासह आपें गांवास निघून गेला, व आईबापांस भेटून बापाच्या वृत्तीचें काम संभाळून प्रपंच करूं लागला. याप्रमाणें थोडीं वर्षे झालीं तों असें झालें कीं, गोविंदपंत व निराबाई हीं उभयतां कैलासवासी झालीं. तेणेंकरून विठ्ठलपंत उदास जाहला व त्यानें कुलकर्णीपणाचें काम भावाबंदांच्या गळ्यांत घालून, कुटुंबास घेऊन आळंदीस येणें केलें. विठ्ठलपंत आळंदीस आल्यावर तेथें बरेच दिवस सुखानें राहिला. कारण त्याचा सासरा सिद्धोपंत हा घरचा खाऊनपिऊन सुखी होता. परंतु थोड्या दिवसांनीं तोही वारला. त्यामुळें त्यास पुनः उदासीनता प्राप्त झाली, व आळंदी येथें त्यास करमेनासें झालें. तथापि तसेच दिवस लोटीत असतां एकदां त्यानें बायकोस संन्यास घेण्याची आज्ञा मागितली. परंतु ती तीनें दिली नाहीं. कारण, तिला यापासून मूल झालें नव्हतें. याप्रमाणें कांहीं दिवस लोटल्यावर विठ्ठलपंतानें तिला एकदां काव्यानें मोघम असें पुसलें कीं, मी गंगास्नानास जातों. त्यावर तिनें सहज 'बरें आहे' असें ह्मटलें तेवढ्या वचनावर तो तेथून निघून काशीस गेला. व रामानंदस्वामीपासून संन्यासदीक्षा घेऊन, वेदांताचें श्रवण, मनन, करून, सुखानें कालक्रमण करीत राहिला.

इकडे आपला पति स्नानास गेला तो गेलाच असें पाहून रखुमाबाईस अनिवार दुःख झालें. परंतु उपाय नाहीं, असें जाणून तिनें पिंपळाची सेवा धरिली. या गोष्टीस सुमारें बारा वर्षे होत आलीं तों, असें घडून आलें कीं, रामानंदस्वामी आपल्या सर्व शिष्यांसहवर्तमान दक्षिणेकडील यात्रा करण्यास निघाले. ते आळंदी येथें मुक्कामास उतरले. त्याबरोबर संन्यास घेतलेला विठ्ठलपंतही होता. त्यास, पिंपळाची सेवा करीत असतांना रखुमाबाईनें सहजीं पाहिलें. नंतर त्यास पुरतें ओळखल्यावर ती रामानंदस्वामींच्या दर्शनास जाऊन, त्यास नमस्कार करून ह्मणाली. 'महाराज मी ( विठ्ठलपंताकडे बोट करून ) यांची प्रत्यक्ष स्त्री असतां आपण यास संन्यास दिलात हें कसें?' असें ऐकतांच स्वामींनीं विठ्ठलपंताकडे पाहिलें. त्याबरोबर तो मान खालीं घालून मुकाट्यानें राहिला. असें पहातांच स्वामींस समजलें कीं ही बायको याचीच खरी होय. नंतर स्वामींनीं विठ्ठलपंतास आज्ञा केली कीं, 'तुला बायको असून तूं ती नाहीं ह्मणून आह्मांस सांगितलेंस. बरें असो, तिला तुजपासून संततीही झाली नाहीं, तर आतां आमच्या आज्ञेनें तुला येथें रहाणें प्राप्त आहे. तोंपर्यंत आह्मी दक्षिणयात्रेहून जाऊन येतों, व जातांना पुनः तुला बरोबर घेऊन जाऊं.' याप्रमाणें सांगून स्वामी गेले असतां विठ्ठलपंतापासून रखुमाबाईस दोनदोन वर्षांच्या अंतरानें एकामागून एक अशीं चार मुलें झालीं. त्यांत निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान, हे तिघे मुलगे होते. व मुक्ताबाई हा

एक मुलगी होती, मुक्ताबाई झाली इतक्यांत रामानंद-स्वामी यात्रा करून परत आले. व ते विठ्ठलपंतास समागमें घेऊन परत काशीस गेले. पुढें मुलगे मोठाले झाले, असें पाहून रखुमाबाईनें आळंदींतील ब्रह्मवृंदांची प्रार्थना केली कीं, या मुलांच्या मुंजी आपण कराव्या. तेव्हां ब्राह्मणांनीं सांगितलें 'हीं मुलें संन्याशापासून झालेलीं असल्यामुळें यांच्या मुंजी आह्मांस आमच्या मनानें करितां येत नाहींत. यास्तव तूं पैठणास जा आणि तेथील ब्राह्मणांचें यांच्या मुंजी करण्याविषयीं आह्मांस पत्र आण. ह्मणजे आह्मी मुंजी करूं,' त्यावरून रखुमाबाई मुलांस घेऊन पैठणास गेली. व सर्व ब्रह्मवृंदांस तिनें मोठ्या नम्रतेनें मुलांच्या मुंजींविषयीं प्रार्थना केली. परंतु ब्राह्मणांनीं सांगितलें, 'बाई त्यांच्या मुंजीस कांहीं शास्त्राधार नाहीं. यामुळें आमचा निरुपाय आहे. याप्रमाणें सभ्यसभ्य, ब्राह्मणांनीं उत्तर सांगून ते सर्व आपआपल्या घरीं गेले असतां, जे हलकट स्वभावाचे ब्राह्मण तेथें अवशिष्ट राहिले होते, त्यांनीं मुलांचीं नांवें रखुमाबाईस पुसून घेतलीं. व त्यावर अनेकप्रकारच्या टीका केल्या. शेवटीं एक पखालवाला आपली पखाल हल्याच्या पाठीवर घालून नदीवर चालला होता, त्यास त्यांनीं अलीकडे बोलावून घेऊन मुलांस पुसलें, 'गडेहो, या रेड्याकडून जर तुह्मी वेद बोलवाल तर तुमच्या मुंजी आह्मी करूं.' त्यावरून ज्ञानेश्वर पुढें झाले. त्यांनीं रेड्याच्यामुखें वेद बोलविला. ही गोष्ट पुष्कळांच्या प्रचितीस आल्यावरून यांच्या मुंजी करण्यास ब्राह्मण त-

यार झाले. परंतु निवृत्तीनें सांगितलें कीं, आतां आह्मांस कर्मबंधन नको. आपण मुंजी करितों ह्मणालां येवढ्यानेंच आह्मी कृतार्थ झालों. असें ह्मणून पखालवाल्यास रेड्याची किंमत देऊन तो त्यापासून त्यांनीं विकत घेतला. व आळंदीस येण्यास निघाले. वाटेंत अळें नामक गांवीं रेडा मरण पावल्यावरून त्यांनीं तेथें त्यास समाधी दिली. व निवृत्ति हा सर्व भावंडें व आई यां सर्वांसहवर्तमान आळंदीस आला. पुढें निवृत्तीनें नाथसांप्रदायी कोणी गैनीनाथ नांवाचे सिद्ध पुरुष होते. त्यांस निमित्तमात्र, गुरु करून अध्यात्मविद्या संपादिली. व ती सर्व भावंडांस उपदेशिली. ह्मणून ज्ञानेश्वर इत्यादिकांचा हाच वडील भाऊ असून गुरुही होता. ज्ञानेश्वरानें तर अनुभवामृताच्या प्रकरणांत असें ह्मटलें आहे:—

ओंवी ॥ परीगा श्रीनिवृत्तिराया ॥ हातातळीं सुखविलें तुया ॥ ते निवांतचि मिया ॥ का न भोगावें ॥ १ ॥

यानें केलेल्या अभंगांतलि एक दोन येथें दाखवितों अभंग.—‘नेणों पै द्वैत, अवघेंची अद्वैत ॥ एकरूप मात करूं आह्मी ॥ १ ॥ अवघाची श्रीहरी, नांदे घरोघरीं ॥ दिसे चराचरीं, ऐसें केलें ॥धृ०॥ सेवावे चरण, गुरुमूर्ति ध्यान ॥ गैनी संपन्न ब्रह्मरसें ॥ २ ॥ निवृत्तीचोखडा, ब्रह्मरस उघडा ॥ गुरुकृपें निवाडा निवडिला ॥ ३ ॥ जेथें पाहे तेथें व्यापिलें अनंतें ॥ तयाविण रितें कोण स्थळ ॥ ४ ॥ गगनेंवीण ठावो, नाहीं जैसा रिता ॥ तैसा या अच्युता, वीण कांहीं ॥ ५ ॥ तेथें माझ्या चित्ता, करी राहिवासु ॥ न करी उदासु, ऐसीयातें ॥ ६ ॥ नि-

वृत्तीनें मन ठेविला चरणीं ॥ नामाची निशाणी अखंडित ' ॥ ७ ॥ या अभंगांतील व ज्ञानदेवाच्या हरिपाठाच्या अभंगांतील भाषेवरून ज्ञानेश्वरी भाषा कशी असली पाहिजे होती, हें उघड आहे. अस्तु. निवृत्ति हा आपल्या वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी, शके बाराशें वीस १२२०, विलंबी नाम संवत्सरीं, त्र्यंबकेश्वर येथें पौषवद्य ११ चे दिवशीं समाधिस्थ झाला. यानेंही पुष्कळ अभंग पांडुरंगास अनुलक्षून केले आहेत. ते प्रसिद्धच आहेत.

## कबीर.

हा एक मोठा साधु पुरुष होऊन गेला. याचें जन्म झाल्यावर हा ज्या मुसलमानजातीच्या स्त्रीपुरुषांस सांपडला त्यांवरून यास त्याच जातीचा ह्मणून ग्रंथकारांनीं वर्णिलें आहे. याचें जन्म तीनचार प्रकारांनीं लिहिलेलें आढळतें. कोणी ह्मणतात 'नीमा' नांवाचा एक मोमीन होता. तो एकवेळीं विणायाच्या कापडाचें सूत धुण्यास भागीरथीवर गेला असतां तींतून नुकेंच वहात आलेलें मूल त्याच्या दृष्टीस पडलें. व तें त्यानें घरीं आणून 'नुरी' नांवाच्या आपल्या स्त्रीपाशीं दिलें, तोच हा होय. कोणी ह्मणतात याचें जन्म शिंपल्यांतून झालें. कोणी ह्मणतात खानदेशांत काशी ह्मणून एका गांवांतील लहर तलावांत हा मोमिनास सांपडला. कोणी ह्मणतात रामानंदस्वामीच्या मुखावाटें एका विधवेस 'पुत्रवती भव' असा चुकून आशीर्वाद निघाला. त्यावरून ती गर्भिणी झाली असतां लोकलज्जेनें अरण्यांत राहिली. व

तेथें प्रसूत होऊन झालेलें मूल तसेंच सोडून देऊन निघोन गेली. तोच हा मोमिनास सांपडला. सारांश, या सर्व गोष्टींत खरी कोणती हा निर्णय जरी आज होऊं शकत नाहीं तरी याचें जन्म अन्यत्र झालें असून हा मोमिनास सांपडला एवढी गोष्ट निःसंशय खरी आहे.

हा शुकाचा अवतार होता. याचें जन्म कधीं झालें, इत्यादिकाविषयीं कबीरपंथी लोक असें ह्मणतात.— "संवत् बारहसें पांचमो ज्ञानी कियो बिचार ॥ काशीमाही प्रगट भयौ शब्दकहोटक सार ॥ १ ॥ संवत् पंधरहसे पांचमो मगर कियो गवन ॥ अगहनसुदी एकादशी मिले पवनसोपवन" ॥ २ ॥ ह्मणजे या दोहोऱ्यांतील अर्थ असा कीं,— संवत् बाराशें पांचांमध्यें किंवा शके १०७० त, याचें जन्म काशींत झालें, व पंधराशें पांचामध्यें, अथवा शके १३७० त, आश्विनशुद्ध एकादशीस, मगर ह्मणून गांव आहे तेथें याचें निर्याण झालें. यावरून हा तीनशें वर्षें वांचला होता असें उघड दिसून येतें.

कबीरास कमाल या नांवाचा एक मुलगा होता. हाही मोठा भगवद्भक्त असे. याचें चरित्र भक्तविजयाच्या ६ अध्यायांत पुष्कळ सविस्तर आहे. ज्यांस पाहिजे असेल त्यांनीं तें पहावें.

कबीरानें साधुसंतांस भोजन वगैरे देण्यासाठीं एकदां आपली बायको एका वाण्याच्या घरीं गहाण ठेविली. व शिधा आणून सर्वांस यथेच्छ भोजन दिलें. तशीच एकदां राजाची कोठी फोडून तींतून साधुसंतांच्या भो-

जनास शिधा लागत होता तितका चोरला. इत्यादि अनेक गोष्टी भक्तविजयाच्या पांचव्या व सहाव्या अध्यायांत वर्णिल्या आहेत. त्या त्यांत पहाव्या. यानें आपल्या भक्तिभावानें श्रीपांडुरंग इतका वश करून ठेविला होता कीं, याजबरोबर श्रीपांडुरंग विणूं लागत असे. कबीराचा मठ क्षेत्र पंढरपुर येथें आहे. हा दर एक महिन्यास नियमानें येथें येत असे व पुढें नेहमीं येथेंच रहात असे. कबीरानें 'शुकनिधान' नांवाचा एक ग्रंथ व पांडुरंगास अनुलक्षून कांहीं ग्रंथ लिहिले आहेत. शिवाय दोहरे, व पदें हीं असंख्य आहेत. ही याची सर्व कविता हिंदुस्थानी भाषेंत असून 'कहे कबीर,' 'कहत कबीर' अथवा 'दास कबीर' याप्रमाणें तिच्या शेवटास नांव घालण्याची याची चाल आहे.

कबीराविषयीं कविचरित्रांतील मजकूरः—कबीरानें देह ठेवला त्यावेळेस हिंदू, व मुसलमान हे दोघेही 'कबीर हा आमचा,' असें ह्मणून वाद करूं लागले. तेव्हां याच्या अर्ध्या देहाच्या तुळशी व अर्ध्या देहाचा सबजा झाला. त्यावरून मुसलमानांनीं सबजा घेऊन तो गोरखपुराजवळ मगर ह्मणून गांव आहे, तेथें नेऊन पुरला, व त्यावर मशीद बांधली. आणि तुळशी काशी येथील वीरसिंहराजानें काशीस आणवून त्यांचें दहन केलें, व त्या ठिकाणीं एक मोठें वृंदावन बांधिलें.

येथून क्षेत्रपंढरपुर येथें नेहमीं येणारे मोठमोठे जे पांडुरंगाचे भक्त होऊन गेले, त्यांपैकीं कांहींचें संकलित वृत्त.

## दामाजीपंत.

श्रीक्षेत्रपंढरपुरापासून सहा कोसांवर मंगळवेढें ह्मणून गांव आहे, तेथील हा ठाणेदार होता. ही याची नेमणूक बेदरच्या बादशाहाकडून होती. हा दामाजीपंत श्रीपांडुरंगाची भक्ती करीत असे. त्यानें प्रति एकादशीची वारी धरिली होती. प्रत्यहीं पहांटेस उठून एकाग्रमनानें श्रीविठ्ठलाचें भजन करून, नंतर हा आपला व्यवसाय करी. याची हाकालपर्यंत ईश्वराचे ठिकाणीं निष्ठा कशी होती ती लोकांस कळली नव्हती. मात्र हा भला दयाळु, देवभक्त व मोठा प्रामाणिक आहे, इतकेंच लोक यास समजत. एकदां पंढरपुर परगण्यांत अनावृष्टीमुळें दुष्काळ पडला व धान्य अतिशय महाग झालें. यामुळें लोकांचे फार हाल होऊं लागल्यानें ते अन्नासाठीं चहूंकडे भटकत फिरूं लागले. एकेवेळीं दामाजीपंत नित्यविधि उरकून वैश्वदेव करीत आहे, तों एक ब्राह्मण येऊन, 'मला भोजनास द्या' असें ह्मणूं लागला. तेव्हां त्यानें 'यावें' असें ह्मणून त्यास भोजनास घेतलें. पुढें सर्व पदार्थ वाढून झाल्यावर दामाजीपंत ब्राह्मणासह भोजनास बसला. अर्धेंसें भोजन होत आहे तों, दामाजीपंत ब्राह्मणास ह्मणाला. 'भटजी, सावकाश होऊंद्या बरें, काय लागेल तें मागून घ्या.' इतके शब्द ऐकतांच त्यास जें रडें आलें तें कांहीं केल्यानें त्याला आंवरेना. असें पाहून दामाजीपंतानें विचारलें, 'महाराज, हें आपण काय करितां ?' आपणावर कांहीं संकट गुजरलें आहे कीं काय ! ब्राह्मणाचा गळा दा-

टून आल्यामुळें त्याच्यानें उत्तर देववेना; तरी इतकेंच ह्मणाला, 'महाराज, काय सांगूं, घरीं बायको व दोन तीन मुलें आज तीनचार दिवसांचीं उपवासी आहेत. मीही तसाच उपवासी होतों, परंतु आपण कृपा करून भोजनास घेतलें ह्मणून अन्नास मिळालों.' त्यावरून दामाजीपंतानें सांगितलें, 'इतकेंचना, कांहीं चिंता करूं नका, आपलें भोजन स्वस्थ होऊंद्या; भोजन होतांच आपल्या बायकांमुलांकरितां धान्य देईन.' त्यावरून ब्राह्मणास धीर येऊन तो मग स्वस्थपणें जेवला. भोजन झाल्यावर दामाजीपंतानें बोलल्याप्रमाणें ब्राह्मणास सुमारें एकवर्षाच्या बेगमीचें धान्य देऊन रवाना केलें. ब्राह्मण पंढरपुरचा होता. ह्मणून तो घरीं पोहोंचतो तों सर्व गावांत ती गोष्ट फुटली. व तीवरून प्रायः सर्व पंढरपुर धान्य मागण्याकरितां मंगळवेढयास दामाजीपंताकडे लोटलें. हें वर्तमान त्यास कळतांच आतां काय करावें. त्याची यास मोठी चिंता पडली. नंतर रात्रीं त्याच्या बायकोचा व त्याचा विचार होऊन प्राण गेला तरी पतकरला, परंतु ब्राह्मणांस धान्य द्यावयाचें; असा निश्चय ठरला. दुसऱ्या दिवशीं त्यानें रात्रीं निश्चय ठरल्याप्रमाणें सरकारी कोठारांतील धान्य ब्राह्मणांस वांटून त्यांस मार्गस्थ केलें.

इकडे मुजूमदारानें ताबडतोब ही खबर बादशाहास कळविली. त्यावरून बेदराहून यास धरणें आलें. यास नेण्यास आलेले शिपाई 'चलो, चलो,' अशा तऱ्हेनें बोलूं लागले. तेव्हां पंतांनीं त्यामध्यें सरळ मनाचा

व दयाळु स्वभावाचा असा मुख्य जमादार होता, त्याजपाशीं उत्तर केलें, 'जमादारसाहेब, सरकारच्या हुकुमाप्रमाणें येणेंविषयीं कांहीं तकरार नाहीं, परंतु तुह्मास माझें मागणें इतकेंच आहे कीं, एकवार पंढरीस जाऊन देवदर्शन करून मग निघावें, असें माझ्या मनांत आहे.' हें ऐकून जमादार स्वतः भला मनुष्य होता ह्मणून त्यानें विचार केला कीं, हा गृहस्थ सरकारच्या पदरीं पुष्कळ दिवस आहे, व सज्जनही आहे, आणि यांत आपल्या हितकर्तव्यामध्यें कांहीं बिघडत नाहीं. त्या अर्थीं यास नाहीं ह्मणणें बरोबर नाहीं असें जाणून 'बरें आहे, जाऊन यावें,' असें बोलला.

नंतर दामाजीपंत शिपाईलोकांच्या पाहऱ्यासहवर्तमान पंढरपुरास आला, व देवाचें दर्शन करून देवाचा व क्षेत्रांतील ब्राह्मणांचा निरोप घेऊन ह्मणाला, आतां लोभ असूं द्यावा; पुनः दर्शन घडतें न घडतें; कारण अशा अशा कारणानें हुजूरचें बोलावणें आलें आहे. त्यावरून ब्राह्मणांस अतिशय वाईट वाटून त्यांनीं पांडुरंगाची प्रार्थना केली, व सर्वांनीं 'आपण खुशाल जावें, देव आपली उपेक्षा करणार नाहीं,' असा आशीर्वाद दिला. पुढें शिपायांसहवर्तमान मंगळवेढ्यास येऊन दामाजीपंत, जमादार व नागव्या तलवारीच्या शिपाईलोकांच्या पहाऱ्याबरोबर निघाला.

असें दामाजीपंतास संकट आलेलें निवारण करण्याकरितां, परम दयाळु, जगदाधार, भक्तजनांचें संकट निवारण कर्ता, असा जो श्रीविठ्ठल यानें महाराचा वेष

धारण केला. त्यावेळचें रूप काय वर्णन करावें! महाराप्रमाणें गळ्यामध्यें काळा दोरा, डोक्यास फाटकी चिंधी, खांद्यावर फाटकें घोंगडें, हातांत काठी, व लंगोटी घालून निघाला, आणि बेदरच्या कचेरीस येऊन "जोहार" असे शब्द बोलून उभा राहिला.

नंतर अद्भुत अशा त्या महारास पाहून बादशाहासहित सर्व लोक विस्मित होऊन विचारितात, 'तूं कोण व कोणाचा, तुझें नांव काय, कोठून व कशाकरितां आलास?' याप्रमाणें त्यांचें बोलणें ऐकून "जोहार" करून प्रभु सांगतात, 'मी महार दामाजीपंताचा चाकर; माझें नांव विठ्या, मंगळवेढ्याहून पंतांनीं विकलेल्या सर्व धान्याचा पैसा बरोबर देऊन मला पाठविलें आहे.' असें ह्मणून काखेंतून एक कातड्याची मोहरबंद होनांनीं भरलेली पिशवी आणि डोक्याच्या चिंधींतून एक लखोटा काढून पुढें ठेविला. तें पाहून सर्व कचेरींतील लोक विचारूं लागले, एवढी रकम पंतांनीं तुजपाशीं कशी दिली.' त्यावेळेस प्रभु* ह्मणतात, 'मी लै इस्वासुक मानुस हाये,' असें महार जातीप्रमाणें मराठी बो-

---

* हा दामाजीपंतांचा मनोवेधक वृत्तांत, त्यांची सत्त्वस्थ वृत्ति, मुजूमदाराचा कविबाजपणा, श्रीसकलजगत्सूत्रचालक, भक्तवत्सल, कृपानिधि, श्रीविठ्ठल यांचा पतांच्या दुःखमोचनार्थ स्वीकारलेला अंत्यजवेष, इ० नाटकरूपानें आमचे स्नेही रा०रा० सीतारामपंत गुर्जर यांनीं. नाटक जुळण्यासाठीं कांहीं गोष्टींत फेरफार करून. चांगला वर्णिला आहे. तो वाचकांनीं पहावा अशी आम्ही शिफारस करतों. किं० ॥.

ला. मदनापेक्षांही सुंदर असें त्याचें रूप पाहून सर्व लोक मोठे विस्मित होऊन त्याजकडे पाहूं लागले. व परस्पर असें तेव्हां ह्मणूं लागले कीं, असा महार आह्मीं आजपर्यंत कधींच पाहिला नव्हता. नंतर थोड्याच वेळानें पैसा पावल्याची पावती महाराच्या स्वाधीन केली. आणि पत्र देऊन जमादाराकडे दामाजीपंतास सोडण्याविषयीं शिपाई पाठविला. पावती मिळाल्यानंतर श्रीविठ्ठल, कचेरींतील लोक व बादशाहा यास जोहार करून, आमचा यजमान जो दामाजीपंत याजवर सर्वांची दया असावी, असें बोलून निघाले, आणि ती पावती गुप्तरीतीनें पंतांच्या पोथीमध्यें आणून ठेविली.

इकडे मार्गामध्यें स्नानसंध्येच्या वेळीं त्यानें गीतेच्या पोथींत रुपयास एक पायली धान्य या भावानें सातशें खंडीचा पैका पावल्याबद्दल व तो विठ्या महारानें आणून दिल्याबद्दल बादशाहाकडील पावती पाहिली. तीवरून आश्चर्य पावून हें झालें कसें ! ह्मणून विचार करीत असतां, बादशाहाचें मनायीपत्र जमादारास येऊन पोंहचलें कीं, दामाजीपंतास मंगळवेढ्यास परत जाऊं द्यावें. त्यावरून जमादार त्यास ह्मणाला, 'महाराज, हुजूरचा याप्रमाणें हुकूम आला आहे, तर आतां आपण परत जावें.' त्यावरून दामाजीपंत मंगळवेढ्यास परत आला; व जमादार बेदरास गेला. आणि दामाजीपंतानें मनामध्यें ही पांडुरंगाची अगाध लीला आहे, तर आतां याच्या सेवेवांचून दुसरें कांहींच करावयाचें नाहीं. असा निश्चय केला. तों दुसरे दिवशीं बेदराहून एक

मोठा सरदार आला. आणि बोलूं लागला, 'अहो पंतसाहेब, आमच्या बादशाहानें आपल्यास विठ्या महारास आणण्याविषयीं सांगितलें आहे.' तेव्हां पंताचा कंठ दाटून आला, आणि कांहींच बोलिले नाहींत. नंतर दुसरे दिवशीं चाकरीचा राजीनामा द्यावा व बादशाहासही भेटून यावें म्हणून सरदाराबरोबर बेदरास गेले. आणि विठ्या महाराविषयींची सर्व खरी हकीकत सांगितली. नंतर बादशाहाची चित्तवृत्ति फिरून तो सर्व राज्य सोडून दामाजीपंताबरोबर पंढरपुरास येऊन उपोषण करीत बसला. त्यावेळेस श्रीपांडुरंगानें प्रत्यक्ष त्यासही दर्शन दिलें. आणि दामाजीपंत सर्व सोडून पंढरीसच आमरणपर्यंत येऊन राहिला. असा भक्तजनांचा संकट निवारणकर्ता श्रीपांडुरंग भक्तांचें दुःख निवारण करण्याकरितां श्रीक्षेत्रपंढरपुर येथें राहिला आहे.

## गोराकुंभार.

बालेघांटांवर तेरढोक ह्मणून गांव आहे, तेथील हा राहणारा आहे. हा केवळ तेथील उपरी राहणारा नसून, वतनदार होता. कविचरित्रांत याचा गांव सांवतवाडी लिहिला आहे, परंतु ती ग्रंथकाराची नजरचूक झालेली असेल. ज्ञानेश्वराच्या वेळेस हा होता यावरून शके १२०० मध्यें याच्या असण्याचा संशय करणें नको.

हा पांडुरंगाचा मोठा भक्त होता. या कारणानें पंढरपुरच्या नेहमीं वाऱ्या करीत असे. आणि पांडुरंगाचें प्रतिदिवशीं मोठ्या प्रेमानें भजन करीत असे. याप्रमाणें

एकदां डोळे झांकून भजन करीत, मडक्यांचा चिखल तुडवीत असतां, याची बायको चिखलाच्या जवळच मूल ठेवून पाण्यास गेली. त्यांत तें मूल रांगतरांगत जाऊन याच्या पायांखालीं तुडवलें गेलें व मरण पावलें. यास भान नसून बायको पाण्याहून आल्यावर तिला तें दिसलें, त्यावरून तिनें अतिशय शोक मांडला. तो ऐकून हा सावधान झाला. यानें तिचें बहुत प्रकारें समाधान केलें. परंतु तिचा शोक उणा होईना, शेवटीं हा तिला मारायास धांवला असतां ती ह्मणाली, 'माझ्या अंगास हात लावाल तर खबरदार, तुह्मांस पांडुरंगाची शपथ आहे.' तेवढ्यावरून यानें तिला हात लावणें सोडलें. तें अगदींच सोडलें! पुढें याच्या बायकोस विचार पडला कीं, 'आतां काय करावें. एक पोर होतें तें जाऊन शिवाय हा अंगास हातही लावीत नाहीं.' त्यामुळें पुढें संतती होण्याचाही उपाय खुंटला ह्मणून तिनें ही गोष्ट आपल्या आईबापांस सांगितली व आपली धाकटी बहीण लग्न करून यास देवविली. लग्न झाल्यावर सासरा सहज इतकेंच ह्मणाला, 'जांवईबोवा, पहिलीप्रमाणेंच हिला वागवा बरें' या बोलण्यावरून त्यानें दुसरीला तशीच वागविण्याचा निश्चय करून तिलाही हात लावणें वर्ज्य केलें! दोघींलाही हा हात लावीत नाहीं असें झाल्यावर एकदां त्यांनीं एकमत करून रात्रीं हा निजला असतां दोघी दोहोंबाजूंस निजल्या, व याचे दोनी हात आपआपल्या अंगांवर ठेऊन घेतले. ते यानें जागा झाल्यावर पाहून त्यांकडून पांडुरंगाची शपथ मो-

डली गेली, ह्मणून दुसरेच दिवशीं ते तोडून टाकिले. याप्रमाणें त्यानें केलेलें पाहून याच्या उभयस्त्रियांस पराकाष्ठेचें दुःख झालें, पण करितात काय, तळमळत तशाच निरुपाय होऊन उगाच बसल्या.

पुढें हा पंढरीस कार्तिकमासीं गेला व नामदेवाचे कीर्तन चाललें असतां. तें श्रवण करण्यास जाऊन बसला. त्यावेळीं नामदेवानें सर्वांस सांगितलें कीं, सर्वांनीं टाळी वाजवून हातांच्या पताका कराव्या, तेव्हां यास आपल्या थोट्या हातांचें भान न राहून पताका करण्याकरितां यानें हात वर केले, व त्याच वेळेस त्याच्या हाताचे पंजे पूर्ववत् झाले!!!

याप्रमाणें याचें मेलेलें मूल असेंच एका प्रसंगीं श्रीविठ्ठलानें जिवंत केलें. यानें केलेल्या बायकांविषयींच्या शपथेची मोकळीक पांडुरंगानें स्वतःच केली. यानें केलेले अभंग पुष्कळ प्रसिद्ध आहेत. नंतर हा पंढरपुरांतच येऊन राहिला होता. आणि सर्व आपला काल श्रीपांडुरंगसेवेंत घालवून शेवटीं तद्रूपच जाहला.

## नरहरि सोनार.

भक्तविजयाच्या विसाव्या अध्यायांत, याचें चरित्र असें आहे कीं, हा जातीचा लिंगाईत सोनार होता. अगदीं एकनिष्ठ शिवभक्त होता. कारागिरीच्या कामांत हा चांगला प्रवीण असल्यामुळें पंढरी येथें राहत असे; परंतु विठोबाचें दर्शन घ्यावयाचें नाहीं; व देवळाचा कळस सुद्धां पहावयाचा नाहीं; असा याचा अतिशय आग्रह होता. एकदां असें झालें कीं, कोणी

श्रीमान् गृहस्थ पंढरीस आला. त्याच्या मनांत देवास सोन्याचा कडदोरा करावयाचा होता. तें काम कोणता सोनार चांगलें करील ह्मणून त्यानें येथें चौकशी केली. तेव्हां लोकांनीं याचें नांव सांगून याचें व्रतही कसें आहे तें सांगितलें. तें ऐकून गृहस्थ गरजू असल्यामुळें याजकडेस आला, व यास त्यानें आपला मनोदय कळविला. त्यावरून यानें 'कंबरेचें मोज आणून द्या ह्मणजे कडदोरा करून देतों,' ह्मणून सांगितलें. पुढें मोज आणून दिलें. व यानें त्या मोजाबरोबर कडदोरा तयार केला. तो देवास लावून पहातां बोटभर उणा येऊं लागला. यानें बोटभर पुनः वाढवून देतांच बोटभर पुनः लांब होऊं लागला. शेवटीं 'मीं केलेलें काम कधींही अधिक किंवा उणें भरायाचें नाहीं, असें असतां, असें कसें झालें,' त्याचें आश्चर्य होऊन, हा डोळे बांधून देवळांत गेला. व मूर्ति चांचपूं लागला तेव्हां याच्या हातास शिवलिंग लागलें. त्यावरून यानें डोळे सोडले, आणि पाहतो तों समोर पांडुरंगमूर्ति आहे. सारांश यानें कडदोरा कंबरेस घालतांच बरोबर बसला; आणि तेव्हांपासून याच्या मनांत असणारी, शिव व पांडुरंग यांविषयींची भेदबुद्धी नाहींशी झाली. नंतर मोठ्या प्रेमानें पांडुरंगाचीच भक्ति करूं लागला. यानें पुष्कळ अभंगही केले आहेत. एवंच ही विठ्ठलमूर्ति शैव व वैष्णव या उभयतांच्याही भावाप्रमाणें होऊन त्यांस दर्शन देणारी आहे.

## भानुदास.

हा मोठा पांडुरंगभक्त होऊन गेला. हा पैठणनगर-हात असे. त्याच्या वयाच्या दहाव्या वर्षाच्या सुमारास याचा बाप यास अध्ययनसंबंधानें एकदां फार रागें भरला. त्यावरून हा एका देवालयांत जाऊन लपला. तो सात दिवसपर्यंत बाहेरच आला नाहीं. बापानें याचा शोध गांवांत पुष्कळ केला, परंतु ठिकाण लागला नाहीं. इकडे त्या देवालयांत असा कांहीं चमत्कार जहाला कीं, एका ब्राह्मणानें यास पिण्यासाठीं दूध नेऊन तेथें दिलें. तें यानें पिऊन त्यास पुसलें 'आपण कोण व येथें कसे आलां ?' दुसरें. मी येथेंच लपलों हें आपणांस कसें कळलें ? ब्राह्मण ह्मणाला 'मी विश्वचक्षु सूर्य आहें.' तुझ्या बापानें माझें आराधन बहुतकालपर्यंत केल्यावरून माझे प्रसादानें तूं त्यास जहालास यास्तव तुझें नांव 'भानुदास हें आहे, असें समज.' नंतर भानुदास ब्राह्मणास नमस्कार करून ह्मणाले, 'मला विद्या यावी, अशी मजवर कृपा व्हावी ह्मणजे मी बापास भेटेन.' ब्राह्मण ह्मणाला, 'तुला विद्या येईल काळजी करूं नको. तूं येथें आणखी पांच दिवसपर्यंत रहा. नंतर बापास भेट.' याप्रमाणें सूर्यानें सांगून सूर्य गुप्त जहाला. भानुदास तेथेंच ब्राह्मणानें आणून दिलेलें दूध प्राशन करून, सात दिवसपर्यंत राहून, आठवे दिवशीं बाहेर येऊन, जहालेलें सर्व वर्तमान बापास सांगितलें. नंतर त्यांवरून बाप, याला आलिंगन देऊन, आतां यास अध्ययनाचे संबंधानें बोलण्याची जरूर नाहीं.

याच्या प्रारब्धाप्रमाणें सर्व होईल, असें समजून प्रपंच करूं लागला.

पुढें भानुदासाचें लग्न जहालें, व त्यास एक मुलगा जहाला. त्याचें नांव 'चक्रपाणि' असें ठेविलें. पुढें थोड्या दिवसांनीं आईबाप मरण पावले. त्यामुळें प्रपंच चालविण्याविषयीं लोकांच्या आग्रहामुळें हा चाटीपणाचा ह्मणजे कापड विकण्याचा धंदा करूं लागला. त्या धंद्यामध्यें याचा खरेपणा असल्यामुळें यास पुष्कळ पैसा मिळूं लागला. ही गोष्ट याच्या साथी लोकांस सहन होईनाशी झाली. हा एकदां कीर्तन ऐकण्यास गेला असतां त्या सर्वांनीं याचें घोडें दूर नेऊन सोडिलें. व कापडाचें दिंड एका खांचेंत फेंकून देऊन पुनः सर्व निद्रिस्त जहाले. या गोष्टीस सुमारें चार घटका लोटतात न लोटतात तों त्यास्थळीं चोर आले, व त्यांनीं त्या सर्वांस हाणमार करून त्यांचीं कापडांचीं दिंडें त्यांच्याच घोड्यांवर लादून नेलीं. नंतर ते आपआपल्यामध्यें असें बोलूं लागले कीं, 'भानुदासाचा छळ केल्यामुळें आह्मांस अशी स्थिति प्राप्त जहाली.' इकडे भानुदासाचें सोडलेलें घोडें दुसरीकडे जाईल ह्मणून साक्षात् पांडुरंगानें ब्राह्मणाचा वेष धरून, याचें घोडें हातांत धरून, येण्याच्या वाटेवर ते उभे राहिले होते. नंतर हा कीर्तन संपल्यावर बिऱ्हाडास येण्याकरितां निघाला, तेव्हां मार्गामध्यें आपलें घोडें व ब्राह्मण यास पाहतो तों, ब्राह्मण एकदम गुप्त जहाला. नंतर घोडें घेऊन बिऱ्हाडास आला. आणि तेथें आपल्या सोबत्यांची तशी स्थिति

पाहून त्यांस काय झालें ह्मणून विचारिलें. नंतर त्यांनीं जहालेली सर्व हकिकत भानुदासास सांगितली. नंतर भानुदासांनीं तें आपलें कापड आणून सर्वांस वांटून टाकलें. आणि सर्व धंदा सोडून रात्रंदिवस पांडुरंगाचे भजनामध्यें सर्वकाळ घालवूं लागला. तसेंच श्रीक्षेत्रपंढरपुरच्या वाऱ्या नेमानें करूं लागला. ही गोष्ट भक्तविजयाच्या ४२ व्या अध्यायांत, विस्तारपूर्वक आहे.

तसेंच पुढें किरीटी रामराजानें अनागोंदीस नेलेली श्रीपांडुरंगाची मूर्ति यानें परत आणिली. ही कथा, भक्तविजयाच्या ४३ व्या अध्यायांत, विस्तारपूर्वक आहे. त्यांतील सारांशः— पंढरपुरचा कोणी एक ब्राह्मण भिक्षुकी करण्याकरितां अनागोंदीस गेला होता. तेथें रामराजाची भेट घेतली. रामराजास जगदंबिकेची भक्ति असल्याकारणानें राजानें तिचें वर्णन व पंढरपुरचा कमीपणा वर्णन केला. त्यावेळेस ब्राह्मणास मोठा रोष येऊन ब्राह्मणानें असें सांगितलें कीं, "राजा, आमचें सर्व क्षेत्र सुवर्णाचें आहे आणि तेथील सर्व धोंडे चिंतामणि आहेत, सर्व झाडें कल्पवृक्ष आहेत, व तुझी ही उपास्य देवताही तेथील झाडणारी आहे." असें ब्राह्मणाचें वाक्य ऐकून राजास मोठा रोष आला, आणि ब्राह्मणास ह्मणाला कीं, 'भटजीबोवा, याप्रमाणें मला हें सर्व दाखवा, मी आपल्याबरोबर आज येतों, असें नसल्यास आपला विचार करा.' नंतर ब्राह्मणानें असें सांगितलें कीं, 'राजा, मी ह्मणतों याप्रमाणें सर्व तेथें आहेच.' नंतर ब्राह्मणाचे आग्रहामुळें राजा श्रीक्षेत्रास

येण्यास निघाला. तो पंढरपुराजवळ आला. त्या वेळेस ब्राह्मणानें श्रीपांडुरंगाचें अनन्यभावानें चिंतन केलें. असें ह्मणाला कीं,–'हे विठ्ठला, हें माझें ह्मणणें सर्व खरें करणें तुझेकडे आहे.' त्या वेळेस काय चमत्कार सांगावा! ब्राह्मणानें सांगितल्याप्रमाणें क्षेत्रपंढरपुर सुवर्णाचें झालें! हें राजानें पाहून राजास मोठें आश्चर्य वाटलें. पुढें पांडुरंगाचे देवालयांत जातो तों आपली कुलदेवता देऊळ झाडींत आहे, हें पाहून राजा फारच चकित झाला. पुढें श्रीपांडुरंगाजवळ जाऊन दर्शन घेतलें तों असें मनांत आलें कीं, 'हा देव आपल्या शहरांत असावा.' ही गोष्ट घडण्याकरितां क्षेत्रमजकुरीं मोठें तप केलें. ज्याच्या योगानें पांडुरंग प्रसन्न होऊन राजास ह्मणाले कीं, 'मी तुझ्या शहरास येतों परंतु तूं माझ्या भक्ताचा छळ केल्यास मी तेथें क्षणमात्रही रहाणार नाहीं.' राजानें सदरील गोष्ट कबूल करून श्रीक्षेत्रापासून अनागोंदीपर्यंत मनुष्यें उभीं करून, देवास तेथें नेलें. आणि मोठ्या देवालयामध्यें स्थापना केली.

इकडे क्षेत्रमजकूरीं आषाढीचे यात्रेकरितां लक्षावधि लोक आले. आणि पांडुरंग नाहीं हें पाहून फारच दुःखित झाले. नंतर सर्वांनीं असा विचार केला कीं, पांडुरंग आल्यावांचून येथून परत जावयाचें नाहीं. त्यावेळेस भानुदासांनीं 'मी पांडुरंगास आणितों' असें सांगून अनागोंदीस गेले. तों रात्रीच्यासमयीं अनागोंदीस आले. आणि श्रीविठ्ठलाच्या देवळाच्या बाहेर उभे राहून देवाचें अनन्यभावानें ध्यान करिते झाले.

इतक्यामध्यें असा कांहीं चमत्कार झाला कीं, सर्व पहारेकरी लोक निद्रिस्थ झाले आणि दरवाजांचीं कुलुपें गळून गेलीं. नंतर भानुदास श्रीपांडुरंगापाशीं जाऊन पुढें उभा राहिला. आणि ह्मणूं लागला, 'हे देवाधिदेवा, पंढरपुरीं आपली हजारों भक्तमंडळी वाट पहात आहे. आपण येथें राजोपचार पाहून येथेंच राहिलां कां?' इत्यादिक पुष्कळ रीतीनें श्रीपांडुरंगाची प्रार्थना केली. त्या वेळेस देवांनीं असें सांगितलें कीं, 'तूं कांहीं काळजी करूं नकोस मी उदईक तुजबरोबर येतों,' आणि आपल्या गळयांतील जडावाच्या पतकांचा मोत्यांचा हार भानुदासाच्या गळयांत घातला आणि बाहेर जाण्यास निरोप दिला.

नंतर भानुदास मोठ्या आनंदानें बाहेर येऊन पंपासरोवरावरती स्नान करून संध्या करीत बसले. इकडे प्रातःकालचे वेळेस राजानें देवाच्या गळयांमध्यें मोत्यांचा हार नाहीं, हें पाहून नगरांत पुष्कळ चवकशी केली. आणि बाहेरही शिपाई पाठविले. त्यावेळेस त्यांनीं पंपासरोवरीं भानुदासास पाहून, त्याच्या मुसक्या बांधून, राजासमोर आणून राजास सर्व वर्तमान सांगितलें. राजानें विचार न करितां आपला हार घेऊन भानुदासास सुळावर देण्यास सांगितलें. नंतर भानुदासास दूतांनीं सुळाजवळ आणून सुळावर चढवितात तों सुळास पानें फुटलीं. हें पाहून मोठ्या आश्चर्यानें राजास वर्तमान सांगितलें. नंतर राजा भयभीत होऊन भानुदासासमोर येऊन साष्टांग नमस्कार करिता जहाला. आणि भानुदा-

सास देवासमोर आणिलें. तेव्हां पांडुरंगानें असें सांगितलें कीं, 'राजा, तुला साधूचा छळ घडला, आतां मी येथें रहात नाहीं. आम्ही आपले क्षेत्रांत जातों' असें सांगून प्रभु फारच धाकटें रूप धरून भानुदासाच्या संवळीमध्यें सर्वांसमक्ष बसले. भानुदासास 'चल' असें ह्मणूं लागले. नंतर भानुदासानें ती संवळी आपल्या पडशींत. टाकून, गडशी खांद्यावर घेऊन, हातांत पताक घेऊन स्वारी पंढरपुरास आली. तों पद्मतीर्थाजवळ स्नानसंध्या करण्याकरितां पडशींतून संवळी काढतात तों पांडुरंग एकदम मोठे जहाले आणि भानुदासास सांगितलें कीं, 'आतां मोठ्या समारंभानें मला क्षेत्रांत ने.' नंतर सर्व साधुमंडळी मिळून श्रीपांडुरंगास मोठ्या आनंदानें व समारंभानें क्षेत्रांत आणून पूर्वींप्रमाणें देवळांत नेऊन बसविलें. ही गोष्ट शके १४३६ कार्तिकशुद्ध ११ स घडली. तेव्हांपासून कार्तिकीची यात्रा श्रीक्षेत्रास सुरू जहाली. असा भक्तवत्सल श्रीपांडुरंग आपल्या भक्तांस इच्छित सुख देण्याकरितां श्रीक्षेत्र येथें राहिला आहे.

## बोधलेबोवा.

बालेघांटावर धामणगांव ह्मणून गांव आहे, तेथील हे पाटील. यांचें नांव माणकोजी. यांचें उपनांव जगताप. हे मोठे भगवद्भक्त होते. यांच्या बायकोचें नांव ममताई यांस एक मुलगा होता. त्याचें नांव यमाजी, व सुनेचें नांव भागीरथी. हीं सर्वही मनुष्यें उत्तम होतीं. माणकोजीबोवा दरएक एकादशीस श्रीक्षेत्र पंढरपुरास वारीकरितां जात असत. यांनीं दुष्काळांत आपलें सर्व

द्रव्य ब्राह्मणांस वांटिलें; आणि पंढरपुरमुक्कामीं श्रीपांडुरंगांनीं ब्राह्मणाचा वेष धरून याचा शिधा घेऊन श्रीरुक्मिणीकडून स्वयंपाक करवून आपण जेवले, इत्यादिक अनेक गोष्टी भक्तविजयाच्या ९३ व्या व ९४ व्या अध्यायांत, आहेत. हल्लीं याचे वंशज धामणगांव येथें अद्याप आहेत. ते श्रीपांडुरंगाच्या दर्शनाकरितां वैशाखमासीं क्षेत्र मजकुरीं येतात. त्यावेळेस असा कांहीं चमत्कार होतो कीं श्रीचंद्रभागेस एकदम पाणी येतें. व त्या वेळेस चंद्रभागेची हे पूजा करितात. क्षेत्रमजकुरीं यांचा मोठा मान आहे. बोधलेबोवाचे वंशज येथें देवळांत कीर्तन करून श्रीदेवाचीं अंगावरचीं सर्व वस्त्रें आपण घेतात; नंतर दुसरे दिवशीं देवाची पूजा ब्राह्मणभोजन, व भंडारा, इत्यादिक पुष्कळ खर्च करितात. माणकोजीबावास होऊन सुमारें १५० वर्षें झालीं.

## कानुपात्रा.

मंगळवेढें येथें शामा नांवाची एक कळवंतीण रहात होती. तिची ही कन्या, ही रूपानें अप्रतिम सुंदर होती. व गाणारीही उत्कृष्ट असे. ही वयांत आल्यावर हिच्या आईनें हिला बेदरास नेऊन हिचा गुण बादशाहास दाखवावा, व द्रव्य मिळवावें असा बेत केला. परंतु तो बेत हिनें नाकारून पंढरपुरास जाऊन देवापुढें भजन करणें आरंभिलें. त्यावरून लोकांस आश्चर्य झालें. परंतु हिच्या रूपाची तारीफ बादशाहाच्या कानावर जाऊन तो हिजविषयीं लुब्ध झाल्यामुळें त्यानें हिला आणायाकरितां पंढरीस कामगार पाठविला. त्यानें ये-

ऊन हिला बादशाहाकडील निरोप कळविल्यावर हिनें 'मी देवदर्शन करून येतें व मग आपणावरोबर निघत्यें,' असें सांगितलें. त्यावरून कामगार बरें ह्मणाला. ही देवळांत गेली. व करुणा भाकून देवाची स्तुति करीत असतांच हिचें प्राणोत्क्रमण झालें. त्यावरून आलेला कामगार परत गेला. आणि हिचा देह देवाचे पुजारी यांनीं दक्षिण दरवाज्याचे जवळ पुरला. तेथें एकदम तरटीचें झाड उगवलें. तेथें कानुपात्रेची मूर्तिही आहे, तिचें सर्व दर्शन घेतात. भक्तविजयांत हिचें चरित्र एकुणचाळीसावे अध्यायांत आहे.

## चोखामेळा.

हा पंढरपुरचा वतनदार, जातीचा अतिशूद्र होता. हा (शके १२०० त) नामदेवाच्या किंचित् अगोदर होता, असें दिसतें. कारण जनाबाईनें एक अभंग याच्याविषयीं लिहिला आहे. तो येणेंप्रमाणें:— अभंग,

जातीहीन चोखामेळा ॥ त्याला भक्तीचा कळवळा ॥१॥
त्याचा झाला ह्मणियारा ॥ राहे घरीं, घरी थारा ॥२॥
देव जेवीतो तया घरा ॥ त्याचा भक्तीभाव खरा ॥ ३ ॥
देव बाटविला तेणें ॥ असें जनी गाय गाणें ॥ ४ ॥

गांवांत मेलेलीं गुरें ओढून गांवाबाहेर न्यावीं, हें त्याचें काम होतें.

याला देव गुरें ओढूं लागे; कारण हा विठोबाचा एकनिष्ठ भक्त होता. याचा प्रतिदिवसाचा असा नेम असे कीं, प्रातःकाळीं चंद्रभागेचें स्नान करून पांडुरंगास सव्य घालावें. नंतर महाद्वारांत येऊन लोटांगण

घालून देवासमोर उभें राहावें; व ध्यानांत श्रीपांडुरंगाची मूर्ति आणून तेथूनच नमस्कार करावा. हा नेहमीं श्रीविठ्ठलाचें नामोच्चारण करीत असे, व रात्रौ भजन करीत असे. एके दिवशीं महाद्वारांतून नेमाप्रमाणें पांडुरंगास नमस्कार करून निघाला, इतक्यामध्यें समीप उभा राहिलेल्या एका दुष्ट मनुष्यानें फारच याची निर्भर्त्सना केली, आणि सांगितलें कीं, 'तुझा अंत्यजांस पांडुरंगभक्तीचा मुळींच अधिकार नाहीं. आणि हें भलतेंच काम तूं करतोस तर तूं पुनः येथें येऊन असलीं ढोंगें केल्यास आपला विचार कर.' नंतर चोखामेळा उत्तर न देतां आपल्या घरास गेला, व मनामध्यें पांडुरंगाची मूर्ति आणून भजनादिक कामें करून रात्रीं निजला.

त्याचरात्रीं श्रीविठ्ठल चोखामेळ्यापाशीं येऊन बोलिले, 'भक्तवर्या, ये आज, मी तुला आपले देवळांत नेतों.' असें बोलून देव झटदिनीं त्याचा हात धरून त्यास देवळांत नेते झाले. हे चोख्यामेळ्या, नामदेवाबरोबर जेवतेवेळीं मला तुझें स्मरण होतें. असें विठ्ठल बोलत असतां चोखा पायांपडून बोलला, 'हे प्रभो, दीनावर आपली दया नेहमीं अशीच असावी. याप्रमाणें उभयतांचें बोलणें बाहेर आलेले पुजारी वगैरे यांनीं ऐकून बोलूं लागले, साक्षात्परब्रह्म वैकुंठवासी देवास आज अंत्यज जाऊन शिवला, हा आंत कसा गेला असेल, कारण द्वाराचीं कुलुपेंवगैरे तशींच आहेत. हा आंत कसा गेला असेल तो असो. आज ब्राह्मणाचा आचार बुडाला. असें बोलून कुलुपें उघडिलीं आणि त्यास

बाहेर काढिलें. आणि विचारतात, 'तूं आंत गेलास कसा, ही गोष्ट कशी घडली.' नंतर चोखामेळ्यानें सर्व खरें झालेलें वर्तमान सांगितलें, आणि मजवर दया करा असें बोलला;' त्यावेळेस पुजाऱ्यांनीं सांगितलें कीं, 'तूं असा मनुष्य आमच्या क्षेत्रांत नकोस, तूं भीमेच्या पलीकडे जाऊन रहावें. जर उदईक क्षेत्रांत दृष्टीस पडशील तर शिक्षेस पात्र होशील.' हें बोलणें ऐकून आजपासून आपल्यास पांडुरंगाचे पाय अंतरले बरें, असें चोखामेळा मनांत समजला. असो, आपलें प्रारब्ध, असें बोलून डोळ्यांतून अश्रु टाकून निघाला, नंतर बायकोस सर्व वर्तमान सांगितलें, व तिच्या सहवर्तमान नदीपलीकडे जाऊन देवासमोर एक खोंपट बांधून राहिला, आणि तेथेंच नेमाप्रमाणें भजनादिक करूं लागला.

कोणे एके दिवशीं दोनप्रहराच्या समयास लिंबाच्या छायेंत भोजन करीत आहे, इतक्यांमध्यें चोखामेळ्याजवळ श्रीपांडुरंग आले, आणि 'मला मोठी भूक लागली' असें बोलून त्याच्या सांगातें मोठ्या प्रेमानें बोलत बोलत भोजन करूं लागले. तेव्हां कोणी एक पुजारी कांहीं कामामुळें त्या वाटेनें चालला होता तो हें नवराबायकोचें पुढील संभाषण ऐकून भोजन पहात उभा राहिला. भोजनामध्यें चोखामेळ्याच्या बायकोनें खरकट्या वाटीनें दहीं वाढतेसमयीं उसकून पितांबरावर थोडेसें दहीं उडालें, हें पाहून चोखामेळा आपल्या बायकोवर रागाऊन बोलला, 'नीट वाढतां येत नाहीं काय ? पां-

डुरंगाचा पीतांबर दह्यानें भरला.' हें ऐकून पुजाऱ्यास मोठा राग आला आणि ह्मणूं लागला, काय हा महार लबाड आहे, आह्मांस पाहून कांहींतरी खोट्या गोष्टी बोलतो. जगन्निवास श्रीपांडुरंग या महाराबरोबर कसें भोजन करील. तो येथें येईल तरी कशास, हा कांहीं-तरी अचाट बोलत आहे. यांत शंका नाहीं, परंतु याची खोड मोडली पाहिजे, असें ह्मणून मोठ्या रागानें एक-दम पुजारी तेथें आला. आणि त्याच्या मुखावर चप-राख मारिली आणि तेथून निघून चंद्रभागेचें स्नान केलें. आणि देवळांत जाऊन पाहतो तों खरोखरच पांडुरंगाचा पीतांबर दह्यानें भरलेला आहे, आणि मुखाकडे पहातो तों देवाचा गाल सुजला आहे. हें पाहून पुजाऱ्यानें म-नामध्यें निश्चय केला कीं, चोखामेळा पांडुरंगाचा भक्त आहे. त्याच्या छळानें पांडुरंगास दुःख झालें. असा विचार करून पुजाऱ्यानें तेथून निघून चंद्रभागेच्या पलीकडे येऊन चोखामेळ्याची प्रार्थना केली, 'हे भक्त-वर्या, आह्मांस तुझ्या महिम्याचें ज्ञान नसल्याकारणानें तुझा आह्मीं छळ केला. याविषयीं आह्मांस मोठें दुःख वाटतें; आतांच पांडुरंगानें साक्षात्कार दाखविला. तुला चापट मारल्यानें देवाचा गाल सुजला आहे, या कार-णानें आह्मांस मोठें भय वाटतें. असें बोलून पुजाऱ्यानें त्याचा हात धरून तेथून त्यास देवापाशीं आणिलें, नंतर चोखामेळ्यानें देवास पाहिल्याबरोबर देवाचा सु-जलेला गाल नीट जाहला.

तेव्हांपासून याला पुनः श्रीक्षेत्रांत राहण्याविषयींची

परवानगी मिळाली. याच्याविषयींची अशा तऱ्हेची ही कथा आढळते कीं, देवास यानें वाटविलें अशा प्रकारची याच्यावर ब्राह्मणांनीं सरकारांत फिर्याद केली, तिची चौकसी होऊन सदरची गोष्ट खरी आहे अशी अधिकाऱ्यांची खात्री झाली त्यावरून त्यांनीं यास बैलाच्या पायास बांधून मारण्यास सांगितलें त्याही संकटापासून श्रीपांडुरंगानें संभाळिलें. अशा याच्याविषयींच्या गोष्टी भक्तविजय ग्रंथांत पुष्कळ आहेत. याच्या समाधीचा दगड श्रीक्षेत्रीं नामदेवाच्या पायरीसमोर आहे.

**भाग तिसरा समाप्त.**

---

# श्रीपांडुरंग प्रसन्न.

## भाग चवथा.

आतां येथपर्यंत श्रीपांडुरंगक्षेत्राच्या संबंधें जेवढें ह्मणून सांगावयाचें होतें तें सर्व यथामति निरूपण केलें आहे. आसमंताद्भागच्या तीर्थ, क्षेत्र, देवताचेंही विषयानुरोधानें वर्णन दिलें आहे. पांडुरंगपर महान् महान् भक्तराजांचीं चरित्रेंही किंचित् समाविष्ट केलीं आहेत. तेव्हां या भागांत श्रीपांडुरंगाचे एकनिष्ठ भक्त जे परमपवित्र वारकरी लोक ते आपल्या गळ्यांत भक्तिभावानें ज्या तुळसीच्या माला धारण करतात, ह्या बहुतकरून सर्वत्रांच्या अवलोकनांत आहेतच, तर त्याविषयीं, व निरंतर ‘पुंडलीकवरदा हरिविठ्ठल,’ ‘ज्ञानोबा तुकाराम’ इ० नामसंकीर्तन करतात त्याविषयीं, वारकरी

लोक पायां पडून परस्परांस आस्थापूर्वक जीं प्रेमालिंगनें देतात त्यांविषयीं, आणि त्यांची जी पांडुरंगाचे ठायीं अव्यभिचारिणी भक्ति आहे तिजविषयीं, प्रस्तुत दोन शब्द लिहून हा पूर्वार्ध समाप्त करतों.

प्रथमतः तुलसीमाला धारण करण्याविषयींचीं प्रमाणें. तुलसीकाष्ठसंभूते माले कृष्णजनप्रिये ॥ बिभर्मि त्वामहं कंठे कुरु मां कृष्णवल्लभं ॥ १ ॥ एवं संप्रार्थ्य विधिवन्मालां कृष्णगलेर्पितां ॥ धारयेद्यो नरो भक्त्या सगच्छेद्वैष्णवं पदं ॥ २ ॥ अर्थः— 'हे वैष्णवलोकप्रिये, हे तुलसीच्या माले, तुला आपल्या गळ्यांत धारण करितों. मजवर श्रीकृष्ण प्रेम करतील असें कर.' याप्रमाणें मालेची प्रार्थना करून, नंतर देवाच्या गळ्यांत घातलेली माळा जो मनुष्य भक्तीनें आपल्या गळ्यांत घालितो, तो वैकुंठपदास जातो. हे श्लोक स्कंदपुराणांतील, द्वारकामहात्म्यापैकीं आहेत. यास अन्यत्र आढळलेलीं आणखीं दुसरीं प्रमाणें:— श्लोक,

तुलसीकाष्ठघटितै रुद्राक्षाकारकारितैः
निर्मितां मालिकां कंठे निधायार्चनमारभेत् ॥ १ ॥
तुलसीकाष्ठमालाभिर्भूषितः कर्म आचरन् ॥
पितृणां देवतानां च कृतं कोटिगुणं भवेत् ॥ २ ॥
तुलसीकाष्ठमालां यो धृत्वा स्नानं समाचरेत् ॥
पुष्करे च प्रयागे च स्नातं तेन मुनीश्वर ॥ ३ ॥
तुलसीमालिकां धृत्वा यो भुंक्ते गिरिनन्दिनि ॥
सिक्थे सिक्थे स लभते वाजपेयफलं शुभं ॥ ४ ॥
बहुना किमिहोक्तेन शृणु त्वं मुनिसत्तम ॥

विड्डुत्सर्गादिकाले च न त्याज्या कंठमालिका ॥ ५ ॥
अशौचे चाप्यनाचारे काले काले च सर्वदा ॥
तुलसीमालिकां धृत्वा स याति परमां गतिं ॥ ६ ॥
यज्ञोपवीतवद्धार्या कंठे तुलसिमालिका ॥
नाशौचं धारणे तस्या यतः सा ब्रह्मरूपिणी॥७॥ना.पं.रा.

अर्थः—तुलसीच्या लांकडांची रुद्राक्षाकार केलेल्या मण्यांची माळ गळ्यांत घालून पूजादिक कर्मे करावींत. कारण तुलसीकाष्ठांची माला धारण करून पुण्यकर्म करणाऱ्या मनुष्यानें एकपट पुण्यकर्म केलें असतां कोटपट होतें. तुलसीमाला धारण करून, स्नान केलें असतां पुष्कर प्रयागादि महत्क्षेत्रांचे ठायीं स्नान केल्याचें पुण्य येतें; भोजन केलें असतां, शंकर ह्मणतात 'हे पार्वति, दर दर शितागणिक वाजपेय यज्ञाच्या फलाची प्राप्ति होते.फार काय सांगावें ही शौचादि विधीच्या वेळेसही काढूं नये. आणि ज्याप्रमाणें जानवें हें कधींही काढितां येत नाहीं त्याप्रमाणें ही अक्षय्य कंठांत वागविली पाहिजे. कारण हिला अपवित्रता मुळींच कधीं नाहीं. कारण ही केवळ ब्रह्मस्वरूप आहे. हे श्लोक पद्मपुराणांतील आहेत. याप्रमाणेंच सूतसंहितेंतील श्लोकः— दिने दिनेऽश्वमेधस्य सहस्त्रफलमश्नुते ॥ तुलसीकाष्ठरचितां नरो मालां च धारयन् ॥ १ ॥ अर्थः— जो मनुष्य तुळशीकाष्ठांची माळा घालितो, त्या मनुष्यास दरदिवशीं हजार अश्वमेध यज्ञ केल्याचें पुण्य प्राप्त होतें.

तुळशीचें सामान्य वर्णनः— श्लोक, तुलसीकाननो द्भूतो वाति वायुर्यतोयतः ॥ तत्रत्याः सर्वमनुजा निष्पापा

नात्र संशयः ॥ १ ॥ अर्थः— तुलसीच्या वनापासून उत्पन्न झालेला वारा जिकडे जिकडे जातो तिकडे तिकडे तो सर्व मनुष्यें पवित्र करितो श्लोकः— जन्म प्रभृति यः पापं करोति सततं पुमान् ॥ तुलसीकाष्ठसंस्पृष्टः स याति मम सन्निधौ ॥ १ ॥ तुलसीकाननं यत्र गृहे तिष्ठति नित्यशः ॥ तद्गृहं तीर्थभूतं हि नो यांति यमकिंकराः ॥ २ ॥ अर्थः— तुलसीचें बन ज्या घरांत आहे तें घर फारच पवित्र. तेथें यमाचे सेवक येत नाहींत. श्लोकः— ललाटे धारयेद्यो वै तुलसीमूलमृत्तिकां ॥ दशाश्वमेधजं पुण्यं स प्राप्नोति न संशयः ॥१ ॥ अर्थः— जो मनुष्य आपले ललाटाचे ठायीं तुळशीच्या मूळांतील मृत्तिकेप्रत धारण करितो त्यास दहा अश्वमेधयज्ञांचें पुण्य प्राप्त होतें.

श्लोक.

या दृष्टा निखिलाघसंघशमनी स्पृष्टा वपुःपावनी, दोपाणामभिवंदिता निरसनी सिक्तांतकत्रासिनी ॥ प्रत्यासक्तिविधायिनी भगवतः कृष्णस्य संसेविता, न्यस्ता तच्चरणे विमुक्तिफलदा तस्यै तुलस्यै नमः ॥ २ ॥

अर्थ.— ज्या तुळशीचें दर्शन घेतलें असतां सर्व पापें नाहींशीं होतात. जिला स्पर्श केला असतां देह पवित्र होतात. जीस वंदन केलें असतां सर्व दोष नाहींसे होतात. जीस पाणी घातलें असतां अंतकास त्रास देते. जिचें सेवन केलें असतां, कृष्णप्राप्ति होते. व कृष्णचरणावर समर्पण केली असतां मोक्षप्राप्ति होते. अशी जी ही तुलसी, तिजकारणें नमस्कार असो. श्लोकः—

महापातकयुक्तोऽपि तुलसीकाष्ठधारणात् ॥ सद्य एव विशुद्धात्मा विष्णुसायुज्यमाप्नुयात् ॥ १ ॥ अर्थः— मोठ्या पातकानें युक्त अशादेखील मनुष्यानें तुलसीच्या काष्ठांची माळा गळ्यांत धारण केली असतां तो तत्काल पवित्र होऊन अंतीं त्यास विष्णुसायुज्य प्राप्त होतें. अशाप्रकाचीं तुलसीमाला धारण करण्याविषयींचीं नारदपंचरात्रादिक ग्रंथांमध्यें पुष्कळ प्रमाणें आहेत.

आतां येथून **नाममहात्म्यः**— सर्व शास्त्रें व पुराणें यांचा असा सिद्धांत आहे कीं, कलियुगामध्यें पातकी लोकांस पवित्र करणारें नामच आहे. ह्याविषयीं भागवत, द्वादशस्कंधांतील प्रमाणें :— श्लोक, कलेर्दोषनिधे राजन्नस्ति ह्येको महान्गुणः ॥ कीर्तनादेव कृष्णस्य मुक्तसंगः परं व्रजेत् ॥ १ ॥ अर्थ :—शुकाचार्य बोलतात ' हे राजा, परिक्षिते, सर्वप्रकारें दोषस्थान जो कलि, याच्यांत एवढाच एक मोठा गुण आहे कीं, ज्या युगांमध्यें नामोच्चारणमात्रेंकरून मनुष्य सर्व संग त्याग करून प्रभुपदास जातो. श्लोकः— कलिं सभाजयंत्यार्या गुणज्ञाः सारभागितः ॥ यत्र संकीर्तनेनैव सर्वः स्वार्थोऽभिलभ्यते ॥ १ ॥ अर्थः— शहाणे लोक कलियुगाचा मोठा सत्कार करितात. कारण, ज्याचे ठायीं कृष्णसंकीर्तनेंकरूनच इच्छित फल प्राप्त होतें. श्लोक. कृते यद्ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः ॥ द्वापारे परिचर्यायां कलौ तद्धरिकीर्तनात् ॥ अर्थ;— कृतयुगाचे ठायीं विष्णूचें ध्यान करणारास, जें पुण्य, तसेंच त्रेतायुगाचे ठायीं यज्ञ करणारास जें पुण्य व

द्वापारामध्यें प्रभूच्या पूजनाचे ठायीं जें पुण्य, तें पुण्य कलियुगाचे ठायीं हरिकीर्तनापासून प्राप्त होतें. श्लोक :— हरेर्नामेव नामैव नामैव मम जीवनं ॥ कलौ नास्त्येव नास्त्येव नास्त्येव गतिरन्यथा ॥ १ ॥ अर्थः– विदुर सांगतात कीं, 'हे राजा, हरीचें नामच, नामच, नामच, बरें, मला जीवन आहे. कलियुगाचे ठायीं नामावांचून इतर दुसरी गति नाहीं, नाहींच बरें, नाहीं.' जसें एकाद्यास निश्चयानें कांहीं गोष्ट सांगणें झाल्यास मनुष्य तीन वेळ तेच शब्द उच्चारितो तसें सदरील श्लोकांत 'नामैव' व 'नास्त्येव' ह्या दोन पदांचा तीन तीन वेळ उच्चार केला आहे. श्लोकः– नाम्नोऽस्ति यावती शक्तिः पापनिर्हरणे हरेः ॥ तावत्कर्तुं न शक्नोति पातकं पातकी जनः ॥१॥ अर्थः—पाप हरण करण्याविषयीं नामाची जितकी शक्ति आहे तितकी पाप करण्यास पातकी लोक समर्थ नाहींत. एवंच कलीमध्यें पापमुक्त होण्यास साधन, नामग्रहणच आहे असें सहजरीत्या सिद्ध होतें. आतां, नाम घेण्यास अधिकारी पाहिजे, असें नाहीं, तर तो कसाही पातकी असो, नाम त्यास पवित्र करितें. याजविषयींचीं प्रमाणें: श्लोकः— स्तेनः सुरापो मित्रध्रुक् ब्रह्महा गुरुतल्पगः ॥ स्त्रीराजपितृगोहंता ये च पातकिनोऽपरे ॥१॥ सर्वेषामप्यघवतामिदमेव सुनिष्कृतं ॥ नामव्याहरणं विष्णोर्यतस्तद्विषया मतिः ॥ २ ॥ अर्थः— सुवर्णादि चौर्य करणारा, अथवा सुरापान करणारा, मित्रद्रोह करणारा, ब्रह्महत्या करणारा, अथवा गुरुपत्नीगमन करणारा,

एवंच कसाही पापी असो; त्यानें नामोच्चारण केलें असतां, त्यापासून मुक्त होतो. कारण नामोच्चारणानें प्रभूस असें वाटतें कीं, हा माझाच आहे, ह्मणून प्रभू त्यास पवित्र करितात. नामस्मरण करणारा मनुष्य नीच ज्ञातीचा असला तत्रापि तो श्रेष्ठ, आणि त्यानें सर्व पुण्यकर्में केलींच, असा अर्थ ज्यामध्यें निष्पन्न होतो तो श्लोकः— अहो बत श्वपचोऽतो गरीयान् यज्जिह्वाग्रे वर्तते नाम तुभ्यम् ॥ तेपुस्तपस्ते जुहुवुः सस्नुरार्या ब्रह्मानूचुर्नाम गृह्णंति ये ते ॥ १ ॥ अर्थः— ज्यांच्या जिव्हाग्राचे ठायीं देवाचें नांव आहे, तो मनुष्य चांडाळ जरी असेल तरी श्रेष्ठ. कारण नामोच्चारण करणाऱ्या मनुष्यांनीं तपें केल्याप्रमाणें होतात. तसेंच होम व तीर्थादिकांचीं स्नानें वेदाध्ययन इत्यादिक सर्व गोष्टी केल्याप्रमाणें होतात. यास्तव तो जातीचा चांडाळ जरी असला तत्रापि तो श्रेष्ठ आहे असें समजावें. हा श्लोक भागवत तृतीयस्कंधाच्या, तेहतिसाव्या अध्यायांत आहे. प्रभूचें नाम कोणत्याही रीतीनें घेतलें असतां तें पावन करणारेंच होतें. अशाविषयींचीं प्रमाणें, श्लोकः— सांकेत्यं पारिहास्यं वा स्तोभं हेलनमेव वा ॥ वैकुंठनामग्रहणमशेषाघहरं विदुः ॥ १ ॥ अर्थः— प्रभूचें नाम कोणत्याही रीतीनें घेतलें असतां पातकाप्रत हरण करणारें होतें. कोणत्याही रीतीनें म्हणजे पुत्रादिकांच्या नामोद्देशानें, अथवा थट्टेनें, अगर गायनाच्या आलापपूर्त्यर्थ, अथवा हेलनेनें, प्रभूचें नाम घेतलें असतां पातकाचा नाश करितें. श्लोकः— अज्ञानादथवा ज्ञानादुत्तमश्लो-

कनाम यत् ॥ संकीर्तितमघं पुंसो दहेदेधो यथानलः ॥१॥ यथागदं वीर्यतममुपयुक्तं यदृच्छया ॥ अज्ञानतोऽप्यात्मगुणं कुर्यान्मंत्रोऽप्युदाहृतः ॥२॥ अर्थः— जसा अग्नि ज्ञानानें अथवा अज्ञानानें काष्ठादिकांचे ठायीं टाकला असतां जाळतो, त्याप्रमाणें प्रभूचें नाम ज्ञानानें अथवा अज्ञानानें ह्मणजे कोणत्याही रीतीनें घेतलें असतां पातकाचा नाश करितें. जसें उत्तम औषध नसमजून सहजरीतीनें जरी प्राशन केलें, तरी तें आपला गुणच करितें. ह्याप्रमाणें प्रभूचें नाम सहज रीतीनें जरी घेतलें, तरी तें पातकाचा नाश करितें. ह्याप्रमाणें नाममाहात्म्य आहे. यास्तव नामोच्चारण करणें हा श्रेष्ठ मार्ग आहे. असा पुराणादिकांचा दृढतर सिद्धांत आहे.

आतां वारकरी लोक नीचोत्तमत्वादिभेदभाव सोडून जे परस्पर पायां पडतात त्याजविषयींचें प्रमाणः— भागवत, एकादशस्कंध, अध्याय २९ श्लोकः— "विसृज्य स्मयमानान् स्वान् दृशं व्रीडां च दैहिकीम् ॥ प्रणमेद्दंडवद्भूमावाश्वचांडालगोखरम् ॥ १ ॥ यावत्सर्वेषु भूतेषु मद्भावो नोपजायते ॥ तावदेवमुपासीत वाङ्मनःकायवृत्तिभिः ॥ २ ॥ अर्थः— नमस्कार करतेवेळेस आपले मित्र अथवा इतर लोक आपणास हसूं लागल्यास त्यांचें तें हसें मनांत न आणून आणि आपली देहदृष्टी ज्या संबंधानें जी लाज, ह्मणजे 'मी उत्तम, व हा नीच, मी ह्यास कसा नमस्कार करूं' अशी बुद्धि, ती सोडून ब्राह्मणांपासून चांडालापर्यंत सर्वांस नमस्कार करीत जावा. नमस्काराचा अवधि सांगतात । 'सर्व भूतांचे

ठायीं माझा भाव उत्पन्न होईतोंपर्यंत वाणी, मन, देह यांच्या संबंधानें अशीच उपासना करावी. वरील प्रथम श्लोकाप्रमाणें कित्येक विचारी लोक आचरण करितात व तदनुरूप वारकरी लोकांमध्यें हा सांप्रदाय ही आहे. आतां श्लोकामध्यें दण्डवत् प्रणमेत् असें आहे. आणि संत तर केवळ पायांवर डोई ठेवतात तरी याचा मूळ उद्देश तोच.

भक्तिप्राधान्य, भागवतमाहात्म्यांतील श्लोकः— न तपोभिर्नवेदैश्च न ज्ञानेनापि कर्मणा ॥ हरिर्हि साध्यते भक्त्या प्रमाणं तत्र गोपिकाः ॥ नृणां जन्मसहस्रेण भक्तौ प्रीतिर्हि जायते ॥ कलौ भक्तिः कलौ भक्तिर्भक्त्या कृष्णः पुरःस्थितः ॥ अर्थः– जशी भक्तीनें हरीची प्राप्ति होते, त्याप्रमाणें तपश्चर्या, वेदाध्ययन, ज्ञान, कर्म, इत्यादिकांनीं प्रभूची प्राप्ति होत नाहीं. तर भक्तीनेंच होते. याजविषयीं प्रमाणभूत गोपस्त्रिया आहेत. परंतु भक्तिविषयीं मनुष्याची प्रीति सहस्रावधि जन्मांनीं उत्पन्न होते. कलियुगाचे ठायीं प्रभूच्या प्राप्तीस मुख्य साधन भक्ति आहे. भक्तीनें कृष्ण प्रत्यक्ष आपणापुढें येऊन उभा राहतो. भा०,ए०, अ०,१४. श्लोकः— न साधयति मां योगो न सांख्यं धर्म उद्धव॥ न स्वाध्यायस्तपस्त्यागो यथा भक्तिर्ममोर्जिता ॥ १ ॥ भक्त्याहमेकया ग्राह्यः श्रद्धयात्मा प्रियः सतां ॥ भक्तिः पुनाति मन्निष्ठा श्वपाकानपि संभवात् ॥ २ ॥ प्रभु उद्धवास सांगतात, 'हे उद्धवा जशी भक्ति माझी प्राप्ति करून देते, तशी अष्टांगयोग, सांख्य, धर्म, वेदाध्य-

यन, तप, दान, इत्यादिकही करून देत नाहींत. हे उद्धवा श्रद्धेपासून झालेल्या भक्तीनेंच साधूंस प्रिय, सर्वांतर्यामी मी ग्राह्य आहें. माझी भक्ति चांडाळादिकांसही जात्यादिदोषांपासून पवित्र करते. जसे ज्ञानयोगास, शुद्धांतः करण, दृढ वैराग्यवान् मनुष्यच पाहिजेत. तसे भक्तियोगास पाहिजेतच असें नाहीं. भगवद्गीता श्लोकः—अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ॥ साधुरेव स मंतव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥ १ ॥ क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छांतिं निगच्छति ॥ कौंतेय प्रतिजानीहि नमे भक्तः प्रणश्यति ॥ २ ॥ अर्थः— 'हे अर्जुना जरी दुराचारी मनुष्यही अन्याला सेवन न करितां माझें सेवन करील, तर साधूच जाणावा. आणि उत्तमप्रकारानें निश्चय केलेला असा जाणावा. एवंच भक्तियोगास शुद्धांतःकरण मनुष्याचीच अपेक्षा आहे असें नाहीं. प्रभु आपल्या भक्ताविषयीं प्रतिज्ञाच करितात. 'हे अर्जुना, माझा भक्त जरी दुराचरणी असला, तरी शीघ्र धार्मिक होतो. व निरंतर शांत होतो. हे कौंतेया, मी हें तुला निश्चयानें सांगतों कीं, माझ्या भक्ताचा कधींही नाश व्हावयाचा नाहीं. अस्तु. एवंच भक्तीनें प्रभु वश होतो. भक्तिपरतें कलियुगामध्यें दुसरें साधन नाहीं. यास्तव प्रभूची भक्ति सर्वांनीं करावी. आतां ती भक्ति उत्पन्न होण्याचीं साधनें:— भागवत स्कंध ॥ ११ ॥ अ० ॥ ११ ॥ यांत सांगितलीं आहेत. श्लोकः- यात्रा बलिविधानं च सर्ववार्षिकपर्वसु ॥ वैदिकी तांत्रिकी दीक्षा मदीयव्रतधारणम् ॥ १ ॥ टीका— सर्ववार्षिकपर्वसु

महाएकादश्यादिपर्वसु, यात्रा 'पुण्यक्षेत्रेषु गमनं, बलिविधानं तत्रत्यस्य भगवतः पूजाकरणं, वैदिकी तांत्रिकी दीक्षा तुलसीमालादिधारणरूपा, मदीयव्रतधारणं नामकीर्तनादिमद्भक्तव्रतधारणं ॥ १ ॥ अर्थः– पुण्यक्षेत्राच्या यात्रेस जावें व तेथील क्षेत्रदेवतेची पूजा करावी, आणि तुलसीमाला धारण करावी, नामकीर्तन करावें, ह्मणजे त्यापासून परमेश्वराची भक्ति उत्पन्न होते व भक्तीस भुकेलेला प्रभु तात्काल वश होतो.

आतां हीं सर्व एकवटून नरास मोक्षप्राप्तीस श्रीक्षेत्रपंढरपुर ह्याप्रमाणें दुसरें युक्त साधनसंपन्न क्षेत्रच नाहीं. कारण, ज्यामध्यें जगन्निवास सच्चिदानंद प्रभु पूर्णरूपानें वास्तव्य करीत आहे. ह्याविषयींचें सर्व प्रथम भागामध्यें लिहिलेंच आहे. आशा ह्या क्षेत्रास नियमानें जाऊन ह्मणजे अर्थात वारी करून श्रीपांडुरंगाचें दर्शन घ्यावें. व तेथें पांडुरंग सेवेकरितां जे राहणारे अन्य देव व तीर्थें आहेत त्यांचेंही दर्शन घ्यावें. आणि वरील श्लोकांत सांगितलेली तुलसीमालाधारणादि दीक्षा घ्यावी. ह्मणजे भगवान् महासमर्थ श्रीपांडुरंग, आपला हा भक्त असें मानून त्यास ऐहिक सर्व सुखें देऊन शेवटीं आपल्या पदास नेतो. आतां या संबंधानें आह्मांस विशेष लिहिणें नको; कारण पूर्वीं जे तुकारामादिक, या देवाचे महान् महान् भक्त व साधुवर्य होऊन गेले, तेच प्रमाणभूत आहेत. कारण, त्यांनीं दुसरें कांहीं साधन केलेंच नव्हतें. परंतु जे असे झाले कीं, ज्यांच्या नामस्मरणानें प्राणी पातकापासून मुक्त हो-

तात. अशी योग्यता होण्यास कारण काय तर तुलसीमालाधारणादिकच होय. तर याच मार्गानें चालणारे ह्मणजे आपल्या गळ्यांत तुलसीमाला धारण करून निरंतर श्रीविठ्ठलाचें नामसंकीर्तन व त्याजविषयीं एकविध भक्ति, अन्योन्यनमन, आणि श्रीपंढरीक्षेत्राची वारी करणारे जे वारकरी लोक, ते मोठे धन्य व विचारी समजले पाहिजेत. या लोकांचा हा पंथ फारच स्तुत्य व पुण्यकारक आहे. याजकरितां सर्व विचारी लोक याचा आश्रय करून श्रीक्षेत्रास जाऊन श्रीविठ्ठलदेवाचें दर्शन जर घेतील तर प्रभु त्यांस ऐहिक सर्व सुखें देऊन अंतीं पारलौकिक सुख, भक्तशिरोमणि जे तुकारामादिक होऊन गेले त्यांस ज्याप्रमाणें दिलें, त्याप्रमाणें देईल. अतएव संसारदुःखोदधिमग्न अशा सर्वांनीं हरप्रयत्नानें जीवितसाफल्यास्तव श्रीक्षेत्र पंढरपुरास एकवार तरी येऊन श्रीपांडुरंगचरणसरोजांचें दर्शन अवश्यमेव घ्यावें ह्मणजे श्रीमद्भक्तकामकल्पद्रुम श्रीविठ्ठलेश त्यांस कधींही अंतर देणार नाहीं.

श्री पांडुरंगार्पणमस्तु.

समाप्त.